सोलापूर तरुण भारत
Solapur Tarun Bharat
न मे कर्मफले स्पृहा
छत्रपती संभाजीनगर, अहमदनगर, नांदेड, परभणी, हिंगोली, जालना व बीड येथून वितरित
छत्रपती संभाजीनगर बुधवार, दि. १४ मे २०२५ वर्ष - तिसरे अंक ४२ पाने : ८ किंमत रु. ६/- www.dainiktarunbharat.com, epaper.dainiktarunbharat.com

# सीबीएसई : इयत्ता दहावी, बारावीचा निकाल जाहीर; दहावीचा ९३.६० आणि बारावीचा ८८.३९ टक्के निकाल



नवी दिल्ली, १३ मे (हिं.स.) : केंद्रीय माध्यमिक शिक्षण मंडळाने (सीबीएसई) आज, मंगळवारी इयत्ता दहावी आणि बारावीचे निकाल जाहीर केले. दहावीत ९३.६० टक्के आणि बारावीत ८८.३९ टक्के विद्यार्थी उत्तीर्ण झाले आहेत. विद्यार्थ्यांनी ललीश.सीं.ळप संकेतस्थळावर आपला निकाल पाहता यील.

यावर्षी दहावी आणि बारावीच्या सुमारे ४४ लाख विद्यार्थ्यांनी बोर्डाची परीक्षा दिली होती.

निकालांमध्ये मुलींचा निकाल मुलांपेक्षा चांगला लागला आहे. दहावीच्या मुलींचा निकाल ९५ टक्के लागला, तर मुलांचा निकाल ९२.६२ टक्के लागला. मुलींचा निकाल मुलांपेक्षा २.३७ टक्के चांगला लागला आहे. बारावीच्या परीक्षेत ९१.६४ टक्के मुली यशस्वी झाल्या असून मुलांचा निकाल ८५.७० टक्के लागला आहे. सीबीएसईच्या दहावी आणि बारावीच्या परीक्षेत मुलींचा वरचष्मा असल्याचे चित्र आहे. विद्यार्थी त्यांच्या गुणपत्रिका ऑनलाइन तपासू शकतात परंतु हे केवळ तात्पुरते आहे. विद्यार्थ्यांना त्यांची मूळ गुणपत्रिका त्यांच्या शाळेतून घ्यावी लागेल. पुढील अभ्यासासाठी आणि इतर अधिकृत कामांसाठी मूळ गुणपत्रिका आवश्यक आहे. शाळा सहसा विद्यार्थ्यांना मूळ गुणपत्रिकेबद्दल अपडेट देतात. सीबीएसई बोर्ड गुणवत्ता यादी जाहीर करत नाही. याशिवाय, निकालात कोणताही टॉपर घोषित केलेला नाही. मंडळाने सर्व शाळा आणि शैक्षणिक संस्थांना कोणत्याही मुलाला शाळा किंवा जिल्ह्यातील टॉपर म्हणून घोषित करू नये असे निर्दे श दिले आहेत.

# निष्पापांचे रक्त सांडवाल तर विनाशच होईल- पंतप्रधान



नवी दिल्ली, १३ मे : निष्पाप लोकांचे रक्त सांडवाल तर विनाश आणि सामूहिक विनाश निश्चीत असल्याचा हुंकार पंतप्रधान नरेंद्र मोदींनी केले. पंजाबच्या आदमपूर एअरबेसवर आज, मंगळवारी जवानांची भेट घेतल्यानंतर ते बोलत होते.

याप्रसंगी पंतप्रधान म्हणाले की, ज्या पाकिस्तानी सैन्यावर हे दहशतवादी अवलंबून होते, त्यांना भारतीय लष्कर, हवाई दल आणि नौदलाने पराभूत केले आहे. पाकिस्तानात अशी कोणतीही जागा नाही जिथे दहशतवादी बसून शांततेत श्वास घेऊ शकतील. आम्ही घरात घुसून तुमच्यावर हल्ला करू आणि तुम्हाला पळून जाण्याची एकही संधी देणार नाही. भारतीय ड्रोन आणि क्षेपणास्त्रांचा विचार करून पाकिस्तान बरेच दिवस झोपू शकणार नाही. पाकिस्तानच्या विनंतीनंतर भारताने आपली लष्करी कारवाई पुढे ढकलली आहे. जर पाकिस्तानने पुन्हा दहशतवादी कारवाया किंवा लष्करी धाडस केले तर आम्ही त्याला योग्य उत्तर देऊ. मी हे उत्तर माझ्या स्वतःच्या अटींवर आणि माझ्या पद्धतीने देईन. भारतीय विश्वास, तुमचा संयम, धैर्य, शौर्य आणि सतर्कता याबळावर मी ही गर्जना करू शकतो. जवानांना धाडस, हा उत्साह असाच अबाधित ठेवावा लागेल. आपल्याला सतत सतर्क राहावे लागेल. आपण तयार असले पाहिजे. आपण शत्रूला आठवण करून देत राहावे की हा एक नवीन भारत आहे, त्याला शांतता हवी आहे पण जर मानवतेवर हल्ला झाला तर युद्धाच्या आघाडीवर शत्रूचा नाश कसा करायचा हे भारताला चांगलेच माहिती आहे.

'आज आपल्याकडे नवीन तंत्रज्ञानाची क्षमता आहे जी पाकिस्तानला सोसता येत नाही. हवाई दलासह सर्व दलांना जगातील सर्वोत्तम तंत्रज्ञानाची उपलब्धता आहे, नवीन तंत्रज्ञानामुळे आव्हानेही मोठी होतात. कौशल्य म्हणजे गुंतागुंतीच्या आणि अत्याधुनिक प्रणाली कार्यक्षमतेने राखणे आणि चालवणे. भारतीय जवान या खेळात जगात सर्वोत्तम आहेत हे सिद्ध केले आहे. भारतीय हवाई दल केवळ शस्त्रास्त्रांनीच नव्हे तर डेटा आणि ड्रोनच्या मदतीनेही शत्रूचा पराभव करण्यात पारंगत झाल्याचे पंतप्रधानांनी सांगितले. ऑपरेशन सिंदूरमध्ये, मनुष्यबळ आणि यंत्रांमधील समन्वय देखील आश्चर्यकारक राहिला आहे. भारताच्या पारंपरिक हवाई संरक्षण प्रणाली, आकाश सारख्या भारतात बनवलेल्या प्लॅटफॉर्म, एस-४०० सारख्या आधुनिक संरक्षण प्रणालींनी अभूतपूर्व ताकद दिली आहे. एक मजबूत सुरक्षा कवच ही भारताची ओळख बनली आहे. पाकिस्तानच्या सर्व प्रयत्नांना न जुमानता, आमच्या हवाई तळांना किंवा आमच्या संरक्षण पायाभूत सुविधांना कोणतेही नुकसान झाले नाही. याचे श्रेय तुम्हा सर्वांना जाते असे मोदींनी सांगितले.

आपल्या मजबूत हवाई संरक्षण यंत्रणेने पाकिस्तानचे ड्रोन, त्यांचे यूएव्ही, विमाने, क्षेपणास्त्रे नष्ट केली. देशातील सर्व हवाई तळांशी संबंधित नेतृत्व आणि हवाई योद्ध्यांचे मी मनापासून कौतुक करतो. तुम्ही खरोखरच खूप छान काम केले आहे असे मोदी म्हणाले. दहशतवादाविरुद्ध भारताच्या लक्ष्मण रेषा यांचे स्पष्ट मत आहे की जर आता दहशतवादी हल्ला झाला तर भारत त्याला योग्य उत्तर देईल. सर्जिकल स्ट्राईकमध्ये ते पाहिले, एअरस्ट्राईकमध्ये ते पाहिले आणि आता ऑपरेशन सिंदूर हे भारताचे न्यू नॉर्मल आहे. भारतात आता तीन तत्वे निश्चित झाली आहेत असे पंतप्रधानांनी नमूद केले.

# विषारी दारु पिल्याने १५ जणांचा मृत्यू, ६ जण गंभीर

अमृतसर , १३ मे : पंजाबमधील अमृतसरमध्ये विषारी दारू पिऊन १५ जणांचा मृत्यू झाला आहे. तर ६ जणांची प्रकृती गंभीर असल्याचे सांगण्यात येत आहे. ज्यांना उपचारासाठी रुग्णलयात दाखल करण्यात आले आहे.याप्रकरणी पोलिसांनी गुन्हा दाखल केला असून पुढील तपास सुरु केला आहे.

मिळालेल्या माहितीनुसार, मजिठातील भुल्लर, टांगरा, आणि सांधा या गावांमध्येही विषारी दारू पिऊन मृत्यू झाल्याच्या घटना घडल्या आहेत. मृतांपैकी अनेकजण गावातील विटभट्टीवर काम करणारे कामगार आहेत. या घटनेनंतर कारवाई करत पंजाब पोलिसांनी बनावट दारू पुरवणाऱ्या मुख्य आरोपीसह पाच जणांना अटक केली आहे.या घटनेनंतर पोलिसांनी मृतांचे मृतदेह ताब्यात घेतले असून ते शवविच्छेदनासाठी पाठवण्यात आले आहेत.

अमृतसर एसएसपी मनिंदर सिंग यांनी सांगितले की, परिसरात विषारी दारू पिऊन १५ जणांचा मृत्यू झाला आहे, तर इतर सहा जणांची प्रकृती गंभीर आहे. एसएसपी म्हणाले, आम्हाला सोमवारी रात्री ९.३० च्या सुमारास माहिती मिळाली की विषारी दारू पिऊन लोक मरत आहेत. आम्ही ताबडतोब कारवाई केली आणि चार जणांना ताब्यात घेतले. आम्ही मुख्य पुरवठादार प्रभजीत सिंगला अटक केली आहे. याशिवाय मुख्य आरोपीचा भाऊ कुलबीर सिंह उर्फ जग्गू, साहिब सिंह उर्फ सराई, गुरजंत सिंह आणि जीताची पत्नी निंदर कौर यांनाही अटक करण्यात आली आहे. पोलिसांनी त्यांच्याविरुद्ध उत्पादन शुल्क कायद्याच्या कलम १०५ बीएनएस आणि ६१अ अंतर्गत गुन्हा दाखल केला आहे.

या घटनेनंतर पंजाब सरकारने कारवाई केली आहे. विषारी दारू प्यायल्याने या लोकांचे आरोग्य बिघडले आहे.त्यामुळे राज्य सरकारने राज्यभरात सुरू असलेल्या बनावट दारू व्यापाराची चौकशी करण्याचे आदेश जारी केले आहेत, तर मजिठा प्रकरणात आतापर्यंत ५ आरोपींना अटक करण्यात आली आहे.

# आयपीएलच्या १८ व्या मोसमातील उर्वरित सामने फक्त ६ शहरांमध्ये खेळवले जाणार

मुंबई, १३ मे : भारत-पाकिस्तान यांच्यातील युद्धविरामानंतर काही दिवसांनी आयपीएलच्या १८ व्या मोसमातील उर्वरित सामन्याचं आयोजन केलं जाणार असल्याचं निश्चित होतं. त्यानुसार बीसीसीआयने १२ मे रोजी रात्री उशिरा उर्वरित सामन्याचं सुधारित वेळापत्रक जाहीर केल आहे. यामध्ये भारतातील ५ शहरांमध्ये उर्वरित आयपीएलच्या १८ व्या मोसमातील सामन्याचं आयोजन करण्यात आलेलं नाही. बीसीसीआयकडून फक्त १३ सामन्यांचं ठिकाण जाहीर करण्यात आलंय. तर प्लेऑफच्या सामन्यांचं ठिकाण जाहीर करण्यात आलेलं नाही.

भारत-पाकिस्तान यांच्यातील तणावामुळे बीसीसीआयने ९ मे रोजी आयपीएलचा १८ वा मोसम आठवड्याभरासाठी स्थगित करण्याचा निर्णय घेतला. तर त्याआधी ८ मे रोजी धरमशाळा येथे आयोजित करण्यात आलेला पंजाब विरुद्ध दिल्ली सामना मध्येच थांबवण्यात आला. त्यामुळे बीसीसीआयने आगामी १७ सामन्यांचं आयोजन हे सीमेनजीक असणाऱ्या ५ शहरांमधील स्टेडियममध्ये करणं टाळलं आहे. तसेच सीमेपासून दूर असणाऱ्या ६ शहरांची निवड उर्वरित सामन्यांच्या आयोजनासाठी करण्यात आली आहे.

धरमशाळेतील हिमाचल प्रदेश क्रिकेट स्टेडियम सीमेपासून काही किमी अंतरावर आहे. त्यामुळे कोणतीही जोखीम नको म्हणून तिथे सामने आयोजित करण्यात आलेले नाहीत. तसेच धरमशाळा व्यतिरिक्त चेन्नई, मुल्लानपूर, कोलकाता आणि हैदराबाद येथेही सामने होणार नाहीत. चेन्नई, मुल्लानपूर आणि कोलकाता ही शहरं भारताच्या आंतरराष्ट्रीय सीमेपासून जवळ आहेत. त्यामुळे फक्त ६ शहरांमध्येच सामने होणार आहेत. आयपीएलच्या १८ व्या मोसमातील सामने याआधी बंगळुरु, जयपूर, दिल्ली, लखनौ, चेन्नई, धर्मशाळा, कोलकाता, हैदराबाद, मुंबई, अहमदाबाद, मुल्लानपूर, विशाखापट्टणम आणि गुवाहाटी या शहरांमध्ये आयोजित करण्यात आले होते.






## संक्षिप्त वृत्त...

### तैलिक महासभेचया जिल्हाध्यक्षपदी नगरसाळे

**परभणी,/प्रतिनिधी-** येथील महाराष्ट्र प्रांतिक तैलीक महासभेच्या जिल्हा अध्यक्षपदी सतिष बापुअप्पा नगरसाळे यांची बिनविरोध निवड करण्यात आली.

शहरातील स्टेशन रोड येथील सभागृहात महाराष्ट्र प्रांतिक तैलिक महासभा नांदेड विभागाच्या वतिने नुतन पदाधिकारी निवडीचा कार्यक्रम आयोजित केला होता. यावेळी जिल्हा अध्यक्षपदी सतिष नगरसाळे यांनी बिनविरोध निवड करण्यात आली. निवडीबद्दल मान्यवरांच्याहस्ते नगरसाळे यांचा सत्कार करण्यात आला. यावेळी राज्य उपाध्यक्ष डॉ. रावसाहेब राऊत, विभागीय अध्यक्ष मधुकरराव राऊत, कार्याध्यक्ष प्रा. काशिनाथ सालमोटे, मा. अध्यक्ष भास्करराव देवडे, सचिव पांडुरंग शिंदे, सहसचिव रमेश चांदीवाले, गजानन तायडे, आंबादसराव क्षीरसागर, रामअप्पा दावलबाजे, रत्नाकर सुर्यवंशी, प्रल्हाद भिसे, ॲड. सुभाष भरदम, रामदास पाटील, सखाराम लासे, पांडुरंग माने, दशरथअप्पा शिंदे, डॉ. प्रल्हाद भिसे, निळकंठ राऊत, दिनु माने, प्रा. संतोष साखरे, प्रल्हाद देवडे, संजय गौरकर, शिवशंकर सोनुने, संतोष माने, निलेश खंदारे, रमेश राऊत, मन्मथ देशमाने, पवन राऊत तसेच परभणी शहर व जिल्हा भरातून आलेले तेली समाज बांधव मोठ्या संख्येने उपस्थित होते. सूत्रसंचालन प्रा.शांतीलींगआप्पा काळे यांनी केले.

### परिचारिकांनी मेणबत्ती पेटवून घेतली परिचर्येची शपथ

#### स्त्री रुग्णालयात जागतिक परिचारिका दिन साजरा

**परभणी,/प्रतिनिधी :** येथील जिल्हा शासकीय स्त्री रुग्णालयात सोमवारी (दि.१२) जागतिक परिचारिका दिन मोठ्या उत्साहात साजरा करण्यात आला.

कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी वैद्यकीय अधीक्षक डॉ.नरेंद्र वर्मा यांची उपस्थिती होती. याप्रसंगी अधिसेविका चंदाराणी लेमाडे, डॉ.अरुणा राठोड, डॉ. हसीब, डॉ. गिरी, डॉ. आपेट यांची उपस्थिती होती. आधुनिक परिचर्येचा पाया घालणाऱ्या फ्लोरेन्स नाइटिंगेल यांच्या जन्मदिनानिमित्त त्यांच्या प्रतिमेचे प्रमुख पाहुण्यांच्या हस्ते पूजन करण्यात आले. सर्व परिचारिकांना हातात मेणबत्ती पेटवून परिचर्येची शपथ अधिसेविका चंदाराणी लेमाडे यांनी दिली.

डोळ्यात तेल घालून अहोरात्र रुग्णांची सेवा करणाऱ्या परिचारिकांचा सन्मान करण्याचा हा जागतिक परिचारिका दिन असल्याचे मत डॉक्टर नरेंद्र वर्मा यांनी व्यक्त केले. कार्यक्रम यशस्वीतेसाठी इन्चार्ज छाया बागुल, मीना पांचाळ, जरीना शेख, रमा हनवते, उज्वला कराळे, शितल शिंदे, शितल सोनकांबळे, लीना मुजमुले, सुरेखा लांडे, शार्लेट दारू, अमृता फुलारी, अर्चना रोकडे, शुभांगी कांबळे, फरीन पठाण, वसीमा चौधरी, दिव्या कानडे, संध्या गवळे, वर्षा निकम, शितल धाबे, शुभांगी कांबळे, आशा आवचार, पूजा शेळके आदींनी कार्यक्रमासाठी परिश्रम घेतले.




**जिंतूर-एकलव्य माध्यमिक विद्यालयाने जिंतूर शहरात निकालाची परंपरा कायम राखत ९७% टक्के निकाल लागला असून शाळेतून प्रथम आनंद दशरथ बुधवंत द्वितीय सिंपले नवनाथ पांडुरंग तृतीय कुमारी धनश्री सुधीर पोपळे आले. शालान्त प्रमाणपत्र परिक्षेस १२१ विद्यार्थी प्रविष्ट झाले होते यामध्ये विशेष प्रविण्यात २४ विद्यार्थी व प्रथम श्रेणीमध्ये ४१ विद्यार्थी पास झाले आहेत द्वितीय श्रेणी ५२ विद्यार्थी पास झाले आहे. सर्व विद्यार्थ्यांचे भागीरथी जीवनधारा प्रतिष्ठान लहानेवाडी संस्थेच्या वतीने व शाळेच्या वतीने पुष्पगुच्छ देऊन स्वागत करतांना दिसत आहेत.**

तरुण भारत
कार्यालयाचा पत्ता- डॉ.लोया नेत्र रुग्णालयासमोर ढवळे यांचे निवासस्थान शिवाजी नगर, परभणी
❑ दैनिक ❑ वेबसाईट ❑ सोशल मिडिया
छोट्या जाहीराती व प्रगटनासाठी
खरेदी-विक्री-प्रॉपर्टी व वाहन/भाडेपट्टी/नोकरी विषयक/प्रवेश/ विवाह विषयक/ शैक्षणिक/ आरोग्य/ ड्रायव्हिंग स्कूल/ मोबाईल/ हॉटेल/ रेस्टॉरंट/ आईस्क्रिम पार्लर/ मसाज पार्लर/ ब्युटी पार्लर/ कागदपत्रे हरवले/ चेंज ऑफ नेम/ न्यायालयीन व धर्मादाय आयुक्त कार्यालय प्रगटने/
९४ २३३२४६६६५, ९२८४६६४४३०, ९२८४६९५५८३

# भारतीय अर्थव्यवस्थेत बांधकाम कामगारांचे मोठे योगदान- आ.गुट्टे

## ७४६ लाभार्थी कामगारांना गृहोपयोगी साहित्य संचाचे वाटप

**मोहन धारासूरकर**

**गंगाखेड,/प्रतिनिधी-** भारत ही सर्वात वेगाने वाढणारी अर्थव्यवस्था आहे. त्यामध्ये बांधकाम उद्योग हा अर्थव्यवस्थेचा अविभाज्य भाग आहे. बांधकामातील गुंतवणूक ही भारताच्या जीडीपीच्या जवळपास ११ टक्के आहे. दिवसेंदिवस भारत बदलत असून आधुनिक होत आहे. त्यामुळे बांधकाम उद्योगाला विशेष चालना मिळत आहे. मात्र, त्या बांधकाम उद्योगामध्ये आपल्या बांधकाम कामगारांचे मोठे कष्ट आहे. त्यांच्या कष्टावर आणि घामावर भारत प्रगती करतो आहे. शहरासह ग्रामीण भागात मोठमोठ्या इमारती उभ्या करण्यासाठी कष्ट घेणारे आपले कामगार बांधव, हेच प्रगतीचा मूलाधार आहेत. अशा बांधकाम कामगारांसाठी शासन सातत्याने विविध योजना राबवित आहे, ही मोठी आनंदाची गोष्ट आहे. मात्र, भारतीय अर्थव्यवस्थेत बांधकाम कामगारांचे मोठे योगदान आहे, ही बाब कोणालाही नाकारता येणार नाही, असे प्रतिपादन स्थानिक आमदार डॉ.रत्नाकर गुट्टे यांनी केले. शहरातील स्व.गोपीनाथ मुंडे अन्नछत्र सभागृह येथे शासकीय योजना मदत केंद्राच्या वतीने आयोजित गृहोपयोगी साहित्य संच वाटप कार्यक्रमाचे अध्यक्ष म्हणून ते बोलत होते. याप्रसंगी त्यांनी उपस्थित सर्वांशी मनमोकळा संवाद साधला.

### ...तर सर्व देश भारतीय सैनिकांच्या सोबत!

**देशाच्या सीमेवर सैनिक अहोरात्र सजग असतो. आपण सैनिकांच्या बलिदानाचा सन्मान केला पाहिजे. सैनिकाचे जीवन हे त्याच्या कुटुंबासाठी, समाजासाठी आणि देशासाठी बलिदान असते. एका सैनिकाचे बलिदान हे केवळ त्याचे जीवन देण्यात नाही, तर त्याच्या स्वप्नांचा, इच्छांचा आणि व्यक्तिगत सुखांचा त्याग करण्यातही असते. जेव्हा सैनिक आपल्या सर्व सुखांचा त्याग करून तिथे आपल्यासाठी उभा आहे तेव्हा त्याचे सुरक्षा व मनोबल वाढवण्यासाठी आपण परमपित्याला ईश्वराला प्रार्थना तर नक्कीच करू शकतो. त्यामुळे सीमेवर लढत असलेल्या भारतीय जवानांच्या सुरक्षेसाठी आणि त्यांचे मनोबल वाढवण्यासाठी प्रार्थना करा, अशा शब्दात आमदार डॉ.गुट्टे यांनी सैनिकांप्रति आपल्या संवेदना व्यक्त केल्या.**



कामगार बांधवांसाठी सुरू असलेल्या विविध योजनांची सविस्तर माहिती दिली. शिवाय, शासकीय योजना मदत केंद्राने आजपर्यंत केलेल्या कामगिरीची योजनानिहाय आकडेवारी उपस्थित जनतेसमोर ठेवली. कष्टकरी बांधवांना आधार देण्यासाठी या सर्व योजना नवसंजीवनी ठरत आहेत. त्यामुळे गरजू आणि होतकरू बांधवांपर्यंत या योजना तत्परतेने पोहोचवा, असेही आवाहन उपस्थित पदाधिकारी व कार्यकर्त्यांना केले. याप्रसंगी तब्बल ७४६ लाभार्थी बांधवांना या गृहोपयोगी साहित्य संचाचे वाटप केले. या संचामध्ये किचन स्टीलची भांडी, तवा, कढई, चमचे, वाटी, थाळी अशा दैनंदिन वापरातील महत्त्वाच्या वस्तूंचा समावेश आहे. पुढे बोलताना आ.डॉ.गुट्टे म्हणाले की, महाराष्ट्र शासनाने राज्यातील बांधकाम कामगारांच्या आर्थिक स्थैर्यासाठी विविध योजना सुरू केल्या आहेत. त्यामध्ये आर्थिक सहाय्य, विवाह आणि कुटुंब कल्याण, शिक्षण आणि आरोग्य, घरकुल योजना, सुरक्षितता आणि सुरक्षेची किट, अशा विविध योजनांचा समावेश आहे. बांधकाम क्षेत्रात काम करणाऱ्या कामगारांना आर्थिक मदत देणे, त्यांच्या आरोग्याची काळजी घेणे, आणि त्यांचे जीवनमान उंचावणे, हा त्या सर्व योजनांचा उद्देश्य आहे. बांधकाम क्षेत्रातील काम हे अत्यंत धोकादायक असते. त्यामुळे कामगारांना आर्थिक आधार देण्याचे आणि त्यांच्या कुटुंबीयांना शाश्वत भविष्य मिळवून देण्याचे काम अशा योजनेंतर्गत होते. विशेषतः अपघात झाल्यास किंवा कामाच्या ठिकाणी सुरक्षा साधने नसल्यामुळे होणारे धोके टाळण्यासाठी योजनेतून दिल्या जाणाऱ्या वस्तू अत्यंत महत्त्वाच्या ठरतात. तसेच इतर काही योजनांमुळे कामगारांना आर्थिक मदत मिळते. त्यांच्या पाल्यांना शैक्षणिक संधी उपलब्ध होतात आणि त्यांचे जीवन अधिक सुरक्षित होते. शिवाय, या विविध योजनेंतर्गत कामगारांना दिली जाणारी मदत आणि साधने त्यांच्या कुटुंबाच्या भविष्यासाठीही उपयोगी ठरतात. अतिशय उत्साहात संपन्न झालेल्या या कार्यक्रमाचे प्रास्ताविक अभिजीत चक्के तर सूत्रसंचालन पद्माकर देवा जोशी यांनी केले. तसेच सचिन राठोड यांनी आभार मानले. यावेळी विधानसभा अध्यक्ष किशनराव भोसले, रासपा प्रदेश सरचिटणीस नंदकुमार पटेल, मित्र मंडळाचे जिल्हाध्यक्ष संदीप आळनुरे, अल्पसंख्याक अध्यक्ष इक्बाल चाऊस, शहराध्यक्ष सय्यद अकबर, माजी उपनगराध्यक्ष राधाकिशन शिंदे, माजी नगरसेवक राजू खान, ॲड. कलिम शेख, तुकाराम तांदळे, प्रताप मुंडे, माणिकराव आळसे, उद्धव शिंदे, वैजनाथ टोले, संजय पारवे, खालेद शेख, माजी नगरसेवक नागनाथ कासले, शेख चांदभाई, संदीप केंद्रे, संतोष पेकम, राजेश दामा, महेश शेटे, साबेर शेख, संदीप राठोड, सतीश घोबाळे यांच्यासह राष्ट्रीय समाज पक्ष व मित्र मंडळाचे पदाधिकारी, कार्यकर्ते, प्रतिष्ठित व्यापारी आणि शहरवासीय मोठ्या उपस्थित होते.

## मानवत नगर परिषदेच्यावतीने जमजम कॉलनीचा पाणी प्रश्नासाठी नवी जलवाहिनी- डॉ.अंकुश लाड

**मानवत,/प्रतिनिधी-** प्रभाग क्रमांक ७ मध्ये पाणी टंचाई वरील उपाय योजनेसाठी महत्वपूर्ण पाऊल; जमजम कॉलनीत नवीन पाईपलाईनचे युवा नेते डॉ. अंकुशराव लाड यांच्या हस्ते उद्घाटन मानवत नगर परिषदेच्या प्रभाग क्रमांक ७ मधील जमजम कॉलनी परिसरात गेल्या अनेक वर्षां पासून नागरिकांना पिण्याच्या पाण्याची भीषण टंचाई भासत होती.

ही गंभीर बाब स्थानिक नागरिकांनी युवा नेते डॉ. अंकुशराव लाड यांच्या समोर मांडल्यानंतर त्यांनी त्वरीत पुढाकार घेत आज जमजम कॉलनी मध्ये नवीन पाईपलाईन टाकण्याच्या कामाचा शुभारंभ केला. या महत्त्वपूर्ण कामाचे उद्घाटन त्यांच्या हस्ते संपन्न झाले.नागरिकांच्या दीर्घकाळच्या मागणीला प्रतिसाद मिळाल्याने जमजम कॉलणी सह संपूर्ण बांगर प्लॉट परिसरात महिलांना व वयोवृद्धांना पाण्यासाठी लांब अंतरावरून भटकंती करावी लागत होती. या समस्येचे गांभीर्य लक्षात घेऊन डॉ. अकूंशराव लाड यांनी लवकरच पाईप लाईनच्या माध्यमातून घराघरांत पाणी पोहचण्याचा निर्णय घेतला. या उद्घाटन सोहळ्याच्या वेळी त्यांनी परिसरात लवकरच विद्युत पोल (खांब) ही बसवले जातील, असे आश्वासन दिले. इतर भागातही पाणी टंचाईवर उपाय उद्घाटनप्रसंगी बोलताना डॉ. अकूंशराव लाड यांनी सांगितले की, बांगट प्लॉट, राज गल्ली, गालिब नगर आणि आंबेगाव नाका या परिसरांमध्ये पाण्याचा प्रश्न कायम स्वरूपी सोडवण्या साठी लवकरच मोठ्या क्षमतेची पाण्याची टाकी ( जलकूंभ ) उभारण्यात येणार आहे. यामुळे हजारो नागरिकांना दिलासा मिळणार आहे.



यावेळी प्रमुख मान्यवरांची उपस्थिती होती. या कार्यक्रमाला माजी नगरसेवक सय्यद जमील, माजी नगरसेवक नियमत खान, अफसर अंसारी, अनंद मामा भदर्गे, हबीब भडके आदी मान्यवर उपस्थित होते. याशिवाय हाजी रफिक कुरेशी, नूरभाई कुरेशी, फयाम बेलदार, करीम बेलदार, रफिक भाई कुरेशी टेकडी वाले, शेख बडे मिया, बाबू फूफ्फा, इब्राहिम भाई, शेख बाबूभाई, सय्यद समीर, सिराज मदनी, रफिक शेख, शफी सफारी टेलर अन्सारी, इलियास पठाण, शिरूभाई, माजिद शेख, अब्दुल वाहब कुरेशी, सिद्दीक भाई ड्रायव्हर, करीम मामू मिर्झा अगु भाई यांच्यासह परिसरातील मुस्लिम बांधव मोठ्या संख्येने उपस्थित होते.

### जिल्हयातील मुलींनी मारली दहावीच्या निकालात बाजी

**परभणी,/प्रतिनिधी :** महाराष्ट्र राज्य शिक्षण संवर्धन मंडळाच्यावतीने इयत्ता दहावीचा निकाल मंगळवारी दुपारी १ वाजता जाहिर करण्यात आला असून यामध्ये यावर्षी देखील मुलींनीच बाजी मारली असून जिल्हयात मुलींच्या यशाची परंपरा अद्यापही कायम असल्याचे चित्र पहावयास मिळाले होते.

यावर्षी इयत्ता दहावीच्या परीक्षा पेब्रुवारी महिन्यात सुरु झाल्या होत्या. तसेच त्या परीक्षा मार्च महिन्यातच पूर्णंत संपल्या देखील होत्या. पुढील वर्षापासून शैक्षणिक धोरण बदलणार असल्यमुळे शासनाच्यावतीने यावर्षी दहावीचा निकाल लवकर लावला असून यामध्ये जिल्हयातील मुलींनी दरवर्षी प्रमाणे यावर्षी देखील मोठी उडी मारलेली दिसून आली आहे. परंतू दरवर्षी मुलांच्या निकालात होणारी धट पाहता मुलांनी अद्यापही पाहिजे तसे परीक्षेत यश न मिळाल्यामुळे थोडा प्रमाणात हिरमोड झाला असून यावर्षी मात्र मुलींचीच बाजी पुन्हा सरस ठरली आहे.



## शांतता रॅलीच्या माध्यमातून बुध्दविचारांचा जागर

### सेलूत बुध्द जयंती साजरी

**सेलू,/प्रतिनिधी:** तथागत भगवान गौतम बुद्ध यांच्या जयंतीनिमित्त शहरात भव्य शांतता व कॅंडल रॅलीचे आयोजन सोमवार १२ रोजी करण्यात आले. रायगड नाका येथून शांतता रॅंलीची सूरूवात करण्यात आली होती. सदरिल शांतता रॅंली शहरातील प्रमूख रस्त्यावरून डॉ. बाबासाहेब आंबेडकर पुतळ्या पर्यंत काढलेल्या या रॅलीस पोलीस निरीक्षक दिपक बोरसे यांच्या हस्ते धम्मध्वज फडकवून सुरुवात करण्यात आली.

या शांतता रॅलीमध्ये भन्ते प्रज्ञाबोधी, अशोक अंभोरे,मिलिंद सावंत, प्रकाश भालेराव, सिद्धार्थ एडके, सुरेश रणखांबे, सुमेध आवटे, गंगाधर अवचार , नरहरी काकडे,गजानन साळवे,प्रा. डी.एन. गायकवाड, प्रा. के. डी. वाघमारे,अशोक कदम, के. व्ही. वाघमारे , नागोराव साळवे, होसुरकर, प्रदीप जोहिरे, सूर्यकांत गायकवाड,बाळू धापसे,विनोद धापसे, रोहन आकात, संजय भाग्यवंत, कमलाकर कोल्हे, राहूल इंगळे, सिद्धार्थ शिरसाट, विजय खेबाळे,राहूल जाधव,विकास धापसे,विनोद धापसे,विक्की घायतडक यांच्यासह बौद्ध उपासक-उपासिका मोठ्या संख्येने उपस्थित होते.या शांतता रॅलीतून सामाजिक एकता, शांती आणि धम्म संदेश जनमानसात देण्यात आला.

# बुद्ध विचारसरणी आचरणात आणल्यास जगामध्ये वैरभाव शिल्लक राहणार नाही-कुलगुरु



**संपत तेली**

**पूर्णा,/प्रतिनिधी-** संपूर्ण जगामध्ये शांतता, सुव्यवस्था, प्रेमभाव निर्माण करण्याचे सामर्थ्य तथागत भगवान बुद्ध यांच्या विचारात आहे. संपूर्ण जगाने बुद्ध विचारसरणी आचरणात आणल्यास जगामध्ये वैरभाव शिल्लक राहणार नाही, असे प्रतिपादन वसंतराव नाईक मराठवाडा कृषि विद्यापीठाचे कुलगुरु डॉ. इंद्र मणि यांनी केले.

तथागत भगवान गौतम बुद्ध यांच्या २५६९ व्या जयंतीनिमित्त पूर्णा शहरांमध्ये सार्वजनिक भीम व बुद्ध जयंती मंडळाच्या वतीने सोमवारी (दि.१२) आयोजित समूहिक महाबुद्धवंदना व अभिवादन कार्यक्रम अत्यंत भक्तिभावाने व उत्साहात संपन्न झाला. या कार्यक्रमात शेकडो अनुयायी उपस्थित राहून भगवान बुद्ध आणि भारतरत्न डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांना अभिवादन केले. या कार्यक्रमाचे प्रमुख अतिथी म्हणून कुलगुरु प्रा. डॉ. इन्द्र मणि यांनी उपस्थिती लावली. कार्यक्रमाचे प्रमुख मार्गदर्शक व धम्मदेशक म्हणून अखिल भारतीय भिक्षू संघाचे कार्याध्यक्ष भदंत डॉ. उपगुप्त महाथेरो यांनी उपस्थितांना बौद्ध धम्माचे महत्त्व पटवून दिले. त्यांच्या प्रभावी धम्मदेशनेतून बौद्ध तत्त्वज्ञानाचा प्रसार झाला. हा भव्य कार्यक्रम जिल्हा मैदान, बुद्ध विहार समोरील भदंत उपाली थेरो नगर, पूर्णा (जि. परभणी) पार पडला.

यावेळी कुलगुरू प्रा.डॉ. इन्द्र मणि यांनी संबोधित करताना सांगितले, संपूर्ण जगामध्ये शांतता सुव्यवस्था प्रेमभाव निर्माण करण्याचे सामर्थ्य तथागत भगवान बुद्ध यांच्या विचारात आहे. संपूर्ण जगाने बुद्ध विचारसरणी आचरणात आणल्यास जगामध्ये वैरभाव शिल्लक राहणार नाही. माझी जन्मभूमी उत्तर प्रदेश सारनाथ बुद्धगया श्रावस्ती या ठिकाणाला मी नेहमीच भेटी देत असतो. तेथे गेल्यानंतर मनाला शांती आणि कमालीचे समाधान प्राप्त होते. डॉ. उपगुप्त महाथेरो यांचं धम्मकार्य बुद्ध धम्म प्रचार प्रसारासाठी करत असलेले त्यांचे प्रयास प्रशंसनीय आहे. डॉ. उपगुप्त महाथेरो आपल्या प्रमुख संबोधनांमध्ये प्रकाश टाकताना म्हणाले जगाला युद्ध नको आहे बुद्ध विचाराची गरज आहे. यावेळी नांदेड खुरगाव येथील भदंत पयाबोधी थेरो व श्रामनेर बाल भिक्खू संघ यांची उपस्थिती होती. भदंत पयाबोधी थेरो यांच्या हस्ते बुद्ध विहारावरील पंचरंगी धम्मद्वजाचे ध्वजारोहण मान्यवरांच्या उपस्थितीमध्ये करण्यात आले. यावेळी वसंतराव नाईक मराठवाडा कृषी विद्यापीठातील विभाग प्रमुख डॉ. विलास खर्गखराटे, शास्त्रज्ञ प्राध्यापक डॉ. नीता गायकवाड, डॉ. रामप्रसाद खंदारे, आत्माराम कुरवारे, भारत उबाळे यांची उपस्थिती होती.

भदंत डॉ. उपगुप्त महाथेरो यांनी महा बुद्ध वंदनेची पार्श्वभूमी विशद केली. महा बुद्ध वंदना पार पडल्यानंतर सार्वजनिक भीम बुद्ध जयंती मंडळ व बुद्ध विहार समितीच्या वतीने कुलगुरू इंद्र मनी यांचा बुद्ध मूर्ती, शाल, पुष्पहार व बुद्ध विहार लिंबूनि स्मरणिका देऊन सत्कार करण्यात आला. महाबुद्ध वंदना पार पडल्यानंतर वाद्य वृंदासह सजवलेल्या बुद्ध मूर्तीची मिरवणूक शहरातील प्रमुख मार्गाने काढण्यात आली. भारतरत्न डॉ. बाबासाहेब आंबेडकर चौकामध्ये या मिरवणुकीची सांगता झाली. डॉ. बाबासाहेब आंबेडकर चौकामध्ये पूर्णा पोलीस स्टेशनचे पोलीस निरीक्षक विलास गोबाडे, जयंती मंडळाचे सल्लागार प्रकाश कांबळे, जयंती मंडळाचे अध्यक्ष उत्तम खंदारे व जयंती मंडळाच्या पदाधिकाऱ्यांनी डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्या पुतळ्यास पुष्पहार अर्पण केले. या ठिकाणी पंचरंगी धम्म ध्वजाचे ध्वजारोहण जयंती मंडळाचे अध्यक्ष उत्तम खंदारे यांनी केले. यावेळी समता सैनिक दलाने ध्वजाला मानवंदना दिली. जयंती मंडळाचे अध्यक्ष उत्तम खंदारे, सल्लागार प्रकाश कांबळे यांनी जयंतीचे औचित्य साधून मनोगत व्यक्त केले. भदंत पयावंश यांच्या आशीर्वाद गाथेने कार्यक्रमाची सांगता झाली.

महाबुद्धवंदना यशस्वी करण्यासाठी सार्वजनिक भीम बुद्ध जयंती मंडळ बुद्ध विहार समिती, भारतीय बौद्ध महासभा धम्म सेवेमध्ये कार्यरत असलेली महिला मंडळ यांनी विशेष प्रयत्न केले. बोधाचार्य त्र्यंबक कांबळे, उमेश बाराटे, अतुल गवळी, अमृत कऱ्हाळे, किशोर ढाकरगे यांनी पार पडला. सूत्रसंचालन श्रीकांत शेवाळे यांनी केले. या कार्यक्रमास बौध्द उपासक व उपासिका पांढरे शुभ वस्त्र परिधान करून मोठ्या संख्येने सहभागी झाले होते.

# तथागत भगवान बुद्ध यांच्या विचारांची समाजाला गरज - कैलास गोरंट्याल

**तभा वृत्तसेवा**
**जालना/प्रतिनीधी**

शांतता प्रस्थापित करण्यासाठी विश्वाला शांतीचा संदेश देणारे तथागत भगवान गौतम बुद्ध यांचे विचार प्रेरणादायी असून त्यांच्या या मार्गदर्शक विचारांची समाजाला खऱ्या अर्थाने गरज आहे असे प्रतिपादन माजी आमदार कैलास गोरंट्याल यांनी येथे बोलतांना केले. जालना शहरातील अजंता बुद्धविहार, आनंदनगर आणि आदर्श नगर यांच्या संयुक्त विद्यमाने तथागत भगवान बुध्द यांच्या २५६९ व्या जयंतीनिमित्त आयोजित कार्यक्रमात गोरंट्याल बोलत होते. यावेळी प्रमुख मार्गदर्शक व अध्यक्ष अशोक नावकर, सदानंद टवले, शिवप्रकाश चीतळकर, संजय पाखरे, राहुल पवार आदींची प्रमुख उपस्थिती होती. यावेळी पुढे बोलतांना माजी आमदार कैलास गोरंट्याल म्हणाले की, तथागत भगवान गौतम बुद्ध यांचे शांतीचे विचार विश्वाने स्वीकारले आहे. भगवान बुध्दांच्या विचारात मोठी ताकत असून त्यांचे शांतीचे विचारच जगाला तारू शकतात असा विश्वास देखील गोरंट्याल यांनी यावेळी व्यक्त केला. कार्यक्रमाच्या प्रारंभी प्रमुख पाहुणे गोरंट्याल यांच्या हस्ते तथागत भगवान गौतम बुद्ध यांच्या पुतळ्यास पुष्पहार अर्पण करून अभिवादन करण्यात आले. कार्यक्रमाचे सुत्र संचालन सदानंद टवले यांनी केले. पौर्णिमा बौध्द धम्म महिला महासंघ, जेष्ठ नागरिक, बाल बालीका जयंती उत्सव समितीचे सचिव रवि शिंदे, अर्जून जाधव राजे, अशोकराव पंडित, अक्षय निवारण, सागर कदम, सुंदर साळवे, के. टी. हिवाळे, संजय वेव्हल, सोनाजी नावकर, भुजंगराव भिसे, हिम्मतराव मस्के, भिमराव पांडव, संजय खरात, परिसरातील उपासक हजर होते.. कार्यक्रमा नंतर भोजन दान करण्यात आले. शेवटी आभार माधुरी वेव्हल मोरे यांनी मानले.





## संक्षिप्त

### अफ़रा नहदियाला दहावीच्या परीक्षेत ९३.६० टक्के गुण



**तभा वृत्तसेवा**
**जालना / प्रतिनिधी**

महाराष्ट्र राज्य माध्यमिक आणि उच्च माध्यमिक शिक्षण मंडळ, पुणे मंडळाने फेब्रुवारी-मार्च २०२५ घेतलेल्या दहावीच्या परीक्षेचा निकाल मंगळवारी जाहीर झाला . जालना शहरातील उर्दू हायस्कूलची विद्यार्थिनी अफ़रा नहदिया लियाकत अली खान यासीर हिने ९३.६० टक्के गुण घेत विशेष प्राविण्यासह यश मिळवले आहे. अफरा नहदिया ही ज्येष्ठ पत्रकार लियाकत अली खान यासिर यांची कन्या आहे. अफरा नहदिया लियाकत अली खान यासिर हिच्या या उल्लेखनीय यशाबद्दल अंजुमन ईशात ए तालिम उर्दू हायस्कूलचे सचिव मुहम्मद इफ्तिखारुद्दीन, मुख्याध्यापक मुहम्मद नबील अहमद, वर्गशिक्षिका रईसा बाजी, मौलाना मुहम्मद इब्राहिम, अर्शद सर आणि इतर शिक्षक आणि नातेवाईक, मित्रांनी तिचे स्वागत केले आहे.

### बारावीच्या परीक्षेत कू. श्रावणी शेवाळे तिचे घवघवीत यश



**तभा वृत्तसेवा**
**जाफराबाद/ प्रतिनिधी**

महाराष्ट्र राज्य माध्यमिक व उच्च माध्यमिक मंडळात तर्फे घेण्यात आलेल्या बारावी परीक्षेचा सोमवारी निकाल जाहीर झाला जवखेडा येथील राजेश संभाजी माध्यमिक उच्च माध्यमिक विद्यालय जवखेडा ठेग विद्यार्थिनी कु श्रावणी सविता दामोधर शेवाळे हिने विज्ञान शाखेत ८६ टक्के गुण घेऊन शाळेतून दुसरा क्रमांक पटकावला या घवघवीत यशाबद्दल अध्यक्ष सुरेखा लहाने, संजय लहाने, माजी नगरसेवक कैलास दिवटे, वसंता शेवाळे शेख रिजवान सर आदींनी अभिनंदन केले .

### श्री योगानंद माध्यमिक विद्यालयाची SSC परीक्षेत निकालाची उज्वल परंपरा कायम

**तभा वृत्तसेवा**
**परतुर / प्रतिनिधी**

परतूर शहरातील गुणवत्ता आणि शिस्त यासाठी प्रसिध्द असणाऱ्या श्री योगानंद माध्यमिक विद्यालयातील विद्यार्थ्यांनी दहावीच्या परीक्षेत उज्वल यश संपादित करून आपली परंपरा कायम राखली. परतूर तालुक्यात सर्वात जास्त विद्यार्थी असलेली शाळा आहे. मार्च २०२५ मध्ये झालेल्या दहावीच्या परीक्षेत एकूण ३३० विद्यार्थी परीक्षेत बसले होते त्यापैकी ३१५ विद्यार्थी परीक्षेमध्ये उत्तीर्ण झाले एकूण निकालाची टक्केवारी ९५.४५% असून या विद्यालयात ७५ टक्के पेक्षा जास्त मार्क घेणारे एकूण ५८ विद्यार्थी व प्रथम श्रेणीमध्ये उत्तीर्ण होणारे ११४ विद्यार्थी आहेत या विद्यालयातील गुनानुक्रमे यशस्वी विद्यार्थी

१) कु.रिद्धी राम बागल ९६% ( प्रथम )
२) अजिंक्य यशवंत शेजुळ ९५.२०% ( द्वितीय )
३) अविराज मनोज सोनटक्के ९४.८०% (तृतीय)
४) कु.कार्तिकी भागवत भानुसे ९३.६०%
५) यश गोपाल जोशी ९३.४०%
६) कु.सायली देवीनाथ मातने ९२.६०%
७) अजय विलास काकडे ९२.२०%
८) कु.श्रुती विनोद केंदळे ९१.८०%
९) कु.शिवकन्या रामेश्वर काकडे ९०.६०%
१०) वंश श्यामकुवर शुद्धोधन ९०.६०%

सर्व यशस्वी विद्यार्थ्यांचे व पालकांचे मुख्याध्यापक हरिभाऊ मोगल पर्यवेक्षक वसंत थोरवे व कार्याध्यक्ष रवीं चंद्रकांतजी पाटील, उपाध्यक्ष रवीं लक्ष्मीकांतराव लिंबुळकर, संस्थापक मनोहरराव पेडगावकर, कोषाध्यक्ष सुनील जी दायमा ,सचिव प्रभाकरराव कुलकर्णी, सहसचिव अशोकराव उबाळे, तसेच सर्व शिक्षक शिक्षकेतर कर्मचारी यांच्या वतीने अभिनंदन करण्यात आले आहे.

## वडिग्रोद्री श्री गुरुदेव विद्यामंदीर महाविद्यालयात गुणवंत विद्यार्थ्यांचा सत्कार सोहळा पार पडला

**तभा वृत्तसेवा**
**अंबड / प्रतिनिधी**

वडिगोद्री येथील श्री गुरुदेव विद्यामंदिर येथे १२ वी विज्ञान व कला शाखेतील गुणवंत विद्यार्थ्यांचा सत्कार सोहळा अत्यंत उत्साहात पार पडला अंबड तालुक्यातील वडीगोद्री येथील श्री गुरुदेव विद्या मंदिर वडीगोद्री या कार्यक्रमात गुणवंत विद्यार्थी, त्यांचे पालक, आदरणीय राजकीय व सामाजिक क्षेत्रातील मान्यवर पाहुणे, शिक्षकवृंद तसेच संपूर्ण मित्र परिवार मोठ्या संख्येने उपस्थित होता. कार्यक्रमाच्या निमित्ताने प्रमुख पाहुण्यांनी विद्यार्थ्यांच्या यशाचे कौतुक करताना, भविष्यातील वाटचालीतील आव्हाने व संधी यावर मार्मिक आणि प्रेरणादायी मार्गदर्शन केले. येणाऱ्या काळात विद्यार्थ्यांच्या सर्वांगीण विकासासाठी आवश्यक असणारे पाठबळ गावकऱ्यांमार्फत शाळेला पुरवले जाईल, अशी ग्वाहीही सर्व मान्यवरांनी दिली. हा गौरवसोहळा केवळ विद्यार्थ्यांचाच नव्हे, तर संपूर्ण गावासाठी अभिमानास्पद क्षण होता. आपण सर्वजण आपली उपस्थिती दाखवून कार्यक्रमाची शोभा वाढवली, त्याबद्दल आपले आणि संपूर्ण मित्र परिवाराकडून मनःपूर्वक आभार अभिजीत भैया खटके व मित्र परिवारातुन अभिनंदनाचा वर्षाव होत आहे .



## मुली आणि महिलांसाठी मोफत ड्रायव्हिंग प्रशिक्षणाचे आयोजन; प्रशिक्षण पुर्ण करणार्यांना स्वसंरक्षणाचेही प्रशिक्षण दिले जाणार

**तभा वृत्तसेवा**
**जालना / प्रतिनिधी**

जालना जिल्ह्यातील बरोजगार महिला आणि मुलींसाठी मोफत ड्रायव्हिंग प्रशिक्षणाचे आयोजन करण्यात आले असून त्यासाठी दि. २० मे २०२५ रोजी दुपारी १२ वाजेपर्यंत ऑनलाईन अथवा ऑफलाईन पध्दतीने अर्ज सादर करण्याचे आवाहन उज्वल बहुउद्देशीय सेवाभावी संस्थेच्या अध्यक्षा सौ. करुणा मोरे यांनी केले आहे. उज्वल बहुउद्देशीय सेवाभावी संस्थेच्या वतीने शाळकरी मुली आणि महिलावर होणारे अत्याचार कमी करण्यासाठी महिलांना सक्षम करुन त्यांच्या सुरक्षेसह रोगाराचा प्रश्न सोडविण्यासाठी एक महत्त्वपूर्ण पाऊल उचलले आहे. शाळा आणि महाविद्यालय तसेच महिला उद्योगपती, महिला अधिकारी यांच्या वाहनावर महिलांना वाहनचालक म्हणून नियुक्ती दिल्यास शाळकरी मुली आणि महिलावरील अत्याचाराचे प्रमाण कमी होईल, हा या उपक्रमाचा हेतु आहे. त्यामुळे जालना जिल्ह्यात पायलट प्रोजेक्ट म्हणून १९ ते ३५ वयोगटातील गरजू मुली अथवा महिला लाभार्थ्यांना प्रशिक्षण देण्यात येणार आहे. बेरोजगार, विधवा, परित्यक्ता महिलांना या प्रशिक्षासाठी प्राधान्य देण्यात येणार आहे. ज्या मुली बेरागजागर आहेत आणि पोलीस भरतीची तयारी करीत आहेत, अशा मुलींनाही प्रशिक्षण देण्यात येणार आहे. प्रशिक्षण पुर्ण केल्यानंतर त्यांना शाळा किंवा महाविद्यालयाच्या स्कुल व्हॅन किंवा महिलांच्या वाहनावर वाहन चालक म्हणून काम करण्याची संधी मिळणार आहे. शिवाय ड्रायव्हिंग प्रशिक्षण पुर्ण केलेल्या मुलींना आणि महिलांना १० दिवसाचे स्वसंरक्षण आणि शारीरीक विकास या विषयावर प्रशिक्षण देण्यात येणार आहे. त्यामुळे गरजू मुली आणि महिलांनी जास्तीत-जास्त अर्ज करावेत असे आवाहन संस्थेच्या अध्यक्षा सौ . करुणा मोरे यांनी केले आहे.

## भाजपाच्या जालना जिल्ह्यातील राजकारणाला कलाटणी; भाजपा जिल्हाध्यक्ष पदाच्या निवडीत आ. लोणीकरांची चाणक्य नीति यशस्वी

### भाजपा जालना ग्रामीण जिल्हाध्यक्ष पदाच्या निवडीत लोणीकर गटाचे वर्चस्व; जिल्हाध्यक्षपदी आ. नारायण कूचे यांची निवड

तभा वृत्तसेवा
जालना /प्रतिनिधी

जालना जिल्हा भारतीय जनता पार्टीच्या ग्रामीण व महानगर जिल्हाध्यक्ष पदाची निवड कोणाची होईल याबाबत वेगवेगळे कयास बांधले जात असताना मागील अनेक वर्षापासून माजी खा.रावसाहेब दानवे यांचे वर्चस्व असणाऱ्या जिल्ह्याच्या पक्षीय राजकारणाला कलाटणी बसली असून मागील अनेक वर्षांपासून जिल्ह्याच्या राजकारणातून हेतू पुरस्सर बाजूला ठेवण्याचा प्रयत्न करण्यात आलेले भारतीय जनता पक्षाचे ज्येष्ठ नेते आमदार बबनराव लोणीकर यांच्या गटाचे वर्चस्व सिद्ध झाले असून भाजपा जालना ग्रामीण जिल्हाध्यक्षपदी आमदार नारायणराव कुचे यांची निवड करण्यात आली आहे या निमित्ताने आमदार लोणीकरांची चाणक्य यशस्वी ठरली आहे. माजीमंत्री आमदार बबनराव लोणीकर आणि माजी खा.रावसाहेब दानवे यांच्यातले सख्य जिल्ह्यातील सर्व जनतेस माहित असून, माजी मंत्री आमदार बबनराव लोणीकर यांनी चाणक्य नीतीचा वापर करत बदनापूर चे आमदार नारायण कुचे यांच्या पाठीशी पाठबळ उभे करून जिल्ह्याच्या राजकारणाला एक वेगळी कलाटणी दिली आहे. अनुसूचित जाती प्रवर्गातील चर्मकार समाजाच्या कार्यकर्त्याला न्याय मिळवन देण्यासाठी आमदार बबनराव लोणीकर यांनी प्रयत्नांची पराकाष्ठा केली होती. भाजपा जिल्हाध्यक्ष निवडीसाठी पक्षाच्या वतीने राबवण्यात आलेल्या मध्यप्रदेश पॅटर्न प्रमाणे जिल्हा निहाय कोअर कमिटी तयार करण्यात आली होती त्या कोर कमिटीच्या शिफारशीनुसार आमदार नारायण कुचे यांच्याकडे २६ पैकी १४ शिफारशी होत्या. त्यानुसार आमदार नारायण कुचे यांची निवड करण्यात आली त्यामध्ये १४ पैकी ८ शिफारशी आमदार बबनराव लोणीकर यांच्या आणि ६ शिफारशी आमदार नारायण कुचे यांच्या गटाच्या होत्या. तर रावसाहेब दानवे यांच्या गटाकडून माजी जिल्हाध्यक्ष बद्री पठाडे व आशाताई माळी या दोघाच्या नावे कोअर कमिटीच्या २६ पैकी ११ शिफारशी होत्या.आगामी काळात होऊ घातलेल्या जिल्हा परिषद पंचायत समितीच्या निवडणुकीमध्ये निश्चितच माजी मंत्री आमदार बबनराव लोणीकर गटाचे पारडे जड झाले असून येणाऱ्या निवडणुकीचा फायदा जिल्हाध्यक्ष नारायण कुचे यांच्या माध्यमातून आमदार लोणीकर गटाला मिळणार असल्याचे बोलले जात आहे आमदार लोणीकर यांच्या गटाने नारायण कुचे यांच्या रूपाने जालना ग्रामीण जिल्ह्याला अनुभवी जिल्हाध्यक्ष मिळाला असून पक्ष संघटना वाढीसाठी निश्चितच या बाबीचा फायदा होणार आहे. आमदार नारायण कुचे यांच्या रूपाने जालना ग्रामीण जिल्हाध्यक्ष पदासाठी अनुभवी कार्यकर्ता मिळाला असून या निवडीबद्दल माजी मंत्री आमदार बबनराव लोणीकर यांनी मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस प्रदेशाध्यक्ष चंद्रशेखर बावनकुळे भाजप महाराष्ट्र प्रदेश कार्यकारी अध्यक्ष आमदार रवींद्र चव्हाण यांचे आभार मानले आहेत..



## मंठा ग्रामीण रुग्णालयात परिचारिका दिन साजरा

**तभा वृत्तसेवा**
**मंठा / प्रतिनिधी**

दरवर्षी १२ मे हा जागतिक परिचारिका दिन महणून साजरा करण्यात येतो त्या नुसार आज मंठा ग्रामीण रुग्णालयात व ढोकसाळ येथे परिचारिका दिन साजरा करण्यात आला .आपल्या जीवाची पर्वा न करता आरोग्य सेवेसाठी आणि रुग्ण सेवेने सेवेसाठी अहोरात्र कार्य करणारे सर्व परिचारिका याची हा दिन जागतिक परिचारिका दिं महणून साजरा केला जातो .ग्रामीण रुग्णालय मंठा व प्राथमिक आरोग्य केंद्र ढोकसाळ येथे हा दिन साजरा करण्यात आला यावेळी प्रमुख पाहुणे महणून डॉ मनिष धांडे,डॉ अमर मोरे ,आरोग्य सहाय्यक सुजीत वसंतराव वाघमारे अशोक आढे विलास देशमुख राम काळे हजर होते यावेळी अधिपरीचारीका श्रीमती.मिना पालवे, श्री.निलेश सुर्यवंशी, श्रीमती. श्रद्धा हजबे, श्रीमती.परवीन सय्यद, श्रीमती.सीमा शेळके, श्रीमती. प्रतीक्षा वाघमारे, श्रीमती.दिपाली कल्याणकर श्रीमत मयुरी झोड .शिल्पा बोरकर बबीता केसकर ज्योती घेणे मंजुषा देशमाने शुंभागी रोटे प्रियंका दाभाडे हजर होते .



## मंठा बसस्थानक खाजगी वाहनांचे वाहन तळ ?

### अवैध प्रवासी वाहतूक करणारे सेलु , जालना असा आवाज देत बस स्थानकातुन पळवतात प्रवासी बस स्थानकामध्ये बस ऐवजी खाजगी वाहनांचा ठिय्या ; वाहतूक नियंत्रकांचे दुर्लक्ष का ? हितसंबंध !

**तभा वृत्तसेवा**
**मंठा / प्रतिनिधी**

मंठा बस स्थानकामध्ये बस कमी आणि खाजगी वाहने जास्त उभी राहत असल्याची परिस्थिती सध्या शहरातील बस स्थानकावर दिसत आहे मंठा बस स्थानक नसून खाजगी वाहनांचे ''स्थानक'' झाले असल्याचे दिसून येते. याप्रकरणी शासनाच्या नियमांना मंठा बस स्थानकाकडून काळीमा फासल्याचे दिसून येत आहे. मंठा शहरातील बस स्थानकामध्ये खाजगी वाहने दिवसभर उभी राहतात. याचबरोबर अवैध प्रवासी वाहतूक करणारी वाहने देखील व स्थानकामध्ये मोठ्या प्रमाणात येतात. व तेथील प्रवासी पळवून नेतात जालना , सेलू असा आवाज देऊन मंठा बस स्थानकातून प्रवासी पळविण्याचा प्रकार हा वाहतूक नियंत्रक यांच्यासमोर घडतो.परंतु याकडे वाहतूक नियंत्रक दुर्लक्ष का करतात हे मात्र कळत नाही. आधीच महामंडळ हे घाट्यात जात असून त्यात खाजगी वाहतूक दाराकडून मंठा बस स्थानकातील प्रवासी पळून नेण्याचा प्रकार वाढला आहे. याकडे सोयीस्कर वाहतूक नियंत्रक दुर्लक्ष करत असल्याचे दिसून येते. खाजगी वाहना संबंधित माहिती विचारण्यासाठी प्रतिनिधींनी विचारणा केली असता त्यांनी सांगितले की या प्रकरणी स्थानिक मंठा पोलीस ठाणे वारंवार पत्र व्यवहार केला असल्याचे बस स्थानक प्रशासनाकडून सांगण्यात आले. मंठा हे तालुक्याचे ठिकाण असल्यामुळे बस स्थानकामध्ये मोठ्या प्रमाणावर प्रवाशांची मोठ्या प्रमाणात ये-जा असते. परंतु मंठा बस स्थानकातील प्रवासी हे खाजगी अवैद्य वाहतूक करणारे पळवून नेल्याचा प्रकार या बस स्थानकामध्ये मोठ्या प्रमाणात होताना दिसतो. बस स्थानकामध्ये आपले खाजगी काळी पिवळी व टमटम हे वाहन लावून सेलू जालना असा आवाज देऊन प्रवासी पळून नेले जातात. विशेष म्हणजे वाहतूक नियंत्रक यांच्यासमोर हा प्रकार घडतो. परंतु ते दुर्लक्ष का करतात. हितसंबंध जपतात का आणखीन काही हे मात्र गुलदस्त्यात.



## जालना शहरात सरास अवैध धंदे ; पोलिसांचे जाणीपूर्वक दुर्लक्ष ?

### पोलिस अधीक्षकांनीच पुढाकारने जालना शहरातील अवैधरित्या चालणारे अवैधधंदे बंद करावे !

**तभा वृत्तसेवा**
**जालना / प्रतिनिधी**

जालना शहरात अवैध धंदे जोमात सुरू आसताना जालना शहरातील विविध भागांत बिनदिक्कत अवैधरित्या गुटखा , मटका , लॉट्री यांसारखे अनेक अवैध धंदे सुरु असल्याचे वरिल छायाचित्रांमध्ये दिसुन आले आहे. यावर जालना पोलिस तसेच जालना शहरातील ईतर पोलिस ठाणे हद्दीतील पोलिसांचा धाक राहिला नसल्याचे स्पष्ट दिसुन येत आहे . अधिक पैशांचे आमिष दाखवून गोरगरीब जनतेला लुटण्याचा धंदाच जालना शहरात जोमात सुरु आहे. जालना शहरातील बसस्थानक, भोकरदन नाका, लक्कडकोट, चंदनझिरा, एमआयडीसी, शनिमंदीर, नूतन वसाहत, गांधी चमन, रेल्वे स्थानक, मस्तगड, अलंकार टॉकिज परिसर, सिंधी बाजार, शोला चौक, गांधी नगर, मंगळ बाजार, आझाद मैदान परिसर, फूल बाजार, कन्हैयानगर, नवीन मोंढा या भागांत मटका , लॉट्री , चक्री यांसारख्या अवैधरित्या धंदयावाल्यांचे बस्तान घातले आहे . याची माहिती स्थानिकच्या हद्दीत येत असलेल्या पोलीस ठाण्यातील काही कर्मचाऱ्यांनाही माहीत आहे कारवाई मात्र जाणीवपूर्वक केली जात नसल्याचे सामान्य जणतेतून बोलले जाते .विशेष म्हणजे काही मटका घेणा-या बुकींना मालक बहादूरांना पोलिसांनी हद्दपार केले असले तरी त्यांचे नेटवर्क अजूनही सुरुच असल्याचे दिसते. यामध्ये मोठे रॅकेट सक्रिय असून, आजी माजी नगरसेवक व काही राजकारण्यांचा सहभाग असल्याचे बोलले जात आहे. अवैध धंद्यांना लगाम लावून कारवाईचा करण्यासाठी जालना शहरातील काही समाजसेवकांनी अनेकवेळा निवेदनही देण्यात आली मात्र पोलिसांची उदासिनता दिसून येते .या अवैधरित्या चालवणाऱ्या धंदेवाल्यांविरोधात आता पोलिस अधीक्षक श्री बंन्सल साहेब यांनीच पुढाकार घ्यावा व कडक मोहीम हाती घेण्याची जणसामान्यांतुन मागणी होत आहे. तरी जालण्याचे शिष्तप्रिय पोलिस अधीक्षक श्री बंन्सल साहेब या अवैध धंदे खेळणारे व खेळवणाऱ्या बुक्की चालकांवर योग्य ति कारवाई करण्यात यावी अशी मागणी जालना शहरवासियांतुन होत आहे .




## परतूरच्या लालबहादूर शास्त्री विद्यालयाची उज्वल यशाची परपरा यंदाही कायम

**तभा वृत्तसेवा**
**परतूर / प्रतिनिधी**





येथील छत्रपती शिवाजीनगर भागातील लालबहादूर शास्त्री विद्यालयाचा दहावीचा निकाल ८५.३६ टक्के एवढा लागला असून विद्यालयाने आपली यशाची परंपरा यंदाही कायम राखली आहे.विद्यालयाच्या आदित्य विजय अवचार या विद्यार्थ्याने सर्वाधिक ९३.८० टक्के गुण मिळवित विद्यालयातून पहिला, हर्षद विलास काळे याने ९२.२० टक्के गुण मिळवून दुसरा तर समृद्धी कल्याणराव गाडगे हिने ८९ टक्के गुण मिळवत तिसरा क्रमांक पटकावला. छत्रपती संभाजीनगर विभागीय मंडळाने दहावी परीक्षेचा निकाल मंगळवारी घोषित केला. शास्त्री विद्यालयाच्या एकूण २०५ विद्यार्थ्यांनी परीक्षा दिली.यामध्ये विशेष प्राविण्यासह १४,प्राविण्य मिळवत ९, प्रथम श्रेणीत ४२ द्वितीय श्रेणीत ६८ तर पास श्रेणीत ४२ उत्तीर्ण झाले आहेत. प्रसाद काकडे, कृष्णा कदम, संस्कार कदम, आकांक्षा साठे, युवराज सवणे, विशाल वाघमारे या विद्यार्थ्यांनी ८० टक्क्याहून अधिक गुण मिळविले. यशस्वी विद्यार्थ्यांचे मराठवाडा सर्वोदय शिक्षण प्रसारक मंडळाच्या अध्यक्षा श्रीमती आशाताई आकात, सचिव कपिल आकात, उपाध्यक्ष डॉ. कुणाल आकात, मुख्याध्यापक एल. के. बिरादार, पर्यवेक्षक राजकुमार राऊत, त्र्यंबक घुगे यांच्यासह विद्यालयाचे सर्व शिक्षक, शिक्षिका व शिक्षकेतर कर्मचाऱ्यांनी अभिनंदन केले आहे.

**आमच्या लालबहादूर शास्त्री विद्यालयात शिक्षण घेणारे बहुतांश विद्यार्थी हे ग्रामीण भागातील आहेत. यातील अनेक विद्यार्थ्यांनी खासगी शिकवणी न लावता केवळ शाळेत दररोज उपस्थित राहून व शाळेने दिलेला अभ्यास नियमितपणे करून हे यश मिळविले आहे.**
**– एल. के. बिरादार, मुख्याध्यापक.**

## अग्रलेख...

# अब रण होगा!

पहलगाममध्ये पर्यटकांवर क्रूर हल्ला करून २६ निष्पापांचे बळी घेण्याच्या पापात पाकिस्तानचा सहभाग असल्याचा स्पष्ट ठपका ठेवत दहशतवाद्यांच्या नांग्या ठेचण्याकरिता भारताकडून तीव्र प्रतिक्रिया उमटण्याची चिन्हे स्पष्ट होऊ लागली, तसतशी येथील मानवतावाद्यांची मने कळवळू लागली. युद्धाने कोणाचेच भले होत नसते, असा सूर आळविला जाऊ लागला. भारताने युद्ध पुकारले नसून पकिस्तानी हल्ल्याच्या प्रतिकाराची मर्यादितच भूमिका घेत केवळ दहशतवाद्यांचे अड्डे उद्ध्वस्त करणे हेच उद्दिष्ट असल्याचे जाहीर केल्यानंतरही, गेल्या १० तारखेस पाकिस्तानच्या प्रस्तावानुसार युद्ध थांबविण्याचा निर्णय भारताने जाहीर करताच, त्या क्षणापर्यंत भारतावर युद्धखोरीचा ठपका ठेवणारी तोंडे अचानक विरुद्ध बाजूला वळली आणि वस्तुस्थितीची पूर्ण माहिती असूनही भारताच्या शस्त्रसंधीच्या पवित्र्याविरोधात बोटे मोडण्यास सुरुवात झाली. असा दुटप्पीपणा जेव्हा दिसतो, तेव्हा जनतेच्या मनात सरकारच्या आणि सैन्यदलांच्या क्षमतेबाबत संभ्रम पसरविण्याचाच तो थेट प्रयत्न असतो असे मानावयास हरकत नाही. पाकिस्तानी सैन्याकडून भारतावर सुरू झालेल्या गोळीबाराच्या आणि क्षेपणास्त्र माऱ्याचा मुकाबला करून त्यांचे आक्रमण थोपविण्याच्या जोरदार प्रत्युत्तराने पाकिस्तानचे कंबरडे मोडले, अस्तित्वभयाची तीव्र जाणीव सतावू लागल्यावर जगासमोर बचावाच्या याचनेसाठी हात पसरण्याची वेळ पाकिस्तानवर आली आणि भारताला डिवचल्याचे भयानक परिणाम पाकिस्तानला आणि कदाचित संपूर्ण जगालादेखील भोगावे लागतील याची जाणीव झालेल्या अमेरिकेने आगंतुकपणे युद्धविरामाची घोषणादेखील करून टाकली. गेल्या दोन-तीन दिवसांतील या घडामोडींमागचे वास्तव एव्हाना स्पष्टपणे उघड झाले आहे. गेल्या १० मे रोजी दुपारी साडेतीन वाजता पाकिस्तानी लष्कराच्या महासंचालकाने भारतीय लष्कराच्या महासंचालकांशी तातडीचा संपर्क साधला आणि दोन्ही बाजूंच्या लष्करी कारवाया थाबविण्याचा निर्णय झाला. खरे म्हणजे, भारताच्या लष्कराने सुरू केलेल्या 'ऑपरेशन सिंदूर' मोहिमेचा तो पहिला दणदणीत विजय होता, पण ज्या तोंडांनी त्याआधी 'युद्ध नको' असा घोशा लावला होता, त्यांनीच या निर्णयानंतर भारत सरकारच्या निर्णयावर, लष्कराच्या क्षमतेवर शंका घेत बेबंद तोंडसुख घेण्यास सुरुवात केली. प्रत्यक्षात लष्करी कारवाई थांबविण्याच्या पाकिस्तानच्या त्या प्रस्तावासही भारताने सशर्त संमती दिली होती आणि या दरम्यान कोणतीही आगळिक झालीच तर ते भारताविरोधातील युद्ध असल्याचे मानून सडतोड प्रत्युत्तर दिले जाईल, असेही त्याच वेळी भारताने स्पष्ट केले होते, ही बाब या दुतोंडी जमातीस चांगलीच माहीत असतानाही संभ्रम पसरविण्याची सुवर्णसंधी समजूनच गळे काढण्याचा कांगावा सुरू झाला होता. पण हे सोंगही त्यांना फार काळ टिकविता आले नाही. युद्ध थांबविण्याचा निर्णय होऊन काही तास उलटण्याच्या आधीच पाकिस्तानकडून भारतीय सीमेवरील अनेक नागरी वस्त्यांवर गोळीबार, क्षेपणास्त्रांचा मारा सुरू झाला आणि भारताने युद्ध थांबविण्यास संमती देताना घातलेल्या अटींचा अधिकार वापरत पुन्हा एकदा जोरदार प्रत्युत्तर देत पाकिस्तानला खिळखिळे करून टाकले.

भारत आणि पाकिस्तानच्या लष्करी कारवाई महासंचालकांमधील चर्चेची दुसरी फेरी सोमवारी पार पडली आहे. पाकिस्तान हे विश्वासघातकी राष्ट्र आहे, आंतरराष्ट्रीय कायद्यांचे पालन करण्याची या देशाची नियत नाही आणि अगोदर कबूल केलेल्या कोणत्याही बाबीचे पालन करण्याचा प्रामाणिकपणाही या देशाच्या नेतृत्वाकडे नाही, हे गेल्या पाऊणशे वर्षांपासून सातत्याने भारताने अनुभवलेले असतानाही, केवळ आंतरराष्ट्रीय नीतीचे पालन करण्याच्या प्रामाणिक हेतूपोटी भारताने १० मे रोजी पाकिस्तानच्या त्या प्रस्तावाचा स्वीकार केला होता. प्रत्यक्षात तो निर्णय म्हणजे युद्धबंदी किंवा युद्धविराम नव्हताच, तर केवळ परस्परांविरोधात शस्त्रे न चालविण्याच्या प्रस्तावास संमती होती हेही भारताने स्पष्ट केले होते. त्याखेरीज, भारताची लष्करी कारवाई म्हणजे पाकिस्तानी लष्कराविरोधात किंवा तेथील सामान्य जनतेच्या विरोधात नसून पाकिस्तानच्या आश्रयाने भारतविरोधी कारवाया करणाऱ्या दहशतवाद्यांचे कंबरडे मोडून त्यांचे अड्डे उद्ध्वस्त करण्यापुरतीच मर्यादित आहे, हे भारताने वारंवार जगाला समजावून सांगितलेले असल्याने, भारताच्या बाजूने झालेली लष्करी कारवाई हे तर केवळ पाकिस्तानच्या लष्करी आगळिकीला प्रत्युत्तर होते, हेही स्पष्ट झाले होते.

एखादे अंतःकरण भूतदयेने कितीही ओथंबलेले असले, तरी पिसाळलेल्या कुत्र्याचा बंदोबस्त झाला पाहिजे यावर कोणाचेच दुमत नसते. पाकिस्तानच्या संदर्भात सध्या भारताच्या बहुसंख्य जनतेची हीच मानसिकता आहे. या उपद्रवी देशाचा कायमचा बंदोबस्त करण्याची वेळ त्यांनी स्वतःहूनच ओढवून घेतली असून आपल्या सातत्यपूर्ण आगळिकीने भारतास वारंवार त्यासाठी आमंत्रणच दिले असल्याने ही संधी भारत गमावणार नाहीच, पण या संधीच्या निमित्ताने पाकिस्तानकडून येणे असलेले जुने हिशेबदेखील पूर्ण करण्याची तयारी आता भारताकडून सुरू झाली आहे. युद्ध ही आर्थिकदृष्ट्या परवडणारी बाब नसते. येत्या काही दिवसांत जेव्हा पाकिस्तान पुरता कंगाल झालेला असेल, तेव्हा भविष्यकाळाने त्या देशाच्या अस्तित्वाचा अंतिम निर्णय घेण्याची कारवाई सुरू केलेली असेल. भारत हे त्यासाठी केवळ निमित्तमात्र ठरणार आहे. ही प्रक्रिया सुरू होईल तेव्हा भारतीय उपखंडाचा भूगोलही बदललेला असेल आणि नव्या भविष्यनिर्माणाची प्रक्रिया सुरू झालेली असेल. पाकिस्तानच्या निर्मितीपासूनच्या इतिहासात प्रत्येक वेळी भारताने या देशासोबत सुरळीत संबंध राखण्याच्या प्रयत्नांस प्राधान्य दिले होते. मात्र पाकिस्तानकडून त्याला कधीच सकारात्मक प्रतिसाद मिळाला नाही. उलट, दहशतवादी कारवाया घडवत भारतास अस्थिर, असुरक्षित राखण्याचे कुटिल कारस्थान सातत्याने रचले गेले. गेल्या काही दिवसांतील भारताकडून सडेतोड लष्करी कारवायांमुळे आता ही परंपरागत भावना मावळण्याची चिन्हे दिसू लागली आहेत आणि भूतकाळाच्या भयाचे भूत गाडून टाकून नव्या भविष्याची आखणी करण्याची भारताची उमेद बळावली आहे. आता पाकिस्तानला भारताकडून मिळणाऱ्या वागणुकीचा बाज पूर्णपणे उलटा झाला आहे आणि नवा भारत त्यामध्ये बदल करेल याची शक्यताही संपली आहे. काश्मीर हा भारताचा अविभाज्य भाग आहे, त्या भूमिकेत कोणतीही तडजोड नाहीच, पण पाकिस्तानने बेकायदेशीरपणे बळकावलेला काश्मीरचा भागही भारताला परत मिळाला पाहिजे ही भूमिका भारताने आपल्या शक्तीच्या जोरावर अधिक मजबूत केली आहे. गेल्या अनेक दशकांच्या आगळिकीचे माप पाकिस्तानच्या पदरात घालण्यासाठी सिंधू पाणीवाटप करार स्थगित ठेवण्याची भारताची भूमिका कायम राहिली तर या देशात अराजकाखेरीज अन्य काहीच दिसणार नाही. काश्मीर प्रश्नात उभय देशांखेरीज कोणताही हस्तक्षेप मान्य होणार नाही ही भूमिका घेऊन भारताने अमेरिकेची श्रेयाची धडपडही थांबविली आहे आणि भारतात अतिरेकी कारवाया घडविणाऱ्या प्रत्येक दहशतवाद्याचा हिशेब पूर्ण करण्यासाठी पाकिस्तानलाच भाग पडेल, अशी रणनीती आखली जात आहे. गेल्या आठवडाभरात भारताने पाकिस्तानचे कंबरडे मोडले, अतोनात नुकसान करून पाकिस्तानी सैन्याला जेरीस आणले, लष्करी सामर्थ्याचे पूर्ण खच्चीकरण केले, एवढीच माहिती भारतीयांसमोर उघड झाली आहे. कारवाई यशस्वी करणे एवढेच सैन्याचे काम असते. या कारवाईत कामी आलेले शत्रुपक्षाचे मृतदेह मोजणे हे आमचे काम नाही, असे सांगून भारतीय सैन्यदलाने पाकिस्तानच्या हानीची ढोबळ जाणीव जगाला करून दिलीच आहे. भूतकाळाच्या पापाचे माप पाकिस्तानच्या पदरात पडले आहे, हा याचा अर्थ आहे. पाकिस्तान जे भोगतो आहे, ते त्या देशाचे वर्तमान आहे आणि त्याचे परिणाम हे त्याचे भविष्य असेल. या साऱ्यात, भूगोल नावाची आणखी एक गोष्ट दडलेली आहे. इतिहास, वर्तमान आणि भविष्याच्या या खेळात भूगोलदेखील बदललेला दिसेल, तेव्हा त्याचे संपूर्ण श्रेय केवळ भारताच्या कर्तबगारीला दिले जाईल यातही शंका नाही.

## आंतरराष्ट्रीय

प्रा. जयसिंग यादव

# 'जैश'ला धडा; मसूदचा अस्त जवळ

भारताने पाकिस्तानवर केलेल्या हल्ल्यानंतर 'जैश-ए-मोहम्मद' या अतिरेकी संघटनेने संघटनेचा प्रमुख मसूद अझहरच्या कुटुंबातील दहा सदस्य आणि चार जवळचे सहकारी मारले गेले आहेत, हे मान्य केले. मृतांमध्ये मसूद अझहरची मोठी बहीण आणि मेहुणे, पुतण्याची पत्नी आणि भाची, पाच मुले यांचा समावेश आहे. पाकिस्तानमधील बहावलपूर येथील सुभान अल्लाह मशिदीवरील हल्ल्यात मसूद अझहरचे नातेवाईक मृत्युमुखी पडले आहेत. याच बहावलपूरमध्ये १० जुलै १९६८ रोजी अल्लाहबक्ष साबीरच्या कुटुंबात मसूद अझहरचा जन्म झाला. अझहरचे वडील साबीर बहावलपूरमधील एका सरकारी शाळेचे मुख्याध्यापक होते. ७ मार्च २०२४ रोजी भारताच्या गृह मंत्रालयाने जाहीर केलेल्या 'मोस्ट वॉण्टेड' लोकांच्या यादीत ५७ वर्षीय मसूद अझहरचे नाव पहिल्या क्रमांकावर आहे. मसूदने भारताविरुद्ध केलेल्या गुन्ह्यांची एक मोठी यादी आहे आणि अनेक प्रकरणांमध्ये त्याचे नाव आरोपी म्हणून येते. या प्रकरणांमध्ये १ ऑक्टोबर २००१ रोजी श्रीनगरमधील तत्कालीन जम्मू आणि काश्मीर विधानसभेच्या संकुलावर झालेल्या हल्ल्याचा समावेश आहे. त्यात ३८ लोक मारले गेले. यानंतर डिसेंबर २००१ रोजी भारतीय संसदेवर झालेल्या दहशतवादी हल्ल्यातही अझहरचे नाव घेतले जाते. या हल्ल्यात सहा सुरक्षा कर्मचारी आणि इतर तीन जण ठार झाले. १४ फेब्रुवारी २०१९ रोजी पुलवामा येथे केंद्रीय राखीव दलाच्या ताफ्यावर झालेल्या हल्ल्यामध्ये ४० हून अधिक सैनिक हुतात्मा झाले. त्या हल्ल्यातही मसूद अझहरवर आरोप आहे. तथापि, कंधार अपहरणाच्या वेळी मौलाना मसूद अझहरची सर्वाधिक चर्चा झाली.

१९९९ मध्ये कंधार विमान अपहरणाच्या वेळी सुटकेची मागणी करण्यात आलेल्या तीन अतिरेक्यांमध्ये मसूद अझहरचे नाव समाविष्ट होते. भारत सरकारचे तत्कालीन परराष्ट्र मंत्री जसवंतसिंग यांनी मसूद अझहरला एका खास विमानाने कंधारला नेऊन शत्रूकडे सुपूर्द केले. तेव्हापासून भारताच्या सुरक्षा संस्था मसूद अझहरचा शोध घेत आहेत. मसूद अझहर हा भारतात बंदी घातलेल्या 'जैश-ए-मोहम्मद' संघटनेचा म्होरक्या म्हणून ओळखला जातो. भारतातून सुटका झाल्यानंतर मसूदने या संघटनेची स्थापना केली. भारत सरकार सतत दावा करत आहे की, या संघटनेचे मुख्यालय पाकिस्तानच्या पंजाबमधील बहावलपूर येथे आहे. यामुळे भारताने पहिल्यांदाच पाकिस्तानच्या सीमेच्या शंभर किलोमीटर आत हल्ला केला. भारताने वारंवार पाकिस्तानकडे मसूदला भारताच्या स्वाधीन करण्याची विनंती केली आहे; परंतु पाकिस्तानने वारंवार सांगितले आहे की अझहर पाकिस्तानात नाही. भारत २००९ पासून मौलाना मसूद अझहरच्या 'जैश-ए-मोहम्मद'ला संयुक्त राष्ट्रांच्या दहशतवादी संघटनांच्या यादीत समाविष्ट करण्याची मागणी करत आहे; परंतु चीनने नेहमीच या मागणीविरुद्ध आपला 'व्हेटो' वापरला आहे. सुमारे दहा वर्षांच्या प्रयत्नांनंतर १ मे २०१९ रोजी, संयुक्त राष्ट्रांनी मसूदच्या संघटनेला दहशतवादी संघटना घोषित केले. त्याबद्दल पाकिस्तानने संयुक्त राष्ट्र सुरक्षा परिषदेच्या निर्बंध समितीला प्रश्न केला. त्याच्या नेतृत्वाखाली 'जैश-ए-मोहम्मद' दहशतवादी कारवायांसाठी मोठी भरती मोहीम चालवते आणि तरुणांना भारताविरुद्ध कारवाई करण्यास प्रवृत्त करते.



एका लेखानुसार, मसूद अझहर कराचीमध्ये शिक्षण घेत असताना जिहादी कारवायांमध्ये सामील झाला. तो जानेवारी १९९४ मध्ये सीमेवरून भारतात आला नाही, तर ढाका ते दिल्ली विमानाने आला. दिल्लीतील प्रसिद्ध हॉटेल्समध्ये राहिल्यानंतर तो प्रथम देवबंद आणि नंतर काश्मीरला पोहोचला. भारतीय सुरक्षा दलांनी मसूदला ताब्यात घेतल्यानंतर दहा महिन्यांच्या आतच अतिरेक्यांनी दिल्लीतील काही परदेशी लोकांचे अपहरण केले होते आणि त्यांच्या सुटकेच्या बदल्यात मसूदची सुटका करण्याची मागणी केली होती. सहारनपूरमधून ओलिसांना सोडवण्यात उत्तर प्रदेश आणि दिल्ली पोलिसांना यश आल्याने ही मागणी अयशस्वी झाली. एका वर्षानंतर, 'हरकत-उल-अन्सार'ने पुन्हा काही परदेशी लोकांचे अपहरण करून त्याला सोडवण्याचा प्रयत्न केला; परंतु हा प्रयत्नदेखील अयशस्वी झाला. तेव्हापासून १९९९ मध्ये सुटका होईपर्यंत अझहरला जम्मूतील कोट भालवाल तुरुंगात ठेवण्यात आले. त्यावेळी काश्मीरमधून अटक केलेल्या काश्मिरी, अफगाण आणि पाकिस्तानी दहशतवाद्यांच्या संपूर्ण गटाला तिथे तुरुंगात ठेवण्यात आले होते. यामध्ये 'हरकत-उल-मुजाहिद्दीन' या अतिरेकी संघटनेचा तथाकथित श्रीनगर कमांडर सैफुल्ला खान आणि त्याचे दोन अतिरेकी भाऊ यांचा समावेश होता. तिथे असताना तो या सर्वांसमोर जिहादी विचारसरणीवर भाषणे देत असे. मौलाना अझहरच्या भाषणाचा उपस्थित दहशतवाद्यांवर प्रचंड प्रभाव पडला. त्याच्या यूट्यूबवरील क्लिप्स भारताविरुद्ध चिथावणी देणाऱ्या होत्या.

पाकिस्तानमध्ये बंदी असूनही, 'जैश-ए-मोहम्मद'च्या काही कारवाया दिसून आल्या. या संघटनेला पाकिस्तानी गुप्तचर यंत्रणेकडून मदत मिळत राहिली; पण याचे कोणतेही पुरावे नाहीत. १९९९ मध्ये कंधार घटनेनंतर मसूद अझहरने अफगाणिस्तानातील तालिबानच्या मदतीने 'जैश-ए-मोहम्मद'ची स्थापना केली. दोन-तीन वर्षांनंतर त्याला पाकिस्तानात अटक करण्यात आली आणि त्याच्या संघटनेवर बंदी घालण्यात आली. पाकिस्तानमध्ये मसूद अझहरबद्दल चांगले मत नाही. सर्वांना माहिती आहे की, तो एका अतिरेकी गटाचा म्होरक्या आहे आणि अतिरेकी वृत्तीला प्रोत्साहन देतो. तो अनेक अतिरेकी घटनांमध्ये सहभागी आहे. तरुणांचे त्याच्याबद्दलचे मत चांगले नाही; पण असाही एक वर्ग आहे जो त्याला पाठिंबा देतो. हेच लोक भारताला आपला शत्रू मानतात. तथापि, मौलाना मसूद क्वचितच सार्वजनिक ठिकाणी दिसला आहे. हाफिज सईदप्रमाणे, मौलानाशी संबंधित बातम्या पाकिस्तानी माध्यमांमध्ये दिसत नाहीत. गेल्या दोन दशकांमध्ये फक्त दोनदाच मसूदच्या सार्वजनिक उपस्थितीची चर्चा झाली आहे. तो कराचीतील एका मेळाव्यात दिसला होता आणि त्यानंतर मुजफ्फराबादमधील जिहादी संघटनांच्या परिषदेत दिसला. भारताने पाकिस्तानकडून मसूद अझहर आणि त्याचा भाऊ अब्दुल रौफ असगर यांच्या प्रत्यार्पणाची वारंवार मागणी केली आहे. पुलवामा दुर्घटनेनंतरही ही मागणी पुन्हा पुन्हा करण्यात आली. २०१८ ते २०२२ पर्यंत पाकिस्तानचे परराष्ट्रमंत्री असलेले शाह महमूद कुरेशी यांनी अमेरिकन टीव्ही चॅनेल 'सीएनएन'शी बोलताना म्हटले होते की मसूद अझहर पाकिस्तानमध्ये आहे; पण तो इतका आजारी आहे की अंथरुणावरून उठू शकत नाही. एकीकडे असा कांगावा करताना त्याला तुरुंगात ठेवून हल्ला होणार नाही, याची काळजी पाकिस्तान घेत आहे. पहलगाम हल्ल्यानंतर भारताने पाकिस्तानमध्ये घुसून 'जैश'चे अड्डे उद्ध्वस्त केले. त्यात त्याचे दहा नातेवाईक आणि चार सहकारी ठार झाले. त्याचा भाऊ रौफ ठार झाला. त्याच्यावर भारतात अनेक दहशतवादी कृत्यांत सहभागी असल्याचा आरोप आहे. मसूदचा मुलगा भारताविरोधात गरळ ओकत होता. तो बेपत्ता आहे. पाकिस्तानी लष्कराने त्याला लपवून ठेवले असण्याची शक्यता आहे. भारताच्या 'ऑपरेशन सिंदूर'च्या माध्यमातून 'जैश'ला आणि मसूदलाही धडा शिकवला गेला आहे. कुटुंब नष्ट झाल्याने तो आता घाबरला आहे. त्यातून मरण्याची भाषा करायला लागला आहे. एका कुख्यात अतिरेक्याचा उदयास्त म्हणून मौलाना अझहर मसूदकडे पाहायला हरकत नाही.

(लेखक राज्यशास्त्राचे प्राध्यापक आहेत.)

## वेध

चंद्रकांत लोहाणा

# अन्यथा भविष्य कधीच माफ करणार नाही

व्यसन कोणतेही असो ते शेवटी विनाशाकडेच घेऊन जाते. व्यसनाधीनतेचे परिणाम समाजातील सर्वच घटकांना माहीत आहेत. त्यापासून होणाऱ्या विनाशाचीही पुरेपूर कल्पना आहे. तरीही मनुष्य त्याच्या अधीन जातो. त्यानंतर व्यसनाचा हा फास एवढा घट्ट आवळला जातो की, त्यामधून बाहेर पडणे कठीण होऊन जाते. पूर्वी व्यसनाची साधने फार कमी होती. त्याचे आयाम वेगळे होते. वडिलधाऱ्यांचा धाक होता. एकत्र कुटुंब व्यवस्था असल्याने मुलांच्या संगोपनामध्ये सर्वांचा हातभार असायचा. ही व्यवस्था आम्ही मोडीस काढली. आमचे आदर्श आणि प्रेरणास्थानाची व्याख्या बदलली. सध्या चारही दिशांची प्रगतीची दारे उघडली गेली आहेत. या आधुनिक युगामध्ये विविध प्रकारच्या गॅझेट्सने धुमाकूळ घातला आहे. उमलत्या पिढीला विनाशाकडे घेऊन जाणारा त्यामधीलच एक मोबाईल. मोबाईलवर जगामध्ये विविध देशांमध्ये होत असलेल्या संशोधनाने तर पालक वर्गाची पार झोप उडाली आहे. एवढे घातक आणि गंभीर दुष्परिणाम या मोबाईलच्या वापराने पुढे येत आहेत. तरीही त्याची तमा न बाळगता चिमुकल्यांपासून तर युवावर्गापर्यंत मोबाईलने आई-वडिलाची जागा घेतली आहे. मोबाईल हातात दिल्याशिवाय मुलगा जेवणही करीत नाही, अशा पालकांच्या तक्रारी येऊ लागल्या आहेत. लहान मुलांवर मोबाईलचा अति वापर अनेक शारीरिक आणि मानसिक दुष्परिणाम करू शकतो. त्यामुळे त्यांच्या आरोग्यावर तसेच मेंदूच्या विकासावर नकारात्मक परिणाम होतो. मोबाईल आणि समाजमाध्यमांचे व्यसन लहान मुलांना मानसिकदृष्ट्या अतिशय कमजोर बनविते, विचारशक्तीचा ऱ्हास होतो, असा तज्ज्ञांचा ठाम निष्कर्ष आहे. कोरोना काळामध्ये मुलांचा मोबाईल स्क्रीन टाईम वाढला होता. मुले घरामध्ये बंद होतात. खेळाचे मैदान दूर सारले केले. शाळाही मोबाईलवरच भरायची. त्यावेळी अख्खे जग म्हणजे मुलांसाठी मोबाईलच होता. या सवयीचे गंभीर परिणाम मुलांवर झाले. त्यांच्यामध्ये चिडचिड करण्याचे प्रमाण वाढले. त्यामुळे त्यांच्या मेंदूमध्ये चिंता आणि नैराश्याने कायम घर केले. मोबाईलवर मुले जे बघत असतात, ते त्यांच्यासाठी योग्य की अयोग्य हे त्यांना काहीच समजत नाही. मोबाईलवर दिसणाऱ्या विविध प्रकारच्या चित्रांमुळे त्यांच्या मेंदूमध्ये डोपामाईन नामक एक रसायनाचा स्राव निर्माण होतो आणि त्यामधूनच त्यांना आनंदाची अनुभूती होते. हाच आभासी आनंद लहान मुलांना वास्तविकतेपासून दूर लोटत आहे. भारतामध्ये सध्या जवळपास ५३ कोटी व्हॉट्सॲपचे वापरकर्ते असून युट्यूबचे ४५ कोटी, फेसबुकचे ४१ कोटी आणि जवळपास २ कोटी ट्विटरचे वापरकर्ते आहेत. २०२५ मध्ये इंटरनेट वापरणाऱ्यांची संख्या भारतामध्ये ९० कोटींपर्यंत वाढू शकते, असा केंद्र सरकारचा अहवाल सांगतो. मोबाईलमुळे संवाद बंद झाला. त्यामुळे मुलांमध्ये संवाद साधण्याची क्षमता क्षीण झाली आहे. पूर्वीची पिढी ज्या अनुभवातून शिकली, तो अनुभव या मोबाईल युगामध्ये मुलांना मिळेनासा झाला आहे. त्यामुळे लहान मुलांमध्ये एकटेपणा वाढला असून आयुष्याला सामोरे जाण्याची आणि संकटाला सामोरे जाण्याची क्षमता मुलांमध्ये कमी होत असल्याचा तज्ज्ञांनी गंभीर इशारा दिला आहे.



मोबाईलच्या अति वापरामुळे जीवघेण्या कॅन्सरचाही धोका निर्माण होऊ शकतो. अनेक अभ्यासपूर्ण संशोधनामधून स्पष्ट झाले आहे की, मोबाईलमधून निघणारे इलेक्ट्रोमॅग्नेटिक रेडिएशन जास्त वेळ मोबाईलचा वापर केल्याने त्वचेमध्ये शोषली जातात. त्यामुळे ब्रेन कॅन्सर होण्याचा धोका तज्ज्ञांनी वर्तविला आहे. या सर्व परिणामांची कल्पना जवळपास सर्वच पालकांना आहे. तरीही मुलांचा स्क्रीन टाईम कमी होत नाही, ही एक अतिशय गंभीर बाब आहे. पाश्चिमात्य संस्कृतीच्या अमर्याद नादी लागून आम्ही आमच्या एकत्रित कुटुंब व्यवस्थेस तिलांजली दिली. आजी-आजोबांपासून नातवंडं दूर गेली. आम्ही आमच्या सनातन संस्कृतीची नाळ तोडली. त्याचे सर्व गंभीर परिणाम आता दिसू लागले आहेत. मोबाईलमुळे देशाची भविष्य घडविणारी ही उमलती पिढी अशा प्रकारे नैराश्याच्या अंधकारात हरविली तर देशाचे भविष्य कसे असणार, याचा गंभीरतेने सर्वांनीच विचार करायला हवा. त्यासाठी कठोरता हा एकच नियम असू शकतो. अन्यथा भविष्य आम्हाला कधीच माफ करणार नाही.

९८८१७१७८५६

## प्रासंगिक

शेफाली वैद्य

# आपल्याला इस्राएल सारखं व्हायचंय?

काल डीजीएमएच्या पत्रकार परिषदेत सर्व पुरावे देऊन भारताने निर्विवादपणे दाखवून दिलं की ऑपरेशन सिंदूरमध्ये एकच विजेता आहे आणि तो म्हणजे भारत. ह्या तीन दिवसांच्या युद्धामध्ये आपण पहिल्या दिवशी पाकिस्तानमधील दहशतवादी ट्रेनिंग कॅम्प उध्वस्त केले तर शेवटच्या दिवशी फक्त ९0 मिनिटांमध्ये आपण पाकिस्तानमधल्या ११ एअर फोर्स बेसेस वर यशस्वी हल्ले केले आणि त्यातल्या एका बेसवर पाकिस्तानची अणुयुद्धाचे कमांड सेंटर होते. साधारण त्याच वेळेला पाकिस्तानच्या त्या भागात ४.३ क्षमतेचा भूकंपाचा धक्का रेकॉर्ड झाला. भारताने जाणूनबुजून किंवा नकळत पाकिस्तानच्या नुक्लियर स्टॉकपाईलवर हल्ला केला का? माहिती नाही, पण ह्या कैरनाच्या एअर बेसवर हल्ला झाल्या नंतरच अतिशय जलद गतीने चक्रे फिरली, पाकिस्तानने अमेरिकेची मदत मागितली आणि अमेरिकेने मध्यस्ती करून पाकिस्तानच्या डीजीएमऐला भारताला फोन करायला लावला आणि सिजफायर जाहीर झाला.

त्या दिवशी इतर करोडो, राष्ट्रवादी भारतीयांप्रमाणे मीही थोडीशी खट्टू झाले होते. आपण निर्विवादपणे जिंकत होतो, पाकिस्तान बॅकफूटवर होता, अश्या वेळी हे पाऊल का उचलले गेले हे इतर अनेक राष्ट्रवादी नागरिकांप्रमाणे मलाही समजत नव्हतं, पण त्याचं उत्तर कालच्या पत्रकार परिषदेत मिळालं. आपलं ध्येय आत्तातरी पाकिस्तानला नेस्तनाबूत करण्याचं नव्हतं, तर त्यांचे दहशतवादी तळ उध्वस्त करणे, आपली ताकद त्यांना दाखवून देणे आणि मनात आणले तर पाकिस्तानच्या कुठल्याही शहरावर, कुठल्याही बंदरावर, कुठल्याही विमानतळावर, कुठल्याही आर्मी बेसवर भारत हल्ला करू शकतो हे भारताने पाकिस्तानला सप्रमाण दाखवून दिले. हा फार मोठा विजय आहे पण तरीही आपल्यातल्या बऱ्याच लोकांना अजूनही वाटतंय की इतकं तडकाफडकी युद्ध थांबवायला नको होतं. आपण इस्राएल सारखं लढायला पाहिजे होतं. गाझा ज्याप्रमाणे इस्राएलने उध्वस्त केलंय तसं आपण पाकिस्तानबरोबर करायला पाहिजे होतं. अपेक्षा रास्तच आहे, पण आपण इस्रायल नाही आहोत. आपण भारत आहोत आणि आपल्या देशात अंतर्गत वाळवी खूप आहे. गेल्याच वर्षी जानेवारीमध्ये मी इस्रायेलमध्ये होते, एका मीडिया शिष्टमंडळाचा भाग म्हणून. गाझा सीमेवर जोरदार युद्ध सुरु होतं. पण जेरुसलेम शहर जगातल्या कुठल्याही मोठ्या शहरासारखं भासत होतं. रोजचे व्यवहार नेहमीसारखे सुरु होते. कॅफेमध्ये लोक घोळक्या-घोळक्याने बसून गप्पा मारत होते, शाळेत जाणारी मुलं स्कूलबसमध्ये खिदळत होती, शाळा, कॉलेजेस, मॉल, दुकाने, रेस्टॉरंटस सर्व व्यवस्थित सुरु होती. जेरुसलेमच्या जुन्या, ऐतिहासिक भागात लोक सेल्फी घेत होते. वरवर पाहिलं तर कुठेच वाटत नव्हतं की जेरुसलेमपासून फक्त चार तासांवर युद्ध सुरु आहे. पण त्या शांत, तरंग नसलेल्या पृष्ठभागाखाली अस्वस्थतेचा खळाळता भोवरा होता. मधूनच आकाशात गरजत जाणारे फायटर जेट, अधून मधून वाजणाऱ्या सायरन्स, रेस्टॉरंटमध्ये बसून फसफसणाऱ्या बियरचा तरुणाईच्या गर्दीत मिलिटरी ड्रेसमध्ये तरुणही होते जे कमरेला एके ४७ लावून बियरचा आस्वाद घेत होते. आम्ही उतरलो होतो ते जेरुसलेम मधले हॉटेल गाझा सीमेवरून आलेल्या विस्थापितांनी भरले होते. आठ-आठ, दहा-दहा जणांची मोठी कुटुंबे एका खोलीत राहत होती, पण तिथेही त्यांचे रोजचे व्यवहार सुरु होते. वरवर पाहिलं तर सगळीकडे शांतता होती पण ही शांतता युद्ध स्वीकारून आलेली प्रगल्भ शांतता होती. कुठेही अराजक नव्हतं. कोणीही युद्ध थांबवा म्हणून मेणबत्ती मोर्चा काढत नव्हतं. इस्राएलचे अनेक लोक हमासने ओलीस ठेवले होते, त्यांचे फोटो सर्व सार्वजनिक ठिकाणी दिसायचे पण कोणीही दिवसरात्र 'डी-एस्केलेट' म्हणत रडत नव्हते. इंस्टाग्रामवर 'वायोलन्स इज नेव्हर द अन्सर' म्हणत कोणी बाई भरपूर मेकप करून रील्स टाकत नव्हती. युद्धाची झळ इस्राएलच्या घराघरात पोहोचली होती. आम्हाला भेटलेल्या प्रत्येक नागरिकाच्या घरची, प्रेमाची कोणीतरी व्यक्ती गणवेषात होती. कोणाचा २१ वर्षांचा लेक सीमेवर लढत होता, कोणाची मुलगी एअर फोर्समध्ये होती, कोणाचा भाऊ रणगाडा पथकात होता, कोणाचा नवरा बॉम्ब डिफ्युज करायच्या कामात होता तर कोणाची तरी आई गाझाजवळ फील्ड हॉस्पिटल चालवत होती. सर्वांचंच काहीतरी मौल्यवान पणाला लागलं होतं. युद्धाची किंमत प्रत्येक इस्रायली चुकवत होता, आणि म्हणूनच शांतीचे मूल्य त्यांना माहिती होते. मी त्या दौऱ्यात ज्या ज्या इस्रायेली लोकांना भेटले, त्यापैकी कोणीही युद्ध हवे असे एका शब्दानेही कधी म्हटले नाही, पण एकाही व्यक्तीने हे युद्ध आवश्यक नव्हतं, हे युद्ध टाळता आलं असतं, असंही कधी म्हटलं नाही. कारण प्रत्येक इस्रायली व्यक्तीला हे अगदी लहानपणापासून माहिती असतं की जेव्हा तुमच्या अस्तित्वालाच धोका असतो, तेव्हा युद्ध ही निवड नसते, ती एक अपरिहार्यता असते. हामासने इस्राएलमध्ये जी क्रौर्याची परिसीमा गाठली, चिमुकल्या बाळांची शिरं छाटणं, महिलांवर बलात्कार, नागरिकांना जिवंत जाळणं, त्याविरुद्ध इस्राएलचे लोक एकदिलाने उभे राहिले होते. भारतासारखाच इस्रायल हा अंतर्गत राजकीय मतभेदांनी भरलेला देश आहे, पण जेव्हा त्यांच्या अस्तित्वाचा प्रश्न होता तेव्हा तिथले उजवे, डावे, धार्मिक ज्यू, नास्तिक ज्यू - सर्वांनी एकच सूर लावला होता की इस्रायली लोकांचे सांडलेले रक्त वाया जाता कामा नये, हमासला धडा शिकवलाच पाहिजे, त्यासाठी कितीही किंमत मोजावी लागली तरी बेहेत्तर. जेव्हा मी भारताकडे पाहते, तेव्हा मी स्वतःलाच विचारते - आपल्याला हे समजण्यासाठी आणखी किती रक्तपात, आणखी किती उरी, किती पहलगाम घडावे लागतील? हा देश बुद्धाचा आहे, युद्धाचा नाही म्हणत बेंबटणारे लोक हे का विसरतात की बुद्धाच्याही आधी हा श्रीकृष्णाचा देश आहे, जे सांगतात की अधर्माशी युद्ध करणं हा खरा धर्म आहे. शांतीः परमं गतीः म्हणजे आपण झुरळासारखे लपून बसून मिळवलेली शांती नाही तर ती बळावर आधारलेली शांती असावी. कधी कधी मला वाटतं की आपण भारतीय खूप मऊ आणि लिबलिबीत झालेलो आहोत. निष्क्रिय, आळशी, आपल्याला प्रिय असलेल्या गोष्टींचेही रक्षण करण्यास अनिच्छुक. सोयीसुविधांच्या उबदार गादीवर झोपताना बलिदानाचा खडबडीत स्पर्श विसरलेले. इस्राएल जेव्हा हमासवर युद्ध लादतो, तेव्हा तिथला प्रत्येक नागरिक, मग त्याचे राजकीय, धार्मिक विचार काहीही असू देत, आपल्या देशाच्या सरकारमागे ठामपणे उभा राहतो. तो देश एकजुटीनं लढतो. आणि हो, त्या लढाईची पुरेपूर किंमत तिथला प्रत्येक नागरिक मोजतो. आता आपल्या देशात बघा. दोनच दिवसांपूर्वी जे लोक डिसएस्कलेशनचा राग आलापत होते, नेमके तेच लोक आज मोदींवर लशरीशषळीश मान्य केल्याबद्दल तोंडसुख घेतायत! कालपर्यंत ज्यांनी 'ऑपरेशन सिंदूर'चं श्रेय केवळ लष्कराला देऊन त्यामागे असलेल्या राजकीय इच्छाशक्तीचा अपमान केला, तेच लोक आज १९७१ च्या युद्धात इंदिरा गांधी कश्या जिंकल्या ह्याचे कौतुक करत आहेत, जणू काही इंदिरा गांधीने एकटीने पाकिस्तानचा पराभव केला होता! हो, १९७१ मध्ये भारताचा विजय झाला, पण त्यासाठी किती किंमत मोजली आपण त्याची कल्पना आहे? जवळजवळ चार हजार भारतीय सैनिक त्या युद्धात हुतात्मा झाले, सहा हजाराहुन जास्त सैनिक गंभीर जखमी झाले. १९७१ मध्ये आपण युद्ध जिंकलो कारण त्यावेळी संपूर्ण देश एकत्र होता. राजकीय नेतृत्व, विरोधी पक्ष, लष्कर आणि सामान्य जनता - सर्वांनी मिळून तो विजय मिळवला होता. आज परिस्थिती काय आहे? पाकिस्तानसारख्या बाहेरच्या शत्रूशी लढून विजय मिळवणं फार सोपं आहे, पण भारतात राहून पाकिस्तानचे नागरिक असल्यासारखे वागणारे लाखो लोक आहेत ह्या देशात. त्यांचं काय करायचं? लक्षात ठेवा, आपण इस्रायल सारखे बनूच शकत नाही, जोपर्यंत आपलं नैतिक बळ इंस्टाग्राम फिल्टरसारखं खोटं, नकली आणि आभासी आहे. आपल्यातल्या देशद्रोही वाळवीचा कुरूप चेहेरा आधी ओळखायला शिका आणि जिथे दिसतील तिथे त्यांचा प्रतिकार करा. ऑपरेशन सिंदूरची बाजी भारत निर्विवादपणे जिंकला आहे. कालच्या प्रेस कॉन्फरंस मध्ये इतके उघड पुरावे देऊन देखील जर तुमच्या ओळखीतले कोणी हे मान्य करू इच्छित नाही तर जाणून असा की ते देशद्रोही आहेत. इस्राएलसारखं होण्यासाठी, भारताच्या पाठीमागे उभं राहावं लागतं, भूमिका घ्यावी लागते. तुम्हाला जर खरंच इस्राएलसारखा भारत हवा असेल,तर आधी भारतासाठी उभं राहा, आपल्या नेतृत्वामागे ठामपणे उभं रहा, देशाचं रक्षण करणाऱ्या सैनिकांच्या पाठिशी ठाम उभे रहा.कधी कधी, शांततेकडे नेणारा एकमेव मार्ग म्हणजे युद्धच असतं, आणि इतिहास नेहमीच लढणाऱ्या राष्ट्रांचीच आठवण ठेवतो, हरणाऱ्या नाही.

## २२ एप्रिलचे उत्तर २२ मिनिटांच्या वक्तव्यात देणारे पंतप्रधान म्हणजे भारताचे नीतीशास्त्रच

२२ एप्रिलच्या घटनेला भारताने २२ मिनिटांचे दिलेले उत्तर म्हणजे एकविसाव्या शतकातील भारताचे नीतिशास्त्र असल्याचे जगाला स्पष्ट सांगणारे नेतृत्व म्हणजे भारताचे युगपुरुष होय असे म्हणणे अतिशयोक्ती होणार नाही. 'खून और पानी एक साथ नहीं बहेगा', ऑपरेशन सिंदूर कोट्यावधी लोकांच्या भावनेचे प्रतीक आणि न्यायाचे प्रतीक आहे, असे स्पष्ट म्हणणारे आणि आपल्या सैनिकांना पूर्ण अधिकार देणाऱ्या पंतप्रधानांनी जगासमोर पाकिस्तानचे खरे चित्र दाखवून दिले आहे. तिन्ही सैन्य दलाचे कौतुक करत असताना दुसरीकडे हे युग युद्ध करायचे नाही आणि आतंकवादचे सुद्धा नाही. 'जगाला युद्ध नको बुद्ध हवा' असे सांगत शस्त्र आणि शास्त्राची गरज असल्याचे नमूद केले. याचे जीवंत उदाहरण म्हणजे भारताने पाकिस्तानी नागरिकांना टार्गेट केले नाही. पाकिस्तानात आतंकवादी अड्डे आहेत हे जगाला माहीत असताना आत्ता तरी शहाणे होऊन स्वतःच्या अस्मितेच्या रक्षणासाठी, जगातून आतंकवाद संपवण्यासाठी मनापासून प्रयत्न करावे, अन्यथा जग पाकिस्तानला कधीही माफ करणार नाही. पंतप्रधान नरेंद्र मोदींना भारतीय नागरिक व विशेषतः अनेक राजकीय पक्षांनी दिलेला पाठिंबा म्हणजे पंतप्रधानांचे खरे खंबीर व कणखर नेतृत्व होय. देशासाठी कठोर निर्णय घेत दिवस-रात्र एक करत प्रत्येक घटनेवर लक्ष ठेवणारे मोदींसारखे नेतृत्व म्हणजे भारतीय नागरिकांचे अभिमान आहेत यात शंका नाही.

**धन्यकुमार बिराजदार**/सोलापूर

हे पत्र मुद्रक व प्रकाशक कुलभूषणराम रामकृष्ण तारे यांनी सोलापूर तरुण भारत मीडिया लिमिटेड करिता, सोलापूर तरुण भारत कार्यालय प्लॉट नं ए -३२,छत्रपती संभाजीनगर इंडस्ट्रियल को ऑफ सोसायटी रेल्वे स्टेशन रोड छत्रपती संभाजी नगर ४३१००५ (महाराष्ट्र) येथे छापून दैनिक सोलापूर तरुण भारत कार्यालय,छत्रपती संभाजीनगर येथे प्रकाशित करून छत्रपती संभाजीनगर, जालना,परभणी,नांदेड, हिंगोली ,बीड येथील सोलापूर तरुण भारतच्या विभागीय कार्यालयातून वितरीत केले.

प्रबंध संपादक :विवेक घळसासी. मुख्य समुह संपादक : दिलीप यशवंत पेठे. मुख्य संपादकः प्रशांत वसंतराव माने, दूरध्वनी -८८८८८४७२६८ RNI Reg.No 46878/87

stbaurangabad@gmail.com. www.dainiktarunbharat.com, epaper.dainiktarunbharat.com या अंकात प्रसिद्ध झालेल्या बातम्या व लेख यामधून व्यक्त झालेल्या मतांशी संपादक/संचालक सहमत असतीलच असे नाही. (पी. आर. बी. कायद्यानुसार जबाबदारी)

धाराशिव •
# दिनांक

सोलापूर तरुण भारत, सोलापूर, (महाराष्ट्र) येथून प्रकाशित केले.
आवृत्ती सातारा, संभाजीनगर, धाराशिव, लातूर, नांदेड, परभणी, हिंगोली, जालना व बीड (महाराष्ट्र), तसेच विजयपूर, कलबुर्गी, बीदर (कर्नाटक) येथून प्रकाशित केले.

## भारतीय जनता पार्टीच्या धाराशिव जिल्हाध्यक्षपदी दत्ता कुलकर्णी

**तभा वृत्तसेवा**
**धाराशिव, दि.१३ मे -**



भारतीय जनता पक्षाच्या धाराशिव जिल्हाध्यक्षपदी दत्ताभाऊ कुलकर्णी यांची नियुक्ती करण्यात आली आहे. कुलकर्णी यांची ही दुसरी वेळ असून, यापूर्वी त्यांनी २०१६ ते २०१९ या काळात जिल्हाध्यक्ष म्हणून जबाबदारी सांभाळली आहे. त्यांच्या मागील कार्यकाळात लोकसभा, विधानसभा, जिल्हा परिषद आणि नगरपालिका निवडणुका पार पडल्या होत्या, ज्यामध्ये पक्षाने उल्लेखनीय यश संपादन केले होते.

आगामी जिल्हा परिषद, पंचायत समिती आणि नगरपालिका निवडणुकांच्या तोंडावर कुलकर्णी यांची नियुक्ती अत्यंत महत्त्वाची मानली जात आहे. ते पक्षाचे निष्ठावंत सदस्य आहेत.

ते सिद्धिविनायक परिवाराचे संस्थापक असून, जिल्ह्यात त्यांचे दोन गूळ पावडर कारखाने आहेत. तसेच, त्यांच्या मल्टीस्टेट बँकेच्या १० शाखा कार्यरत आहेत.

एक यशस्वी उद्योजक म्हणूनही त्यांची प्रतिमा जिल्ह्यात आहे. त्यांच्या या अनुभवाचा आणि जनसंपर्काचा फायदा पक्षाला आगामी निवडणुकांमध्ये होण्याची शक्यता वर्तवण्यात येत आहे. त्यांच्या नेतृत्वाखाली धाराशिव जिल्ह्यात पक्ष संघटना अधिक मजबूत करण्यावर भर दिला जाईल, अशी अपेक्षा व्यक्त केली जात आहे.



https://dainiktarunbharat.com, https://epaper.dainiktarunbharat.com
सोलापूर तरुण भारत

## संक्षिप्त वृत्त...



### तथागत गौतम बुद्ध यांची जयंती साजरी

**कळंब, दि.१३ मे -**
वैशाखी बुद्ध पौर्णिमा विश्वाला शांतीचे संदेश देणारे तथागत गौतम बुद्ध यांची जयंती साजरी करून विनम्र अभिवादन केले कळम शहरातील प्रत्येक बौद्ध विहारात जयंती मोठ्या उत्साहाने साजरी करण्यात आली यावेळी पांढरे शुभ्र वस्त्र परिधान करून शहरांमध्ये रॅलीचे आयोजन करण्यात आले खाऊ म्हणून खिरीचे वाटप करण्यात आले. सतपाल बनसोडे, सुनील गायकवाड, महादेव महाराज अडसूळ, शिवाजी शिरसाट, बंडूभाऊ बनसोडे, कुंदन गायकवाड, सुमित रणदिवे, शंकर कांबळे, राजाभाऊ गायकवाड, शहाजी शिरसाट, मोहन गायकवाड, कोमल धावरे, जीवन बचुटे, रसूल शेख, प्रमोद ताटे, विकास गायकवाड, मुकुंद साखरे, बजरंग धावारे, सौरभ गायकवाड, संभव बनसोडे, माणिक गायकवाड, प्रशांत हौसलमल मोठ्या प्रमाणात महिला व लहान मुले उपस्थित होते.



### गंगावणे यांच्या बाप कवितेने गाजविले संमेलन

**परंडा, दि.१३ मे -**
कराड येथे ३१ वे आखिल भारतीय नवोदित साहित्य संमेलन दि.९ व १० मे रोजी पार पडले त्यात तुकाराम गंगावणे यांची बाप कविता गाजली. दि ११ मे रोजी अकलूज येथे आखिल भारतीय मराठा सेवा संघाचे अधिवेशन पार पडले. अकलूज येथे झालेल्या कवि संमेलनाच्या अध्यक्ष मनीषा पाटील हेरोलीकर, उद्घाटक डॉ.सतीश तराळ राज्याध्यक्ष जगद्गुरु तुकोबाराय साहित्य परिषद, सुत्रसंचलन डॉ.सतीश होनगावे होते. परंडा येथील जेष्ठ साहित्यिक तुकाराम गंगावणे यांच्या बाप या कवितेने संमेलन गाजले. सहभागी कवी लक्ष्मण हेंबाडे, मनीषा पाटील रायजादे, सांगली, दिनेश भिसे परभणी, बालाजी जाधव लातूर, तानाजी राजे, शाहीर पाटील सांगली, दुर्गा देशमुख परभणी, राजेश महल्ले अमरावती, रवींद्र पांचाळ, शंकर कदम परभणी आदि सहभागी होते. यावेळी तुकाराम गंगावणे यांचा सन्मान चिन्ह व एक ग्रंथ देऊन सन्मान केला. गंगावणे यांचे सर्वत्र कौतुक होत आहे.



### नृसिंह भजनी मंडळाचा भजन कार्यक्रम संपन्न

**तुळजापूर, दि.१३ मे -**
येथील पत्रकार संघाचे अध्यक्ष सचिन ताकमोघे यांचे वडील प्रतापराव ताकमोघे यांच्या तेराव्या निमित्त ताकमोघे यांच्या निवासस्थानी तालुक्यातील सिंदफळ येथील नृसिंह भजनी मंडळाचा भजन कीर्तनाचा कार्यक्रम आयोजित करण्यात आला होता. यामध्ये अभंग किर्तन गवळणी गीताचे सादरीकरण करण्यात आले. मागील ४० वर्षापासून नृसिंह भजनी मंडळ तालुक्यात सर्वत्र भजनाच्या कार्यक्रमाची सेवा करत आहेत. या भजनी मंडळामध्ये दोन्हीही डोळे नसणारे भगवंत सिद्धगणेश हे पखवाज वादक म्हणून सेवा करतात. या भजनात दोन्ही डोळे नसल्याने आयुष्य अंधमय असताना देखील सुरेख वाद्य वाजवून सिध्दगणेश यांनी उपस्थित श्रोत्यांचे मने जिंकून घेतली. याप्रसंगी नृसिंह भजनी मंडळाचे सौदागर शिंदे, औदुंबर शिंदे, बाळासाहेब घाटशिळे, रामचंद्र घाटशिळे, बडी धनके, मोहन सुतार, अभिमान सिद्धगणेश, वंदना धनके, सुरेखा घंदुरे, शांता जाधव, कुंपा धनके, शोभा डोंगरे, संगीता जाधव, लक्ष्मी घंदुरे यांची उपस्थिती होती.



### धनंजय शिंगाडे यांचा सत्कार

**धाराशिव, दि.१३ मे -**
धाराशिव जिल्ह्यातील सामाजिक, शैक्षणिक आणि औद्योगिक क्षेत्रातील उल्लेखनीय कार्याबद्दल बहुजन योद्धा सामाजिक संघटनेचे संस्थापक अध्यक्ष धनंजय गंगाधर शिंगाडे यांना अखिल भारतीय मराठी साहित्य परिषदेच्या वतीने राजर्षी छत्रपती शाहू महाराज समाजरत्न राज्यस्तरीय पुरस्काराने नुकतेच सन्मानित करण्यात आले. यानिमित्त तमाम धाराशिवकरांच्या वतीने त्यांचा सत्कार करण्यात आला. यावेळी अ‍ॅड.खंडेराव चौरे, नगरसेवक खलील सय्यद, मुकुंद घुले, संजय मुंडे, पांडू भोसले, रविंद्र सुर्यवंशी, अर्जुन पवार, सुभाष पवार, नंदकुमार शेटे, विशाल शिंगाडे, प्रसेंजित शिंगाडे, अनिरुद्ध कावळे, सुगत सोनवणे, यशवंत शिंगाडे, सारिपूत शिंगाडे यांच्यासह बहुजन योद्धा सामाजिक संघटनेचे पदाधिकारी उपस्थित होते.

## वा रे प्रशासन... मॉकड्रिल डेपोत अन् उपस्थित एसटी कर्मचारी

### मॉकड्रिल करण्यासाठी एस टी डेपोतील टायर आणि कचरा?... प्रदुषणाला दिले निमंत्रण...





**तभा वृत्तसेवा**
**धाराशिव, दि.१३ मे -**
जिल्हाधिकारी तथा जिल्हा आपत्ती व्यवस्थापन प्राधिकरणाचे अध्यक्ष किर्ती किरण पुजार यांच्या मार्गदर्शनाखाली १३ मे रोजी सकाळी ९:३० वाजता धाराशिव येथील एस.टी.बस स्थानकावर मॉकड्रिलचे आयोजन करण्यात आले होते. मात्र, प्रशासनाच्या वतीने नागरिकांना याबाबत जागृत करण्यात यावे असे अपेक्षित असताना हे मॉकड्रिल एस टी डेपोत घेण्यात आले, जेथे केवळ एस टी कर्मचारी उपस्थित होते. प्रशासनाच्या वतीने घेण्यात आलेले मॉकड्रिल प्रशिक्षण नागरिकांना आपत्ती काळात समयसुचकता वापरून कसे आपला सुरक्षा करावी याचे प्रशिक्षण देण्यात येते.

मात्र, गेल्या कित्येक वर्षापासून जिल्ह्याचा आपत्ती व्यवस्थापन विभाग हा नागरिकांना केवळ कागदोपत्री प्रशिक्षण देत असल्याचे चित्र आहे. या कागदोपत्री प्रशिक्षणातून लाखो रुपयाचा अपहार झाल्याचेही चर्चा जिल्हाधिकारी कार्यालयात मॉकड्रिल झाल्यानंतर चर्चिली जात होते.

बस डेपोमध्ये बसने अचानक पेट घेतल्याची आपत्कालीन परिस्थिती उभी करून,त्या अनुषंगाने विविध यंत्रणांची तयारी तपासण्यात आली.

ही माहिती आगार व्यवस्थापक बालाजी भांगे यांनी पोलिस नियंत्रण कक्ष, निवासी उपजिल्हाधिकारी कार्यालय, १०८ रुग्णवाहिका सेवा, अग्निशमन दल व होमगार्ड यांना दिली. यानंतर अग्निशमन दलाने तात्काळ घटनास्थळी पोहोचून आग विझवली, तर १०८ रुग्णवाहिका व पोलिस दलानेही तत्पर प्रतिसाद दिला.

या मॉकड्रिल प्रसंगी निवासी उपजिल्हाधिकारी तथा जिल्हा आपत्ती व्यवस्थापन प्राधिकरणाच्या मुख्य कार्यकारी अधिकारी शोभा जाधव यांनी उपस्थितांना मार्गदर्शन केले.

कोणत्याही आपत्तीमध्ये संयम व धैर्य राखणे अत्यावश्यक आहे. प्रशासन सज्ज राहण्यासाठी या मॉकड्रिलचे आयोजन करण्यात आले असून ते यशस्वीरीत्या पार पडले आहे.

या मॉकड्रिलला विभागीय वाहतूक अधिकारी एस.टी.महामंडळाचे अभय देशमुख, उपविभागीय अधिकारी अरुणा गायकवाड, तहसीलदार डॉ.मृणाल जाधव, महसूल तहसीलदार अभिजीत जगताप, बीडीडीएस पथक, होमगार्ड पथक, जिल्हा शोध व बचाव कार्य टीम तसेच एस.टी.महामंडळाचे अधिकारी व कर्मचारी उपस्थित होते.

## बावची विद्यालयाची यशस्वी घोडदौड कायम

**तभा वृत्तसेवा**
**परंडा, दि.१३ मे -**



बावची विद्यालय, परंडा यांनी यंदाही आपली यशाची परंपरा कायम ठेवत माध्यमिक शालांत प्रमाणपत्र परीक्षा मार्च २०२४ मध्ये १००% निकालाची घवघवीत कामगिरी केली आहे. एकूण १६८ विद्यार्थ्यांनी परीक्षेस प्रविष्ठ होऊन सर्वांनी यशस्वीरीत्या उत्तीर्ण होण्याचा विक्रम केला आहे.

या परीक्षेत गोरे अक्षरा धनंजय हिने १०० टक्के गुण मिळवत महाराष्ट्रात प्रथम क्रमांक पटकावला आहे. तिच्या या यशाने विद्यालयाचे नाव राज्यपातळीवर उजळवले आहे. विद्यालयाचे एकूण २४ विद्यार्थी ९० टक्क्यांपेक्षा जास्त गुणांनी उत्तीर्ण झाले असून विशेष प्रविण्यासह ६१ विद्यार्थी, प्रथम श्रेणीत ५७ व द्वितीय श्रेणीत २६ विद्यार्थी उत्तीर्ण झाले आहेत. गुणवंत विद्यार्थ्यांमध्ये लटके भाग्यश्री ज्ञानेश्वर ९७.८०%, शिंदे श्रद्धा सुरेश -९६.४०%, खंबायत वैभवी दिलीप -९६%, पठाण आलिया इरफा-९५.८०%, लांडे श्रूती उध्दव -९५.२०%, ठवरे श्रेया भैरवनाथ-९५.00%, घोडके वैष्णवी रामभाऊ -९४.६०%, भराटे सानिका माधव- ९४.६०%, शिंदे स्मिता सचिन-९४.६०%, धुमाळ अंकिता दत्ता -९४.२०%, चव्हाण सानिका भाऊराव-९३.४०%, नलवडे आर्पिता योगिराज-९३.४०%, सुरवसे अथर्व अंकुश -९३.00%, मोमीन असिम अमजद -९३.00%, ढगे वैभवी हरिदास -९२.८०%, सय्यद हादिया मेहराज-९२.६०%, गरड क्रिश लक्ष्मण-९२.४०%, नाईकवाडी विजयश्री सुधीर-९२.२०% सुरवसे आयुष तानाजी -९१.४०%, दयाळ सृष्टी लक्ष्मण -९०.८०%, दोरगे सुमित पुरूषोत्तम -९०.८०%, खैरे प्रसाद युवराज -९०.४०% थोरात अभिज्ञान दत्तात्रय - ९०.00 या विद्यार्थ्यांचा समावेश आहे. हे यश विद्यार्थ्यांचे अथक परिश्रम, शिक्षकांचे मार्गदर्शन व पालकांचे सहकार्य यांचे फलित असल्याचे संस्थापक अध्यक्ष बिभीषण रोडगे व मुख्याध्यापक नारायण खैरे यांनी सांगितले. विद्यालयाच्या या उज्वल यशाबद्दल सर्व विद्यार्थ्यांचे, शिक्षकांचे व पालकांचे सर्व स्तरांतून अभिनंदन होत आहे. बावची विद्यालयाने शिक्षणाच्या क्षेत्रात आपले स्थान आणखी बळकट केले आहे.

## ‘एकलव्य’ ची यशस्वी परंपरा; संगीता विभूते हिचा प्रथम क्रमांक

**तभा वृत्तसेवा**
**धाराशिव, दि.१३ मे -**
एकलव्य माध्यमिक आश्रम शाळा मंगरूळ यमगरवाडी तालुका तुळजापूर जिल्हा सरास येथील इयत्ता दहावीचा निकाल ९८ टक्के लागला. दरवर्षीप्रमाणे याही वर्षी यशाची परंपरा राखली. एकूण ४८ विद्यार्थी पैकी ४७ विद्यार्थी उत्तीर्ण झाले. यापैकी तेरा विद्यार्थी यांनी विशेष प्रवीण मिळवले २४ विद्यार्थी प्रथम श्रेणीमध्ये उत्तीर्ण झाले आणि द्वितीय श्रेणीमध्ये नव विद्यार्थी उत्तीर्ण झाले व एक विद्यार्थी पास झाला.



यामध्ये गुनाअनुक्रमे संगीता तात्या विभूते हिने ८८.८०% गुण मिळवून प्रथम क्रमांक येण्याचा मान मिळवला. द्वितीय क्रमांकावर मंगेश दिलीप झोडपे यांनी ८८ टक्के गुण मिळवले. तसेच गौरी जयराज क्षीरसागर तिने ८७% गुण मिळवून तृतीय क्रमांकाने उत्तीर्ण झाली.

विद्यार्थ्यांच्या यशाबद्दल उत्तीर्ण विद्यार्थी तसेच शिक्षक कर्मचारी यांचे संस्थेच्या वतीने संस्थेचे अध्यक्ष उद्धवराव काळे, उपाध्यक्ष डॉ.अभय शहापूरकर, कार्यवाह विवेक अयाचित, मुख्याध्यापक अण्णासाहेब कोल्हटकर, अशोक संकलेचा,अ‍ॅड.जनक पाटील, डॉ.प्रणिता गडेकर, कोषाध्यक्ष नरेश पोटे, अभय कुलकर्णी, राजाभाऊ गिजरे, अ‍ॅड. प्रदीपसिंह राजपूत ,मुख्याध्यापक विठ्ठल म्हेत्रे फुलाजी ताटी कुंडलवार, संगीता पाचंगे तसेच सर्व कर्मचाऱ्यांनी अभिनंदन केले.

## जयप्रकाश माध्यमिक विद्यालयाचा ९८.३१% निकाल



**तभा वृत्तसेवा**
**धाराशिव, दि.१३ मे -**
जयप्रकाश माध्यमिक व उच्च माध्यमिक विद्यालय, रुईभर येथील माध्यमिक विद्यालयाचा ९८.३१% निकाल लागला असून यशाची परंपरा कायम ठेवली आहे. विशेष प्राविण्यामध्ये १२४, प्रथम श्रेणीत ८४, द्वितीय श्रेणीत २१, तृतीय श्रेणीत ०५ विद्यार्थी आले आहेत. विद्यालयात प्रथम अक्षरा धनके ९५.६० %, द्वितीय यश गव्हाणे व स्वराली घोडके ९५.२०%, तृतीय समीक्षा घोडके व श्रुती शिंदे ९५%, चौथा समृद्धी गाढवे व केदार रोंगे, अंतरा कांबळे ९४.८०%, पाचवा तृप्ती घोडके ९४.२०%, श्रद्धा सुतार ९३% गुनामुक्रमे आलेले आहेत.

या सर्व यशस्वी विद्यार्थ्यांचे डॉ.आंबेडकर बाल विकास शिक्षण संस्थेचे अध्यक्ष शिक्षण महर्षी सुभाष कोळगे, माजी जि.प.सदस्य रामदास कोळगे, माजी ग्रा. पं.सदस्य राजनारायण कोळगे, प्राचार्य जयप्रकाश कोळगे, प्रशासकीय अधिकारी शिवकन्या साळुंके, पर्यवेक्षक काकासाहेब डोंगरे, शिक्षक वृंद, शिक्षकेतर कर्मचारी यांनी अभिनंदन केले.

## पोलीस निरीक्षक अश्विनी भोसले यांच्या काळात शहरात कायदा-सुव्यवस्था बिघडली?

**तभा वृत्तसेवा**
**उमरगा, दि.१३ मे -**
उमरगा शहरातील वाढत्या गुन्हेगारीमुळे कायदा व सुव्यवस्थेवर प्रश्नचिन्ह निमाण झाले असून, पोलीस प्रशासनावरील नागरिकांचा विश्वास डळमळीत झाल्याचे चित्र मंगळवारी शासकीय विश्रामगृहावर आयोजित बैठकीत स्पष्ट झाले. धाराशिवचे खासदार ओमराजे निंबाळकर यांनी पोलीस निरीक्षक अश्विनी भोसले यांच्या कार्यशैलीवर कडक शब्दांत नाराजी व्यक्त करत पोलिसांनी कठोर भूमिका घ्यावी, असे आदेश दिले.



बैठकीस लोहारा उमरग्याचे आमदार, जिल्हा पोलिस प्रमुख संजय जाधव, उपविभागीय पोलीस अधिकारी सदाशिव शेलार, डॉ.अजिंक्य पाटील, रज्जाक अत्तार, सुलतान शेठ, रणधीर पवार, अर्जुन बिराजदार आदी मान्यवर उपस्थित होते. शहरातील नागरिक आणि लोकप्रतिनिधींनी पोलीस निरीक्षक भोसले यांच्यावर गंभीर आरोप करत त्यांना कायदा व सुव्यवस्था राखण्यात अपयशी ठरल्याचे सांगितले.

खासदार ओमराजे निंबाळकर म्हणाले की, पोलिसांकडे तक्रारी नोंदवताना लोकप्रतिनिधींना फोन करावा लागतो, ही बाब दुर्दैवी आहे. गुन्हेगार कोणत्याही पक्षाचा असो, पोलीस राजकीय दबावाखाली काम करता कामा नये. त्यांनी निपक्षपातीपणे सामान्य नागरिकांच्या तक्रारी सोडवाव्यात, असेही त्यांनी स्पष्ट केले. शहरात भरदिवसा खूनप्रयत्न झाला असून, त्यात पोलिसांकडून गुन्हेगारांना पाठीशी घालण्यात येत असल्याचा आरोप नातेवाईकांनी केला.

नागरिकांनी सांगितले की, पोलीस निरीक्षक भोसले यांच्या काळात अवैध धंदे फोफावले असून, गुन्हेगारांची दहशत इतकी आहे की, लोक तक्रार करण्यासही घाबरतात. ग्रामीण भागातही पोलिसांच्या आशीर्वादाने अनेक अवैध व्यवसाय चालू आहेत, असा आरोप करण्यात आला.

तसेच, खून प्रकरणात मूळ आरोपींना अटक न करता इतरांवर कारवाई केली गेली आहे, ही बाब स्पष्ट करण्याची मागणी करण्यात आली. आ.स्वामी यांनी या पोलीस ठाण्यात अनेक वर्षांपासून कार्यरत असलेल्या पोलिसांची बदली व्हावी, अशी मागणी केली. त्यांनी शहरात मुलींच्या छेडछाडीच्या घटना वाढल्याकडे लक्ष वेधले आणि पिंक पथकाने अधिक सतर्क रहावे, असे निर्देश दिले.

पोलिसांनी तक्रारी जलदगतीने सोडवून जनतेला न्याय द्यावा, अशी सूचनाही त्यांनी केली. खासदार निंबाळकर यांनी नागरिकांना आवाहन केले की, गुन्हेगार आणि अवैध धंद्यांविषयी माहिती Whatspp च्या माध्यमातून द्यावी,

संबंधिताचे नाव गोपनीय ठेवून योग्य ती कारवाई वरिष्ठ पातळीवरून केली जाईल. यावेळी उमरगा, मुरूम आणि लोहारा येथील पोलीस अधिकारी, पदाधिकारी आणि नागरिक मोठ्या संख्येने उपस्थित होते.

## धाराशिव प्रशालेचा ८६.२० टक्के निकाल

**तभा वृत्तसेवा**
**धाराशिव, दि.१३ मे -**
महाराष्ट्र राज्य माध्यमिक व उच्च माध्यमिक शिक्षण मंडळाच्या वतीनं घेण्यात आलेल्या दहावीच्या परीक्षेचा ऑनलाइन निकाल १३ मे रोजी जाहीर करण्यात आला.उस्मानाबाद जिल्हा स्वातंत्र्यसैनिक समिती संचलित धाराशिव प्रशालेचा निकाल ८६.२० % लागला आहे.

यावर्षी एकूण २९ विद्यार्थी परीक्षेस बसले होते पैकी २५ विद्यार्थी उत्तीर्ण झाले यामध्ये विशेष प्राविण्य १ प्रथम श्रेणी ८ द्वितीय श्रेणी १३ उत्तीर्ण ३ झाले आहेत प्रशालेत प्रथम दिव्या जीवन वाळा द्वितीय संध्या महादेव काकडे तृतीय निजबा अहमद शेख विद्यार्थ्यांच्या यशाबद्दल संस्थेचे अध्यक्ष प्रकाश मालखरे, सचिव दत्तात्रय गणेश, उपाध्यक्ष अण्णासाहेब जाधव, कोषाध्यक्ष उमाजीराव देशमुख, सहसचिव समीर मालखरे, अ‍ॅड.सुग्रीव नेरे, संचालिका चित्राताई मालखरे, बाळासाहेब सुर्यवशी, सुरेश धारूरकर, प्रदिप गणेश यांनी शिक्षकांचे व विद्यार्थ्यांचे अभिनंदन केले आहे.

## संविधान चौकापर्यंतच्या राष्ट्रीय महामार्गावरील पथदिवे अनेक महिन्यांपासुन बंद

**तभा वृत्तसेवा**
**नळदुर्ग, दि.१३ मे -**
नळदुर्ग येथील गोलाई चौक ते बसस्थानकासमोरील संविधान चौकापर्यंतच्या राष्ट्रीय महामार्गावरील पथदिवे गेल्या अनेक महिन्यांपासुन बंद आहेत. त्यामुळे रात्रीच्या वेळेस याठिकाणी अंधाराचे साम्राज्य पसरले आहे. त्याचबरोबर ऐतिहासिक नळदुर्ग शहराला यामुळे बकाल अवस्था प्राप्त झाली आहे. संबंधित विभागाने तात्काळ हे बंद पडलेले पथदिवे सुरु करावे अशी मागणी होत आहे.



नळदुर्ग-अक्कलकोट रस्ताच्या कामात नळदुर्ग येथील गोलाई चौक ते बसस्थानकासमोरील संविधान चौकापर्यंतच्या राष्ट्रीय महामार्गावरील दुभाजकामध्ये पथदिवे उभारण्यात आले आहेत. गोलाई चौक ते संविधान चौकापर्यंत राष्ट्रीय महामार्गाच्या दुभाजकामध्ये एकुण ५८ पोल भरण्यात आले आहेत या ५८ पोलवर एका पोलवर दोन लाईटचे ब्लब लावण्यात आले आहेत. मात्र हे पथदिवे सुरु झाल्यापासुन किती दिवस हे पथदिवे सुरु राहिले हा एक संशोधनाचा विषय आहे. कायम हे पथदिवे बंदच असतात. केवळ ठेकेदार पोसण्यासाठी संबंधित विभागाने हे पथदिवे उभारले की काय असा संशय येत आहे.

वास्तविक, पाहता हे पथदिवे कायम सुरु असणे गरजेचे आहे. कारण राष्ट्रीय महामार्गावर हे पथदिवे उभारण्यात आले आहेत. हे पथदिवे सुरु केल्यानंतर नळदुर्ग शहराच्या सौंदर्यात भर पडेल असे वाटले होते मात्र सध्याची परीस्थिती अगदी याच्या उलट आहे.या बंद पडलेल्या पथदिव्यामुळे आज शहराला बकाल अवस्था प्राप्त झाली आहे.

आज हे ५८ पोल केवळ शोभेची बाहुली म्हणुन उभे आहेत. संबंधित ठेकेदाराने अतिशय निकृष्ठ दर्जाचे पथदिवे उभे केले आहेत. यासाठी वापरण्यात आलेले केबल हलक्या दर्जाचे वापरण्यात आले आहे याचा परीणाम म्हणुन हे पथदिवे वारंवार बंद पडत आहेत. त्याचबरोबर या पथदिवे उभारणीच्या कामामध्ये गोलाई चौक ते संविधान चौकापर्यंत चार विजेचे मोठे टॉवर उभरण्यात येणार होते मात्र या कामामध्ये संबंधित ठेकेदाराने हे चार विजेचे मोठे टॉवर उभेच केले नाही याची चौकशी होणे गरजेचे आहे.

सध्या महामार्गावरील हे पथदिवे बंद असल्यामुळे या परीसरातील महामार्गावर रात्रीच्या वेळेस अंधाराचे साम्राज्य पसरले आहे. सध्या या राष्ट्रीय महामार्गावरील वाहतुक नळदुर्ग शहराच्या बाहेरून बायपास मार्गे सुरु आहे. त्यामुळे नळदुर्ग शहरातुन गेलेल्या राष्ट्रीय महामार्गावरून अतिशय तुरळक वाहतुक सुरु आहे. त्यातच महामार्गावरील हे पथदिवे बंद असल्याने रात्रीच्या वेळेस याठिकाणी भीतीदायक वातावरण निर्माण झाले आहे. त्यामुळे संबंधित विभागाने तात्काळ हे बंद पडलेले पथदिवे सुरु करण्याबरोबरच हे पथदिवे कायम सुरु राहतील याची दक्षता घ्यावी अशी मागणी करण्यात आली आहे.

# सहयोग नगरमध्ये बुद्ध पौर्णिमा उत्सव ठरला प्रेरणादायी

## साहेबराव गायकवाड यांच्या पुढाकाराने दोन दिवस साजरा झाला अध्यात्म, राष्ट्रप्रेम आणि समाजजागृतीचा संगम

**तभा वृतसेवा**
**नांदेड, दि. १३ मे-**

बुद्ध पौर्णिमेच्या निमित्ताने सहयोग नगर येथील बुद्ध विहार परिसर दोन दिवस एक वेगळ्याच वातावरणाने भारावून गेला. आयोजक साहेबराव सुमनबाई लक्ष्मणराव गायकवाड यांच्या पुढाकाराने आयोजित केलेला हा कार्यक्रम अध्यात्म, समाजसेवा आणि राष्ट्रभक्तीचे प्रतीक ठरला.

कार्यक्रमाची सुरुवात बुद्ध पौर्णिमेच्या दिवशी सकाळी ध्वजारोहणाने झाली. त्यानंतर उपस्थित नागरिकांनी एकत्र येऊन सामूहिक बुद्ध वंदना केली. विशेष आकर्षण ठरले ते ५५ बौद्ध भिक्खूंना करण्यात आलेले भोजनदान, ज्यातून सेवा आणि कृतज्ञतेचा भाव उमटला. भोजनदानानंतर उपस्थित सर्व उपासक-उपासिकांनी सामूहिक भोजन करून सामाजिक ऐक्याचा अनुभव घेतला.

सायंकाळी बुद्ध विहार परिसरात एक भव्य देखावा उभारण्यात आला होता. ज्यामध्ये तथागत गौतम बुद्ध बोधिवृक्षाखाली ध्यानस्थ अवस्थेत दाखवले गेले. याच पार्श्वभूमीवर सध्या सुरू असलेल्या युद्धाचा संदर्भ देत आपण सैनिकांच्या सोबत आहोत असा संदेश देणारी चित्रफिती आणि पोस्टर्स लावण्यात आली होती. फायर एअर बलून आकाशात सोडून बुद्ध जयंतीचे औचित्य साजरे करण्यात आले.

या आधीच्या दिवशी, बुद्ध पौर्णिमेच्या पूर्वसंध्येला, वय वर्षे ५ ते १० वयोगटातील बालकांनी लेझीम आणि भर पावसात लाठी-काठीचे प्रात्यक्षिक सादर करत नागरिकांमध्ये राष्ट्रभक्तीची जाणीव निर्माण केली. त्यानंतर उपस्थितांनी सैनिकांना पाठिंबा देणाऱ्या घोषणा दिल्या आणि राष्ट्रगीत सादर करून राष्ट्रनिष्ठेचा गौरव करण्यात आला.

या दोन्ही दिवसांच्या कार्यक्रमात बौद्ध तत्त्वज्ञानाचा प्रसार, शांततेचा संदेश आणि राष्ट्रप्रेमाची भावना ठळकपणे दिसून आली.



या उपक्रमाचे सर्व स्तरातून जोरदार स्वागत होत असून, अनेक नागरिकांनी यामध्ये सहभागी होऊन एक स्मरणीय अनुभव घेतला.

कार्यक्रमास भारतीय बौद्ध महासभा जिल्हा शाखा नांदेड उत्तर चे अध्यक्ष गणपतराव गायकवाड यांच्या हस्ते पंचरंगी ध्वजाचे ध्वजारोहन झाले आणि पुष्पाताई भरणे, ललिता पाटील यांनी निळ्या ध्वजाचे ध्वजारोहन झाले. यावेळी दामोदर सरकटे, सुभाषराव नरवाडे, रविकिरण जोंधळे, कुमार स्वांमी, केंद्रीय शिक्षिका बुक्तरे,लताताई शिंदे, आशाताई चीतोरे, रमेश सूर्यवंशी, विजय गंभीरे, रमेश कोकरे, राजेश बिऱ्हाडे, विजय रणवीर, सुभाष मल्हारे, जया सूर्यवंशी, पुष्पा भरणे, प्रभा इंगळे, रेखा कोकरे, मीरा साहेबराव गायकवाड, सागर मल्हारे, भारती बिऱ्हाडे, मंगल कवडे, अस्मिता सोनकांबळे, ललिता पाटील, शितल भवरे, आतिश ढगे, कावेरी ढगे, आशा एडके, नेहा जाधव, विशाल भद्रे, सोपान काळबांडे, माधव वैद्य, यश गायकवाड यांच्यासह अनेक मान्यवर उपस्थित होते.

या उपक्रमातून साहेबराव गायकवाड यांनी बौद्ध संस्कृतीची उजळणी, राष्ट्रप्रेमाचा संदेश, आणि सामाजिक एकतेचा प्रेरणादायी आदर्श जनतेसमोर सादर केला.

## संक्षिप्त वृत्त

### विद्या विकास माध्यमिक विद्यालयाची यशाची परंपरा कायम

**बाऱ्हाळी**-महाराष्ट्र राज्य माध्यमिक व उच्च माध्यमिक शिक्षण मंडळ पुणे, विभाग लातूर अंतर्गत घेण्यात आलेल्या एसएससी बोर्ड परीक्षेचा निकाल आज जाहीर झाला.असून या बोर्ड परीक्षेत मुखेड तालुक्यातील विद्या विकास विद्यालय बाराहाळी येथील माध्यमिक शाळेचा निकाल ९६.४८ टक्के लागला असून यावर्षीही विद्यालयानी यशाची परंपरा कायम राखली आहे. विद्या विकास विद्यालयातून बाचीपाळे पृथ्वीराज श्रीराम ९३.२०% गुण घेऊन प्रथम आलेला आहे. तर द्वितीय सोनकांबळे दीक्षा दिलीप ९१ टक्के गुण घेऊन उत्तीर्ण झाली आहे. तर तृतीय साधू दिपाली नागनाथ ९० टक्के गुण घेऊन उत्तीर्ण झाली आहे. विद्या विकास विद्यालयातील एकूण २०५विद्यार्थी परीक्षा फॉर्म भरले होते.त्यापैकी १९६ विद्यार्थी परीक्षा दिली असून ०९ विद्यार्थी अनुपस्थितीत होते. एकंदरीत विद्याविकास विद्यालयाचा ९६.४८% निकाल लागलेला आहे. या यशाबद्दल विद्या विकास शिक्षण संस्थेच्या अध्यक्ष विजयाताई देशपांडे अम्मा, प्राचार्य शशोक पंचगट्टे, उप मुख्याध्यापक दावलपुरे, पर्यवेक्षक .प्रशांत जोशी व विद्या विकास माध्यमिक व उच्च माध्यमिक विद्यालयातील शिक्षक व शिक्षकेतर बांधव यांनी उत्तीर्ण विद्यार्थ्यांचे अभिनंदन केले. व पुढील शैक्षणिक वाटचालीस शुभेच्छा दिल्या.

### भोकरच्या 'शाहूची' उच्चांकी यशाची परंपरा कायम

**भोकर** -इयत्ता दहावी बोर्ड परिक्षेचा ऑनलाईन निकाल जाहीर झाला असून नेहमीप्रमाणेच याही वर्षी 'श्री शाहू महाराज माध्यमिक व उच्च मा.विद्यालय भोकरचा' निकाल ९१.५९ टक्के लागला असून सर्वोच्च निकालाची परंपरा कायम राखली आहे. भोकर येथील श्री शाहू महाराज उच्च मा. विद्यालय हे शैक्षणिक क्षेत्रात अग्रेसर नाव असून सुरवातीपासूनच या विद्यालयात १००% कॉपीमुक्त अभियान राबवून परीक्षा घेतल्या जातात. यंदा 'शाहू'चे ८५ टक्के च्या वर गुण घेणारे ३४ विद्यार्थी, तर विशेष प्राविण्यासह १०१ विद्यार्थी उत्तीर्ण झाले आहेत.शाळेतून प्रथम मानकरी लक्ष्मीकांत विठ्ठलराव (९४.८०), द्वितीय कु.अक्कलवाड श्रेया बालाजी (९४.४०), तृतीय मुनगे ज्ञानराज सुनील (९४.००), कु.चाटलवार श्रावणी किशोर (९३.६०), बाबळे इंद्रजीत बालाजी (९३.४०), सब्बनवार साईराम विठ्ठल (९३.४०), राठोड सुदर्शन शेषराव (९३.४०), जाधव सुरज बालाजी (९३.२०), सूर्यवंशी श्रद्धा बाळू (९३.००), मोरे वैष्णवी गोविंद (९२.८०), वाघे कृष्णकांत केशव (९२.६०), चिटकेशीवार अवनीश गजानन (९२.२०), जाधव तन्मय शंकर (९२.२०), देशपांडे अजिंक्य अमोल (९१.८०),घंटलवाड ओमकार मुकिंदा(९१.००),कु. जाधव वेदिका दत्ता (९१.००), कु.सूर्यवंशी अनुष्का मारोतराव (९०.६०),कु.राठोड अयोध्या अशोक(९०.६०), दर्शनवाड सुमित मारोती(९०.४०), कदम हर्षवर्धन गोविंदराव (९०.४०), भोसले श्रीशैल्य केरबा(९०.२०), जाधव जान्हवी प्रल्हाद (८९.६०), पांचाळ सृष्टी गोविंदराव (८९.६०) विद्यार्थ्यांच्या या यशात विद्यार्थ्यांबरोबरच श्री शाहू महाराज उच्च विद्यालयातील शिक्षक व शिक्षकेत्तर कर्मचारी, तसेच पालकांचा सिंहाचा वाटा आहे. या यशाबद्दल संस्थेचे अध्यक्ष ॲड. गोविंदराव पाटील लामकानीकर, सचिव शिरीषभाऊ देशमुख गोरठेकर, नूतन सेवाभावी शिक्षण संस्थेचे सचिव कैलासभाऊ देशमुख गोरठेकर, उपाध्यक्ष शिवाजीराव पाटील कार्लेकर, सहसचिव राजेश्वरराव वंगलवार, मु.अ. संजय देशमुख कामनगावकर, उप.मु.अ. कैलास किनेवाड , गोडगे, चव्हाण, सलीम, शिंदे, शेख, काळवणे, सावते व सर्व शिक्षक व शिक्षकेतर बांधवांनी यशस्वी विद्यार्थ्यांचे अभिनंदन केले.

### महात्मा गांधी विद्यालयाचा दहावीचा निकाल ९०.६५ टक्के

**मुदखेड** -मुदखेड माध्यमिक व उच्च माध्यमिक शिक्षण मंडळाने फेब्रुवारी मार्च २०२५ मध्ये घेतलेल्या इयत्ता दहावी परीक्षेचा निकाल आज जाहीर झाला असून या परीक्षेत महात्मा गांधी माध्यमिक विद्यालयाने गेल्या वर्षीप्रमाणे याही वर्षी घवघवीत यश संपादन केले आहे या यशामुळे शाळेचा एकूण निकाल ९०.६५टक्के लागला आहे या परीक्षेत अंजनवाड श्रावणी हीने ९६.८० टक्के गुण घेवुन प्रथम क्रमांक मिळविला आहे तर दुसरा पचलिंग सृष्टी हीने ९२ टक्के गुण प्राप्त केले आणि तृतीय क्रमांक गाढे शिवपुजा हीने ९१.८० टक्के गुण प्राप्त केले आहेत तालुक्यातील सर्वात मोठी आणि सर्वात जुनी शाळा म्हणून संबोधले जाते त्यामुळे शहरातील आणि परिसरातील शिक्षणप्रेमी नागरिकांच्या शाळेकडून जास्त अपेक्षा असतात शिक्षण प्रेमी नागरिकांच्या अपेक्षेस अनुसरून यावर्षी दहावीचा निकाल लागलेला आहे यामुळे शहरातील आणि परिसरातील नागरिकांनी विद्यार्थ्यांवर कौतुकाचा वर्षाव केला आहे. शाळेतील एकूण विद्यार्थी विद्यार्थिनी २१५ एवढे परीक्षेस प्रविष्ट झाले होते त्यापैकी १९४ विद्यार्थी विद्यार्थिनी उत्तीर्ण झाले आहेत ४० विद्यार्थी विद्यार्थिनी विशेष प्राविण्य मिळविले आहे तर प्रथम श्रेणीमध्ये ६४ तर द्वितीय श्रेणीमध्ये ६७ आणि तृतीयश्रेणी मध्ये २३ विद्यार्थी विद्यार्थिनी आले आहेत. या सर्व उत्तीर्ण विद्यार्थ्यांचे आणि इयत्ता दहावी अध्यापन करणाऱ्या सर्व शिक्षकांचे विशेष अभिनंदन संस्थेचे अध्यक्ष राम चौधरी, उपाध्यक्ष रामप्रसाद सोनी, सचिव लक्ष्मणराव सोनटक्के, कोषाध्यक्ष शंकरराव पचलिंग, शिक्षक प्रतिनिधी किरण देशपांडे, मुख्याध्यापक बाबुराव नाईक, पर्यवेक्षक प्रदीप बाविस्कर, शिक्षक नेते यशवंत कांबळे, संजय राजे, माधवराव कुलकर्णी, प्रभाकर नागरगोजे, तुषार देशमुख, सौ. जोरगुलवार, बालाजी बुन्नावार, कालिदास कोंपले, प्रकाश देशमुख, रघुनाथ मिटके, चंद्रकांत वाघमारे,सुनिता भोनगिरवार, सुप्रिया डुडूळे, बालाजी वड्डे, विजय वाढे, गोविंद यरपलवाड, खिरोजी बिस्मीले, धर्मा पल्लेवाड,कार्तिक वडे, ईत्यादीसह शिक्षक वशिक्षकेत्तर कर्मचा-यांनी अभिनंदन केले आहे.

## शिव - भिम आदर्श समाज भूषण राज्यस्तरीय पुरस्कारासाठी रामेश्वर बोरकर यांची निवड

**तभा वृतसेवा**
**निवघा बा., दि. १३ मे-**

साप्ताहिक प्रहार न्यूज आणि जनसामान्यांचा प्रहार न्यूज चॅनल च्या वर्धापन दिनानिमित्त प्रहार जनशक्ती पक्षा तर्फे विविध क्षेत्रात उल्लेखनीय कार्य करणाऱ्या व्यक्तींचा विविध पुरस्कार देऊन सन्मान करण्यात येणार असून , हदगाव तालुक्यातील शिरड येथील गेल्या २५ वर्षा पासून पत्रकारीता क्षेत्रात काम करण्या बरोबरच सामाजिक क्षेत्रात विविध सेवा भावी संस्थे मार्फत अनाथ मुलिंच्या लग्ना करीता संसार उपयोगी साहित्याची भेट देतात.

मागील पाच वर्षात जवळपास तीस ते चाळीस अनाथ मुलींच्या लग्ना करीता जमेल तशी मदत केली . त्यांच्या या कार्याची दखल घेऊन शिव - भिम आदर्श समाज भूषण पुरस्कारा करीता निवड झाल्याचे कार्यक्रमाचे आयोजक विकास गायकवाड यांनी नुकतेच निवडपत्र दिले असून पुरस्कार समारंभ २५ मे रविवार रोजी तारदाळ ता . हातकणंगले जि . कोल्हापूर येथे माजी मंत्री बच्चू भाऊ कडू यांच्या हस्ते पुरस्कार देऊन सन्मान करण्यात येणार आहे. त्यांच्या या निवडीचे सर्वच स्तरातून स्वागत होत आहे .

## सिडको येथील विविध बुद्ध विहारात बुद्ध जयंती साजरी

**तभा वृतसेवा**
**नवीन नांदेड , दि. १३ मे-**

वैशाखी पौर्णिमा अर्थात बुद्ध जयंती निमित्त सिडको येथे डॉ बाबासाहेब आंबेडकर पार्कसह सिडकोतील व विविध बुद्ध विहारात दिनांक १२ मे रोजी बुद्ध जयंती मोठ्या हर्ष-उल्हासात साजरी करण्यात आली.

सिडको हडको भागातील सर्व समाज बांधवांच्या वतीने डॉ. बाबासाहेब आंबेडकर पार्क येथे दिनांक १२ मे रोजी सकाळी ठीक ११ वाजता प्रमुख पाहुणे राष्ट्रवादीचे भारत काकडे यांच्या वतीने पंचरंगी ध्वजाचे ध्वजारोहण करण्यात आले. तत्पूर्वी विश्वाला शांतीचा संदेश देणारे महाकारुणिक तथागत भगवान गौतम बुद्ध



यांच्या प्रतिमेस पुष्प वाहून अभिवादन करण्यात आले. तसेच डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्या अर्धाकृती पुतळ्यास पुष्पहार अर्पण करून सामूहिकरीत्या बुद्ध वंदना, धम्मवंदना, संघ वंदना घेण्यात आली.

यावेळी राष्ट्रवादी काँग्रेस पार्टीचे जीवन पाटील घोगरे, भारत काकडे, पी. एस. गवळे, विलास गजभारे , सामाजिक कार्यकर्ते राजू लांडगे, एकनाथ वाघमारे, प्रसेंजित वाघमारे, सम्राट आढाव,डि.के. कांबळे, शंकरराव धिरडीकर , आकाश सोनकांबळे, अनिल मोरे, मनोहर कोकरे, पप्पू गायकवाड, विशाल जोंधळे, दिलीप लांडगे, राहुल वाडे, हरी कसबे, सम्राट आढाव, आकाश गंधपवाड, महेंद्र गवळे, दीपक सूर्यवंशी, पांडुरंग वाडे, प्रशिक थोरात, एस एन सोनसळे, चंदू भुरे, रामचंद्र जमदाडे, अमृत कराळे ,सुदर्शन कांचनगिरे, केशव कांबळे, नवनाथ कांबळे, प्रीतम मस्के, यांच्यासह महिलांची मोठ्या संख्येने उपस्थित होते.

## उमरीत शहरात पिस्टलसह जिवंत काडतूस जप्त



**तभा वृतसेवा**
**नांदेड , दि. १३ मे-**

स्थानिक गुन्हा शाखेच्या एका पथकाने उमरी शहरात पेट्रोलिंग करीत असताना एका व्यक्तीकडून एक पिस्टल व एक जिवंत काडतूस जप्त केले आहे.

ऑल आऊट ऑपरेशन अंतर्गत स्थानिक गुन्हा शाखेचे पथक सबंध नांदेड जिल्ह्यात गस्त घालत आहे. पोलीस निरीक्षक उदय खंडेराय, खंडणी विरोधी पथकाचे बी.एच.घोगरे हे उमरी शहरात पेट्रोलिंग करीत असताना त्यांना एक व्यक्ती संशयास्पदरित्या हालचाल करीत असताना दिसून आला. शेख रियाज शेख लतिफ (२५) रा.टिचर कॉलनी उमरी असे त्याचे नाव होते. त्याची अंगझडती घेतली

असता त्याच्याजवळ एक पिस्टल व एक जिवंत काडतूस मिळून आले. पोलिसांनी त्यास अटक करुन त्याच्याविरुध्द गुन्हा दाखल करुन सदर आरोपीला उमरी पोलीस ठाण्यात हजर केले आहे. त्यास अटक करुन त्याच्याविरुध्द पुढील कारवाई करण्याचे काम सुरु आहे. नेमक्या कोणत्या उद्देशाने आला होता याची माहिती पोलीस घेत आहेत.

## स्वामी विवेकानंद विद्या विहार विद्यालयाचा शंभर टक्के निकाल



**तभा वृतसेवा**
**बाऱ्हाळी, दि. १३ मे-**

नूकत्याच जाहीर करण्यात आलेल्या ई.१०वि च्या निकालात बा-हाळी येथील स्वामी विवेकानंद विद्या विहार विध्यालयाचा १००% निकाल लागला असून आठ विद्यार्थी ९० टक्के वर गूण घेतले आहेत.

फेब्रुवारी/मार्च महिन्यात घेण्यात आलेल्या ई.१०वि चा निकाल जाहीर करण्यात आला आहे .यात बा-हाळी येथील ईंग्रजी माध्यमातील स्वामी विवेकानंद विद्या विहार विध्यालयाने यशाची गूढी उभारली आहे .१००% निकाल देत आघाडी घेतली आहे. सात्विक रेड्डी ९७.२०,स्नेहा रामगिरवार ९५.६०,सूदर्शन मंदेवाड ९५.२०, चक्रधर क-हाळे ९४.४०,साईप्रसाद सोमवार ९४.२०, ताजोद्दिन शेख ९४., संध्या कोटगीरे ९३.,गौरी पाटील९०.६०, पल्लवी गायकवाड ८९.६०,श्रीधर क-हाळे ८९.,श्रद्धा पाटील ,८६.४०,श्रद्धा अं.पाटील ८५.४०, सौरभ नेवळीकर ८४.८०,तन्मय ईखे ६५ गूण घेत ग्रामीण भागातील गुणवत्ता सिद्ध केली .

यशस्वी विद्यार्थ्यांचे मूख्याध्यापक प्रविण रेड्डी, व्यवस्थापक सौ.सूनिता रेड्डी, समन्वयक बालाजी पांचाळ, शेषू पसूला,आतिका शेख,सौ.पूजा पांचाळ, गंगाधर जाधव यांच्या सह पालक ,पत्रकार साईनाथ कोटगीरे ,दत्तात्रय तिपणे, उत्तम वाडीकर ,केशव रापतवार ,नरसिंग अस्वले ,संपतराव गायकवाड, सन्मूख मठदेवरु ,अजीत पवार यांच्या सह अनेकांनी अभिनंदन केले आहे.



नांदेड- भारतीय जनता पार्टी नांदेड महानगर जिल्हाध्यक्ष पदी माजी आ. अमरनाथ राजूरकर यांची निवड झाल्याबद्दल शुभेच्छा देतांना दिलीपसिंघ सोढी, विजय येवनकर, प्रविण साले, शेरसिंघ भुल्लर, अंबादास जोशी व स.रविसिंघ खालसा, राज यादव, बागड्या यादव आदी.

## अवैध रेती वाहतुक करणारा हायवा जप्त; ग्रामिण पोलिसांची कारवाई

**तभा वृतसेवा**
**नांदेड, दि. १३ मे**



ग्रामीण पोलीस ठाण्याच्या हद्दीत रेतीची चोरटी वाहतूक करणारा टिप्पर आणि अवैध रेती असा ३० लाख २५ हजार रुपयांचा मुद्देमाल जप्त करण्यात आला आहे.

नांदेड ग्रामीण पोलिस ठाण्याचे पोलीस निरीक्षक ओमकांत चिंचोलकर यांना मिळालेल्या माहितीनुसार काल रात्री दहा वाजण्याच्या सुमारास पेट्रोलिंग करत असताना जुने बोंढारकडे जाणारा हायवा ट्रक क्र.एमएच-२६-बीई-९७२७ हा त्यांनी अडवला. त्यांच्याकडे कुठलीही कागदपत्रे नसल्याने त्यांनी सदरचा ट्रक व त्यातील पाच ब्रास रेती असा ३० लाख २५ हजार रुपयांचा मुद्देमाल जप्त केला. याबाबत शिवानंद संभाजी पुयड या चालकास ताब्यात घेवून त्याच्याविरुध्द गुन्हा दाखल करण्यात आला आहे.

## धर्माबाद ग्रामीण रुग्णालयात 'जागतिक परिचारिका दिन' साजरा

**तभा वृतसेवा**
**धर्माबाद, दि. १३ मे-**

आधुनिक नर्सिंगचा पाया रचणाऱ्या फ्लोरेन्स नाईटिंगेल यांचा १२ मे रोजी जन्मदिवस आहे. त्यांच्या स्मरणार्थ व सन्मानार्थ हा दिवस 'जागतिक परिचारिका दिन' म्हणून जगभरात (खपींशीपरींळेपरश्र छीीशी ऊ.) साजरा केला जातो. याच औचित्याने धर्माबाद ग्रामीण रुग्णालयात गुरुवार, दि.१२ मे रोजी 'जागतिक परिचारिका दिन' मोठ्या उत्साहात साजरा करण्यात आला. ग्रामीण रुग्णालय ग्रामीण रुग्णालयाचे वैद्यकीय अधीक्षक डॉ. वेणुगोपाल पंडित, डॉ. श्याम लखमावार यांच्या हस्ते फ्लोरोन्स नाइटिंगेल परिचारिका यांच्या प्रतिमेस पुष्पहार अर्पण व अगरबत्ती ,मेणबत्ती दिप प्रज्वलन करण्यात आले. इंन्चार्ज सिस्टर शुभांगी सुर्यवंशी,जेष्ठ परिचारिका कल्पना ठाकुर, महामुनी यांनीही पुष्पहार अर्पण करून अभिवादन केले.

डॉक्टरांसह परिचारिकांनी रात्रंदिवस रुग्णांची सेवा करतात. कोणत्याही रुग्णाच्या आरोग्यामध्ये डॉक्टरची जितकी महत्त्वाची भूमिका असते, तितकीच महत्त्वाची भूमिका नर्सची असते. नर्स आजारी व्यक्तींची काळजी घेते. डॉक्टर दिवसभर रुग्णासोबत राहू शकत नाही. नर्स रुग्णाच्या स्थितीवर लक्ष ठेवते. परिचारिकांच्या या सेवाभावाचा सन्मान करण्यासाठी आणि त्यांच्या योगदानाची प्रशंसा करण्यासाठी दरवर्षी जगभरात आंतरराष्ट्रीय परिचारिका दिन साजरा केला जातो. आंतरराष्ट्रीय परिचारिका दिन दरवर्षी १२ मे रोजी साजरा केला जातो. जानेवारी १९७४ मध्ये हा दिवस साजरा करण्यास सुरुवात झाली. मात्र, नंतर मे महिन्यात परिचारिका दिन साजरा केला जाऊ लागला. फ्लॉरेन्स नाइटिंगेलला 'द लेडी विथ द लॅम्प' म्हणूनही ओळखले जाते. त्यांचा जन्म १२ मे १८२० रोजी इटलीमध्ये झाला. त्यांनी आयुष्यभर रुग्णांची सेवा केली. त्या काळात जगभरात आरोग्याशी संबंधित सुविधांचा तुटवडा होता. विजेचा तुटवडा असल्याने ती हातात कंदील घेऊन रुग्णालयात रुग्णांची सेवा करत होत्या.त्यांच्या परिश्रमामुळे परिचारिकांना समाजात मानाचे स्थान मिळाले. आंतरराष्ट्रीय परिचारिका परिषदेने १९७४ मध्ये आंतरराष्ट्रीय परिचारिका दिन साजरा करण्याची घोषणा केली होती. त्या काळात परिचारिकांना किट वाटण्याचे काम आंतरराष्ट्रीय परिचारिका परिषदेकडून करण्यात आले. ते परिचारिकांच्या कामाशी निगडीत गोष्टी पाहत असायचे. अशी माहिती देण्यात आली. या वेळी रुपाली सोनटक्के , जयश्री किनेवाड,प्रिया लोणे, मिना पेदे, शिल्पा माडेवार,जेनिफर वाघमारे, प्रतिक्षा कांबळे, सह नर्सिंग चे शिक्षण घेत असलेल्या मयुरी सोनकांबळे, विद्या कांबळे,संध्याराणी कांबळे, कल्पना वाघमारे, प्रतिभा तांदुलवार, गंगोत्री शेळके, दुर्गा मदनुरे, प्रिती सोनकांबळे, मयुरी सोनकांबळे, अनुसया बोंमले, सह रुग्णालयातील अनेक कर्मचारी उपस्थित होते. तर श्रीमती मनीषा महामुनी यांनी प्रतिज्ञा वाचन केले व उपस्थित सर्वांनी सेवेची प्रतिज्ञा घेतली. इंन्चार्ज च्या वतीने अल्प उपहार , शीतपेय चे आयोजन करण्यात आले होते.

## सावित्रीबाई माध्यमिक विद्यालयाची यशाची परंपरा कायम

**तभा वृतसेवा**
**देगलूर , दि. १३ मे-**

शहरातील नामांकित सावित्रीबाई फुले माध्यमिक विद्यालय देगलूर,या विद्यालयाचा निकाल दरवर्षी प्रमाणे याहीवर्षी उल्लेखनीय लागल्याने दहावीच्या परीक्षेत पुन्हा सावित्रीबाई फुले विद्यालयाने यशाची परंपरा कायम ठेवली.

सदरिल विद्यालयात सेमी व मराठी असे दोन वर्ग चालतात शैक्षणिक वर्ष २०२४ - २५ मध्ये दोन्ही वर्गातुन एकूण ११० विद्यार्थी परिक्षेस बसलेले होते. त्यापैकी १०० विद्यार्थी उत्तीर्ण झाले.कु. पूनम शिंपाळे (८९%), कु. शुभांगी चव्हाण (८८. २०%), कु. पूजा बगडे (८८.२०%) यांच्यासह शाळेतील सेमी तुकडीचा निकाल हा १०० टक्के असून, विशेष प्राविण्य मिळवणारे १५ विद्यार्थी तर प्रथम श्रेणीतील ३६ आणि व्दितीय श्रेणीमध्ये ३४ विद्यार्थी व पास विद्यार्थी १४ यशस्वी झाले असून शाळेचा निकाल हा ९०.९९ टक्के लागला आहे. या यशाबद्दल लोकहित शिक्षण संस्थेचे,अध्यक्ष राजाराम कहाळेकर, संस्थेचे सचिव ॲड. जयवंत गजभारे , माध्यमिक विद्यालयाचे मुख्याध्यापक यशवंत गजभारे, प्राथमिक शाळेचे मुख्याध्यापक किशन पाटील तसेच शाळेतील सर्व शिक्षक,शिक्षिका व शिक्षेकेत्तर कर्मचाऱ्यांनी गुणवंत विद्यार्थ्यांचे तसेच दहावीच्या सोमूरे व्हि. एस. व चिद्रावार ए. ए तसेच परीक्षा प्रमुख विशाल पवार यांच्यासह दोन्ही वर्गाचे वर्ग शिक्षक तसेच सर्व शिक्षकांनी परिश्रम घेतले त्याबद्दल संस्थेकडून अभिनंदन करण्यात आले.

सोलापूर तरुण भारत
www.dainiktarunbharat.com, epaper.dainiktarunbharat.com

# घोसापुरीतील कामे पाहून सीईओ आदित्य जीवणे यांनी केले कौतूक

**तभा वृत्तसेवा**
**बीड दि.१३ मे**

सरपंच हा गावातील प्रथम नागरिक असतो. सरपंचाने ठरवल्यास गाव कुठल्या कुठे जाते हे यापुर्वी पोपटराव पवार, भास्कराव पेरे आदींनी दाखवून दिलेले आहे. अशीच सर्वसामान्यांचे काम करण्याची तळमळ पाहून घोसापुरीच्या सरपंचपदी शेख फारुक यांची निवड करण्यात आली. काही वर्षातच शेख फारुक यांनी घोसापुरीचे रुपडे बदलले. रविवार, ११ रोजी जिल्हा परिषदेचे मुख्यकार्यकारी अधिकारी आदित्य जीवणे यांनी घोसापुरी गावाला भेट दिली. यावेळी गावातील झालेल्या व सुरु असलेल्या कामांची पाहणी केली. झालेल्या कामाचे कौतूकही केले. यावेळी प्रकल्प संचालक संगीतादेवी पाटील, ग्रामसेवक रविंद्र हावळे, उपसरपंच सुभाष जाधव यांची उपस्थिती होती.



बीड शहरापासून जवळच असलेले घोसापुरी हे गाव. पिण्याच्या पाण्यापासून ते रस्ते, नाली, पथदिवे अशा अनेक अडचणींचा ग्रामस्थांना सामना करावा लागत होता. गावातील विविध कार्यामध्ये सक्रिय सहभाग असलेल्या शेख फारुक यांची धावपळ पाहून त्यांच्याच गळ्यात बिनविरोध सरपंचपदाची माळ टाकण्यात आली. अवघ्या काही महिन्यात शेख फारुक यांनी घोसापुरीचा चेहरामोहरा बदलून टाकला. जलजीवन योजना, रस्ते, नाल्या, अंगणवाडी ही कामे अत्यंत दर्जेदार केली. तसेच ग्रामपंचायत भवनासह इतर कामे प्रगतीपथावर आहेत. ११ मे रोजी जिल्हा परिषदचे मुख्यकार्यकारी अधिकारी आदित्य जीवणे यांनी घोसापुरी येथे भेट दिली. यावेळी त्यांनी पंतप्रधान आवास योजना, मोदी आवास योजना व रमाई आवास योजनामधील लाभार्थ्यांच्या घरकुलाचा आढावा घेतला. या भेटी दरम्यान घोसापुरी येथील नवीन अंगणवाडी इमारतचे उद्घाटन जीवने यांच्या हस्ते करण्यात आले. अंगणवाडीचे उत्कृष्ट बांधकाम पाहून त्यांनी समाधान व्यक्त केले. तसेच यादरम्यान त्यांनी गावांमध्ये नवीन घरकुलांचे भूमिपूजन केले. गावामधील चालू व पूर्ण झालेल्या घरकुलाच्या कामांना भेटी दिल्या व इतर घरकुलांची कामे गतीने पूर्ण करून दिवाळी नवीन घरात करण्याबाबत सूचना दिल्या. प्रधानमंत्री आवास योजनामधील लाभार्थ्यांचे नरेगा मस्टर कटाक्षाने तात्काळ काढून त्यांचे मस्टर पेमेंट बद्दल लाभार्थ्यांना माहिती दिली. तात्काळ शंभर टक्के मस्टर मागणी देण्याबाबत सूचना देण्यात आल्या. या भेटी दरम्यानच त्यांनी गावातील इतर भौतिक सुविधांची पाहणी करून त्याबाबत समाधान व्यक्त केले. याप्रसंगी घोसापुरीचे उमदे नेतृत्व शेख फारुक, ग्रामपंचायत अधिकारी रवींद्र हावळे, प्रभारी सरपंच सुभाष जाधव, ग्रामपंचायत सदस्य कल्याण बांड, अजय माळी, लक्ष्मण कदम, शेख आवेज, सुरेश वैद्य, विकास वाघमारे, शालेय समितीचे अध्यक्ष राजाभाऊ माळी, श्रीमंत वैद्य, आजिनाथ पोकळे, भारत कानडे, शेरु भाई व गावातील इतर प्रतिष्ठित नागरिक, घरकुल लाभार्थी, अंगणवाडी सेविका, ग्रामरोजगारसेवक आणि पंचायत समिती बीड येथील घरकुल विभागातील विस्तार अधिकारी चांगण, अमोल चव्हाण, घरकुल इंजिनियर देवडकर, प्रभारी अधिकारी नागरगोजे, उमेदच्या गोस्वामी यांच्यासह आदींची उपस्थिती होती.

# अवघी दुमदुमली नेकनुर नगरी.. १ लाख भाविकांच्या उपस्थितीत संत बंकटस्वामीच्या ८१ व्या पुण्यातिथी उत्सवाची थाटात सांगता

**तभा वृत्तसेवा**
**बीड दि.१३ मे**

वारकरी संप्रदायाचे भक्ती सूर्य महान संत वै बंकटस्वामी महाराज यांच्या ८१ व्या पुण्यतिथी उत्सवाची मंगळवारी दुपारी काल्याच्या कीर्तनांने थाटात सांगत झाली. सकाळी समाधी अभिषेक करण्यात आला तर दुपारी ११ ते २ या वेळेत श्री ह भ प गु ज्ञानसिंधू संदिपान महाराज हासेगावकर यांचे सुश्राव्य काल्याचे कीर्तन संपन्न झाले. या सोहळ्यासाठी महाराष्ट्राच्या कानाकोपऱ्यातून लाखों भाविक भक्तांनी उपस्थिती लावली होती.

यात प्रमुख संत महंत उपस्थिती श्री प्रमुख उपस्थिती.महादेव महाराज तात्या श्रीक्षेत्र चाकरवाडी, श्री ह भ प अक्षय महाराज भोसले शिवसेना आध्यात्मिक आघाडीचे अध्यक्ष , श्री ह भ प ज्ञानेश्वर माऊली मंझरीकर ज्येष्ठ कीर्तनकार श्री ह भ प महंत नवनाथ महाराज जरूड महंत हरिहर भारती महाराज ,स्वामी स्वरूपानंद सरस्वती,रामहरी महाराज डबरे रामेश्वर महाराज हंगेवाडीकर ,आदिकनाथ महाराज ,मुरलीधर महाराज बारगजे ,सतीश महाराज तट,ज्ञानेश्वर महाराज पिसे,सत्यवान महाराज लाटे ,सोपान महाराज खोंड दत्त संस्थान,प्रशांत महाराज क्षीरसागर ,नरेश महाराज संगमेश्वर मंदिर इटवाडा,विठ्ठल महाराज आंधळे शास्त्री,गणेश महाराज आमटे,विष्णुपंत महाराज लोंढे गुरुजी ,अर्जुन महाराज शिंदे,हरिदास भाऊ जोगदंड ,अरुण नाना डाके, विष्णूदास महाराज सुरवसे, नाना महाराज कदम, सुरेश महाराज जाधव, गणेश महाराज बांडे यांचे उपस्थिती होती.तर सामाजिक व राजकीय उपस्थिती, खासदार बजरंग सोनवणे, आमदार माजी मंत्री सुरेश धस, आमदार नमिता मुंदडा, डॉ ज्योतीताई मेटे,रमेश आडसकर (स्वागत) सचिन मुळीक,राष्ट्रवादी ओबीसीचे नेते कल्याण काका आखाडे,गंगाधर नाना काळकुटे ,गणेश वरेकर , गोरख सिंघन ज्येष्ठ नेत्या सुशीलाताई मोराळे , विजयराजजी बंब नानासाहेब काकडे पाटील. नितीन धांडे बबन गवते,सुग्रीव रसाळ,यांच्या सह बंकटस्वामी संस्थान चे सर्व विश्वस्त उत्सव कमेटी नेकनूर पंचक्रोशी व हजारो भाविकांची उपस्थिती होती.

# कृषी क्षेत्रात आदित्य शिक्षण संस्थेचे नाव विद्यार्थ्यांनी अटकेपार नेले

**तभा वृत्तसेवा**
**बीड दि.१३ मे**

विद्यार्थ्यांच्या यशावर संस्था नावारूपाला येत असते. आदित्य शिक्षण संस्थेच्या आदित्य कृषी महाविद्यालयातील विद्यार्थी आज शासकीय, खासगी क्षेत्रात मोठ-मोठ्या पदावर कार्यरत आहेत. महाविद्यालयात त्यांनी घेतलेली मेहनत आणि येथील प्राध्यापकांच्या योग्य मार्गदर्शनामुळे आज आदित्य कृषी महाविद्यालयातील विद्यार्थ्यांनी अटकेपार झेंडा रोवला असल्याने आम्हाला विद्यार्थ्यांचा सार्थ अभिमान आहे. आपणही कृषी क्षेत्रात चांगले योगदान देऊन शेतकऱ्यांसाठी, देशासाठी मोठे कार्य कराल असे प्रतिपादन वसंतराव नाईक मराठवाडा कृषि विद्यापीठ परभणीच्या कार्यकारी सदस्या तथा आदित्य शिक्षण संस्थेच्या संचालिका डॉ. आदिती सारडा यांनी केले. आदित्य शिक्षण संस्थेचे मुख्य प्रवर्तक सुभाषचंद्रजी सारडा, संचालक डॉ.आदित्य सारडा यांच्या मार्गदर्शनाखाली आदित्य कृषी महाविद्यालयाच्या विद्यार्थ्यांच्या निरोप समारंभाचा कार्यक्रम अयोजित करण्यात आला होता.



या प्रसंगी प्रमुख पाहुण्या म्हणून त्या बोलत होत्या.यावेळी व्यासपीठावर आदित्य कृषी महाविद्यालयचे प्राचार्य डॉ. कल्याण आपेट ,प्राचार्य शाम भुतडा, प्राचार्य डॉ. अमोल सानप यांची उपस्थिती होती. पुढे बोलताना त्या म्हणाल्या की, आदित्य कृषी महाविद्यालया मधील विद्यार्थ्यांची बॅच बाहेर पडताना एका डोळ्यामध्ये अश्रू तर दुसऱ्या डोळ्यांमध्ये आनंद आहे. उद्या हे विद्यार्थी प्रत्येक संकटावर मात करत यशस्वीपणे आपले कर्तव्य बाजावतील. यामध्ये कोणतीही शंका नाही. यावेळी अमोल मोहरे ह्या विद्यार्थ्याने आपला महाविद्यालयातील प्रवास सांगितला. कशाप्रकारे महाविद्यालय व संस्था नेहमी त्याच्या पाठीशी उभी होती हे त्याने आपल्या शब्दात सांगितले. पूजा काशीद, आणि आदित्य भोकरे ह्या विद्यार्थिनींनी आपले मनोगत व्यक्त केले. कार्यक्रमाचे प्रस्ताविक प्रा. व्ही. बी. शिंदे यांनी केले. त्यांनी मुलांना भविष्यात कशाप्रकारे पुढे जायचे आहे. याबद्दल मार्गदर्शन केले. कार्यक्रमाचे सूत्रसंचालन प्रा. प्रिया गव्हाणे यांनी तर आभार प्रा. डॉ. पी. डी. खेडकर यांनी मानले. यावेळी प्रा. प्रिया गव्हाणे, प्रा.ध्यापक व्ही .बी. शिंदे, प्रा.डॉ. पी.डी. खेडकर, प्रा. व्ही. एस. मिसाळ, प्रा.डॉ.एन. यु. ठोके, प्रा.डॉ. डी. बी. सातपुते यांची उपस्थिती होती.शेती आणि मातीशी नाळ जोडा-प्राचार्य डॉ. कल्याण आपेट-कृषी क्षेत्रातील विद्यार्थ्यांनी पदवी घेतली. या पदवीचा उपयोग आपल्या ग्रामीण भागातील शेतकऱ्यांसाठी करा. शेती आणि मातीशी नाळ जोडा. आपल्या नवनविन तंत्रज्ञानाचा शेतकऱ्यांना कसा फायदा होइल. कमी क्षेत्रात, कमी कष्टाच्या कामातून जास्तीत जास्त उत्पन्न कसे वाढले. या साठी विद्यार्थ्यांनी विविध प्रयोग केले पाहिजेत. त्यासाठी आपण शेती आणि मातीशी नाळ जोडली पाहिजे असे आवाहन आदित्य कृषी महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ. कल्याण आपेट यांनी केले.

# अक्षय मुंदडांना शुभेच्छा देण्यासाठी बंगल्यावर तुफान गर्दी

## पंतप्रधान सहाय्यता निधी, रक्तदान, बी-बियाणे वाटप, आंब्याचे रोप आदी कार्यक्रमाने वाढदिवस साजरा

**तभा वृत्तसेवा**
**अंबाजोगाई दि.१३ मे**

भाजपाचे युवा नेते अक्षय मुंदडा यांनी स्वत:चा वाढदिवस भारत-पाकिस्तान युद्धजन्य परिस्थितीच्या पार्श्वभुमीवर साजरा करण्यास अनुमती दिली नसताना देखील विविध सामाजिक उपक्रम कार्यकर्त्यांनी साजरे करून संवेदना जपल्या. हार-तुरे स्विकारले नसले तरी शुभेच्छा देण्यासाठी केज मतदारसंघातुन तथा बीड जिल्ह्यातून हजारो कार्यकर्ते, मित्र परिवार, हितचिंतक प्रत्यक्ष बंगल्यावर येवुन गेले. एवढेच नव्हे तर सकाळपासून रात्रीपर्यंत तुफान गर्दी जमली होती. ७५ कार्यकर्त्यांनी रक्तदान केले तर पंतप्रधान सहाय्यता निधीला देखील सढळ हस्ते जीवाभावाच्या कार्यकर्त्यांनी मदत टाकून राष्ट्रीय कार्यात योगदान दिले. दरम्यान सेवाभाव हेच माझे मुळ तत्व असुन गोरगरिबांची सेवा आयुष्यभर करत रहाणार या शब्दांत अक्षय मुंदडा यांनी प्रतिक्रिया दिली. लेकरांचं कौतुक पहाण्यासाठी नंदकिशोर मुंदडा जातीने दिवसभर सभागृहात बसुन होते हे विशेष.



या मतदारसंघात अक्षय मुंदडा यांची विशेष क्रेज तथा सवंग लोकप्रियता किती दांडगी याचा अनुभव वाढदिवसाच्या निमित्ताने आला. खरं तर त्यांनी युद्धजन्य पार्श्वभुमीवर वाढदिवस साजरा करण्याचे ठरवले नाही. मात्र जीवाभावाच्या कार्यकर्त्यांनी विविध सामाजिक उपक्रम घेतले होते. एकही हार-तुरे घेतला नसला तरी अक्षय मुंदडा मित्र मंडळाच्या वतीने रक्तदान शिबीराचे आयोजन शिवाय मधुमेह तपासणी ठेवली होती. त्यात ७५ तरूण कार्यकर्त्यांनी रक्तदान केले तर मधुमेह तपासणीमध्ये ३२ रूग्ण निघाले. केज भाजपाच्या वतीने डॉ.वासुदेव नेहरकर आणि भगवान केदार यांनी अभिनव उपक्रम घेत वृक्ष लागवडीला प्रोत्साहन देताना केशर आंबा रोप वाटप कार्यकर्त्यांना केले. शहराच्या बांधकाम व्यवसायातील केएसबील ग्रुपच्या वतीने आत्महत्याग्रस्त शेतकर्यांच्या कुटुंबाला बियाणे व खताचे पोते स्वत: अक्षय मुंदडा यांच्या उपस्थितीत नगर परिषद सभागृहात वाटप करण्यात आले. वाढदिवस साजरा करण्याचे ठरवले नसताना देखील संपुर्ण मतदारसंघातील कानाकोपर्यामधुन सरपंच, चेअरमन, प्रमुख पदाधिकारी, कार्यकर्ते, विविध क्षेत्रातील मान्यवर शुभेच्छा देण्यासाठी अक्षय बंगल्यावर उपस्थित राहिले. पंतप्रधान सहाय्यता निधीला मदत देण्याचे आवाहन केल्यानंतर सभागृहात ठेवलेल्या पेटीत योगदान देण्यासाठी कार्यकर्त्यांच्या रांगा लागल्या. शक्य तेवढे योगदान अनेकांनी पुढे येवुन दिले. एखादा तरूण राजकारणी सामाजिक संवेदना जोपासत जेव्हा राजकारण करतो त्यावेळी समाजातील इतर तरूण देखील आदर्श घेतल्याशिवाय रहात नाहीत. वर्तमान काळात वाढदिवस म्हटलं की हार-तुरे, केक, शाल असं स्वरूप असतं. मात्र या तरूण नेतृत्वाने वाढदिवसानिमित्त प्रत्यक्ष कृतीतून दाखवुन दिलेला साधेपणा कौतुकाचा विषय ठरला. जीवाभावाचे कार्यकर्ते जेव्हा शुभेच्छा देण्यासाठी येत होते, प्रत्येकाची आस्थेवाईक चौकशी करत थोरामोठ्यांचे आशिर्वाद घेत त्यांनी स्वभावातली नम्रता देखील मनं जिंकुन घेणारीच ठरली. विविध ठिकाणचे कार्यक्रम तथा दिवसभर बंगल्यावर उपस्थित राहिलेल्या लेकराला शुभेच्छा देण्यासाठी येणार्यांची गर्दी पाहुन नंदकिशोर मुंदडा यांना देखील गहिवरून आले. दरम्यान, बंगल्यावर सर्व कार्यक्रम व्यवस्थित पार पाडण्यासाठी पक्षाचे प्रमुख पदाधिकारी, कार्यकर्ते, मित्र परिवार, हितचिंतक मोठ्या प्रमाणावर परिश्रम घेताना दिसले.

राज्याच्या पर्यावरण, पशु संवर्धन, कॅबीनेट मंत्री ना.पंकजाताई गोपीनाथ मुंडे यांनी भ्रमणध्वनीवरून शुभेच्छा दिल्या. जिल्ह्याच्या माजी खा.डॉ.प्रितमताई मुंडे यांच्यासह जिल्ह्यातील सर्व आमदार, पक्षाचे प्रमुख पदाधिकारी शिवाय इतर लोकप्रतिनिधी यांनी प्रत्यक्ष-अप्रत्यक्ष शुभेच्छा दिल्या. दरम्यान, ताईसाहेबांच्या शुभेच्छा माझ्यासाठी फार मोठा आशिर्वाद असुन सर्वात अगोदर सकाळी त्यांचा फोन येणे तेच खरे माझे भाग्य असल्याचे त्यांनी सांगितले. गोरगरिबांची सेवा हीच मला आई-वडिलांची शिकवण तो सेवाभाव आयुष्यभर जपुनच भविष्यात या मतदारसंघाची सेवा करणार, आगामी काळात विकासाचा संकल्प हेच आपले ध्येय रहाणार असल्याचे त्यांनी स्पष्ट केले.

# मराठीचे संवर्धन मराठी माणसाने केले पाहिजे -प्राचार्य डॉ दीपा क्षीरसागर

**तभा वृत्तसेवा**
**माजलगाव दि.१३ मे**

मराठी भाषा टिकवण्याची जबाबदारी आपल्या सर्वांवर आली आहे. मराठीचे संवर्धन मराठी माणसाने केले पाहिजे, असे प्रतिपादन प्राचार्य डॉ . दीपा क्षीरसागर यांनी केले. माजलगाव येथील दक्षिणमुखी हनुमान मंदिराच्या निसर्गरम्य परिसरात आयोजित १६ व्य शिवार साहित्य संमेलनाच्या उद्घाटक म्हणून डॉ .दीपा क्षीरसागर बोलत होत्या. त्यावेळी संमेलनाध्यक्ष ना.मा. पडलवार, मराठवाडा साहित्य परिषदेचे नवनिर्वाचित सदस्य अनंत कराड, निमंत्रित सदस्य प्रभाकर साळेगावकर, अखिल भारतीय मराठी साहित्य महामंडळाचे सदस्य देविदास फुलारी, स्वागताध्यक्ष भारत होके, मसापचे अध्यक्ष मुकुंदराज सोळंके, उपाध्यक्ष प्रा. स्नेहल पाठक, कार्यवाह डॉ. भाऊसाहेब राठोड, कोषाध्यक्ष किशोर गुंजकर यांची उपस्थिती होती.

यावेळी बोलताना प्राचार्य डॉ दीपाताई क्षीरसागर म्हणाल्या की मराठवाडा साहित्य परिषद शाखेने कार्यक्रमाचे सातत्य ठेवले आहे. मसापच्या माध्यमातून विविध सांस्कृतिक साहित्यिक उपक्रम घेतले जातात. या साहित्य संमेलनामुळे कलावंतांना, साहित्यिकांना संधी मिळते. नवोदित साहित्यिकांना सल्ला देताना त्या म्हणाल्या की, नवोदित साहित्यिकांनी सुरुवातीला वाचन केले पाहिजे. शेतीमातीत काम करणारा शेतकऱ्याचा मुलगा अस्सल साहित्य लिहू शकेल. इंद्रजीत भालेराव, रा रं. बोराडे, आनंद यादव, प्रा.भास्कर चंदनशिव, श्रीकांत देशमुख यांनी शेतकऱ्यांच्या व्यथा साहित्यात मांडल्या. आज शेतकरी आत्महत्या मोठ्या प्रमाणात होत आहेत. आधुनिकीकरणामुळे कृषी जीवन उद्धस्त होत आहे. लोक पुणे, मुंबईकडे जात आहेत. बेकारी वाढली आहे. शिक्षण घेऊन तरुणांना नोकऱ्या मिळत नाहीत. त्यामुळे अनेक प्रश्न निर्माण झाले आहेत. मुले आई-वडिलांना सांभाळत नाहीत. शेतकऱ्यांचे विजेचे प्रश्न सोडवले पाहिजेत. अंधश्रद्धा, बालविवाह, शेतकऱ्यांचे प्रश्न साहित्यिकांनी मांडले पाहिजेत. शेतकऱ्यांचे महत्त्व वाढले पाहिजे, कारण शेतकरी पोटाला दाणे देतात. शेतकऱ्यांची मुलं काय करतात याकडे लेखकांनी लक्ष दिले पाहिजे. शेतकऱ्याच्या मुलांनी शिक्षण घेऊन नैपुण्य प्राप्त केले पाहिजे. आणि स्वतःच्या पाया उभे राहिले पाहिजे. दंगडलीत गरिबांच्या मुलाचा बळी जात आहे. त्यामुळे मुलांनी अभ्यास करावा, शिक्षण घ्यावे, असे त्यांनी सांगितले. यावेळी त्यांनी कवी स्वप्नील चौधरी यांची *चल दंगल समजून घेऊ* ही कविता सादर केली. तरुणांनी स्वावलंबी बनावे असा सल्ला त्यांनी दिला. यावेळी संमेलनाध्यक्ष ना.मा. पडलवार म्हणाले की , बीड जिल्ह्याला सकारात्मक अंगाने पुढे आले पाहिजे. तरुणांनी वाचन केले पाहिजे. प्रत्येकाच्या घरात किमान ५० पुस्तकांचे संग्रहालय असावे. आपण सर्वांनी मतभेद विसरून जवानांच्या पाठीशी उभे राहिले पाहिजे . यावेळी प्रभाकर साळेगावकर ,अनंत कराड, भारत होके यांची समायोचित भाषणे झाली. या कार्यक्रमाचे प्रास्ताविक प्रा. डॉ. भाऊसाहेब राठोड यांनी केले. कार्यक्रमाचे सूत्रसंचालन प्रा. डॉ. रमेश गटकळ यांनी केले तर आभार खेलबा काळे यांनी मांनले. कार्यक्रमाच्या सुरुवातीला गीता होके व त्यांच्या संचाने पुष्पांजली व गणेश कौतुकम हे कथ्थक सादर केले. कुणाल कुलकर्णी, ऋषिकेश पडलवार यांनी मराठी गीत सादर केले. यावेळी गेणू शिंदे, गौरी देशमुख, प्रा. संगीता जाधव, बालासाहेब झोडगे, प्रा. डॉ. उमेश साडेगावकर, डॉ. प्रज्ञा जोशी, स्मिता लिमगावकर, डॉ. मीनाक्षी निळेकर, रामकिसन सोळंके , अभय होके पाटील, नारायण होके, बंडू शेजुळ, शिवाजीराव शेजूळ, बालाप्रसाद चव्हाण, मोहन राठोड, विठ्ठलराव सोळंके, गोविंद बजाज ,सतीश दुगड, डॉ. राजेश रुद्रवार ड.सतीश शिंदे, आनंद मोगरेकर, संदीप शिनगारे, रामानंद भंडारी, जगदीश पोपळे यांच्यासह साहित्यप्रेमींची मोठ्या संख्येने उपस्थित होती.



# कारागृहात प्रबोधन पर व्याख्यानाचा कार्यक्रम



**तभा वृत्तसेवा**
**बीड दि.१३ मे**

बीड जिल्हा कारागृहात मातृदिनानिमित्त रोटरी क्लब बीड शहर व प्रजापती ब्रह्मकुमारी यांच्या संयुक्त विद्यमानाने प्रबोधन पर व्याख्यानाचा कार्यक्रम आयोजित करण्यात आला होता सदर कार्यक्रमात प्रज्ञापिता ब्रह्मकुमारीचे प्रज्ञा बहन यांनी काराग्रहातील पुरुष व महिला बंध्यांना जीवनाचा खरा अर्थ काय आहे व शांतीने जीवन कसे जगावे याबाबत प्रबोधन केले. रोटरी क्लब बीड शहरचे वतीने महिला बंध्यांना सॅनेटरी पॅड डिस्पोजल मशीन भेट देण्यात आली.सदर कार्यक्रमास रोटरी क्लबचे अध्यक्षा संध्या मिश्रा प्रजापती ब्रह्मकुमारी प्रज्ञा बहन, कविता बहन, नीता सानप व समीर सर तसेच कारागृह प्र. अधीक्षक बक्सार मुलानी तसेच तुरुंग अधिकारी श्रीनिवास पातकला कारागृह कर्मचारी दिपक पाटील,कृष्णा ढाकणे, राहुल राठोड, सतीश घोडके व महिला कर्मचारी पूजा ठेंगल, राधिका लोणकर व महिला व पुरुष बंदी बांधव उपस्थित होते.

# अंबाजोगाईत विजांच्या कडकडाटासह पाऊस

**तभा वृत्तसेवा**
**अंबाजोगाई दि.१३ मे**

अंबाजोगाई शहरांसह परिसरात रविवारी दुपारी ४ च्या सुमारास विजांच्या कडकडाटासह पावसानं हजेरी लावली. मागील काही दिवसांपासून प्रचंड उकाडा वाढल्याने नागरिक त्रस्त झाले होते. मात्र, रविवारी आलेल्या पावसामुळं वातावरणात गारवा निर्माण झाल्यानं नागरिकांची उकाड्यापासून सुटका झाली.

आज दिनांक ११ मे रोजी दुपारच्या सुमारास विजांच्या कडकडाटात अंबाजोगाई परिसराला पावसाने झोडपले. अचानक आलेल्या पावसामुळे नागरिकांची चांगलीच तारांबळ उडाली.

दरम्यान, हाती आलेल्या माहितीनुसार अंबाजोगाई तालुक्यातील अनेक भागात विजांच्या कडकडाटासह पावसाने हजेरी लावली आहे. पावसाने हजेरी लावल्यामुळे शहरातील वीज पुरवठा खंडित झाला होता, अशी माहिती प्राप्त झाली आहे.

# अनु. जाती व नवबौध्द मुलांची शासकीय निवासी शाळा परळी ६ वी ते १० वी वर्ग (सेमी माध्यम) च्या रिक्त जागेसाठी पात्र विद्यार्थ्यांना प्रवेश घेण्याचे आवाहन

**तभा वृत्तसेवा**
**बीड दि.१३ मे**

महाराष्ट्र शासन, सामाजिक न्याय व विशेष सहाय्य विभाग अंतर्गत अनु. जाती व नवबौध्द मुलांची शासकीय निवासी शाळा, परळी वै. जि.बीड, शासकीय आय. टी.आय. कॉलेज जवळ अंबाजोगाई रोड परळी (वै.) येथे शैक्षणिक वर्ष २०२५-२६ साठी इ.६ वी ते १० वी (सेमी माध्यम) च्या रिक्त जागेसाठी पात्र विद्यार्थ्यांना मोफत प्रवेश देणे सुरु आहे.

प्रवेशासाठी आरक्षण:-
अनुसूचित जाती-८० टक्के
अनुसूचित जमाती-१० टक्के
विमुक्त जाती व भटक्या जमाती -०५ टक्के, दिव्यांग ०३ टक्के
विशेष मागास प्रवर्ग २ टक्के

शाळेची वैशिष्टये-
सेमी माध्यमाचे गुणवत्ता पुर्ण शिक्षण, नवोदय विद्यालयाच्या धर्तीवर विद्यार्थ्यांना मोफत गुणवत्तापुर्ण शिक्षणाची / निवासाची व जेवणाची उत्तम सोय, स्पर्धा परीक्षेतुन आलेले तज्ज्ञ व अनुभवी प्रशिक्षीत शिक्षक, निसर्गरम्य वातावरणात व सर्व सोयींनी युक्त सुसज्ज भव्य इमारत, विद्यार्थ्यांना गणवेश व सर्व शैक्षणिक व इतर साहित्य मोफत ई- लर्निंग/डिजीटल क्लासरुम, स्मार्ट टी.व्ही. अध्ययन-अध्यापन सुविधा, सुसज्ज ग्रंथालय, वाचन कक्ष आणि प्रयोगशाळा, अद्यावत संगणक कक्ष, १०० टक्के निकालांची परंपरा, गुणवत्ता संवर्धनासाठी रात्र अभ्यासीकेची स्वतंत्र व्यवस्था व वैयक्तीक मार्गदर्शन.

प्रवेशासाठी आवश्यक कागदपत्रे
शाळा सोडल्याचा दाखला,
विद्यार्थ्याचे जातीचे प्रमाणपत्र,
रहिवासी प्रमाणपत्र,
विद्यार्थ्याचे आधार कार्ड,
पालकाचे उत्पन्न प्रमाणपत्र,
मागील इयत्तेचे गुणपत्रक
विद्यार्थी संचयिका पुस्तीका,
पासपोर्ट साईज फोटो (६ प्रती),
पालकाचे ओळखपत्र (मतदान कार्ड / आधार कार्ड/पॅन कार्ड),
विद्यार्थ्याचा वैद्यकीय तपासणी अहवाल.

प्रवेशासाठी संपर्क:- सोनवणे बी.एम. मुख्याध्यापक- ९९२२३२९०२८, सहा. शिक्षक- वैराळ एस. जे.- ९८६०५७१४८७, कराड व्ही. एन.-९९७०८१४२६१, शेळके आर. व्ही.-९४०३७८९१६१, यावर संपर्क साधण्याचे आवाहन समाज कल्याणचे सहाय्यक आयुक्त यांनी केले आहे.

## पैठण पोलीस ठाण्याचे दोन पोलीस उपनिरीक्षक नियंत्रण कक्षात बदली

पैठण दि १३ :- पैठण पोलीस ठाण्यामध्ये कार्यरत असलेले दोन पोलीस उपनिरीक्षक शासकीय कामकाजात कसुरी अहवालाच्या अनुषंगाने तडकाफडकी नियंत्रण कक्षात वापसी करण्याचा आदेश ग्रामीण पोलीस अधीक्षक डॉ. विनयकुमार राठोड यांनी दिल्यामुळे पोलीस विभागात खळबळ उडाली आहे.

अधिक माहिती अशी की पैठण पोलीस उपविभाग अंतर्गत असलेल्या पैठण पोलीस ठाण्यात कार्यरत असलेले पोलीस उपनिरीक्षक एकनाथ नागरगोजे व औदुंबर म्हस्के यांनी शासकीय कामकाजात कसुरी अहवालाच्या अनुषंगाने तडकाफडकी नियंत्रण कक्षात वापसी करण्याचा आदेश ग्रामीण पोलीस अधीक्षक डॉ. विनयकुमार राठोड यांनी दिल्यामुळे पोलीस विभागात खळबळ उडाली आहे दरम्यान पैठण येथील पोलीस ठाण्यात कार्यरत असताना या दोन पोलीस उपनिरीक्षक यांनी अवैधरित्या वाळू वाहतूक वाहनावर व जुगार अड्ड्यावर कारवाई करते वेळेस शासकीय कामकाजात कसुरी ठेवल्याचा गोपनीय अहवाल ग्रामीण पोलीस अधीक्षक कार्यालयात प्राप्त झाल्याने ग्रामीण पोलीस अधीक्षक डॉ. विनयकुमार राठोड यांनी या दोन पोलीस उपनिरीक्षक यांची तडका फडकी नियंत्रण कक्षात वापसी केल्याचे बोलले जात आहे.

## फिजिक्सवाला (पीडब्ल्यू) ने ऑफलाइन विद्यापीठ केंद्रांचा विस्तार केला

पुणे: एजुकेशन कंपनी, फिजिक्सवाला (पीडब्ल्यू) ने पुण्यात नल स्टॉप (कोथरूड) आणि विमान नगर येथे दोन नवीन टेक-इनेबल्ड पीडब्ल्यू विद्यापीठ केंद्रे सुरू केली आहेत. उद्धाटन समारंभाला पीडब्ल्यू सीएचआरओ, सतीश खेंगरे हे देखील उपस्थित होते. यासोबतच, पी.डब्ल्यू.एस.ए.टी. साठी नोंदणी देखील सुरू आहे, ज्याद्वारे विद्यार्थ्यांना ऑफलाइन अभ्यासक्रमांसाठी शिक्षण शुल्क माफी मिळण्याची संधी मिळू शकते. ही परीक्षा ऑफलाइन आणि ऑनलाइन दोन्ही पद्धतीने घेतली जाईल. सातवी ते बारावीपर्यंतचे विद्यार्थी तसेच जेईई किंवा नीटची तयारी करण्यासाठी ड्रॉप घेणारे विद्यार्थी यात बसू शकतील.

## नवीनतम फ्लो, झेफिरस आणि स्ट्रिक्स लॅपटॉप विक्रीसाठी उपलब्ध

नवी दिल्ली : भारतातील नंबर १ गेमिंग ब्रँड, एसुस इंडिया, रिपब्लिक ऑफ गेमर्स ला एनवीडिया आरटीएक्स ५००० सिरीजद्वारे समर्थित त्यांचा २०२५ रॉग लॅपटॉप लाइनअप आजपासून भारतीय बाजारपेठेत उपलब्ध असल्याची घोषणा करताना आनंद होत आहे. या महिन्याच्या सुरुवातीला अनावरण केलेल्या या नवीन श्रेणीमध्ये उच्च-कार्यक्षमता असलेले रॉग स्ट्रिक्स स्कार १६/१८, स्ट्रिक्स जी१६, झेफिरस जी१६, झेफिरस जी१४ आणि कन्व्हर्टिबल फ्लो झेड १३ यांचा समावेश आहे, जे सर्व गेमर्स आणि क्रिएटर्ससाठी तयार केलेले अत्याधुनिक कामगिरी, प्रगत कूलिंग आणि एआय -शक्तीच्या क्षमता प्रदान करण्यासाठी डिझाइन केलेले आहेत.

## ब्रिटानिया द लाफिंग काऊ आता अधिक क्रिमी

नाशिक : ब्रिटानिया द लाफिंग काऊने अधिक क्रिमी चव, अधिक मऊशार स्पर्श आणि अत्यंत उत्कृष्ट दर्जा यासह चीझची नवी रेंज सादर करत भारतभरातील चीझप्रेमींसाठी चीझचा आनंद एका नव्या उंचीवर नेला आहे. महाराष्ट्रातील रांजणगाव येथील ब्रिटानिया बेल फूड्सच्या अद्ययावत केंद्रात स्थानिक पातळीवर तयार केलेल्या या नव्या उत्पादनात फ्रेंच चीझमेकिंगमधील तज्ज्ञतेला भारतीय चवींनुसार खास जोड देण्यात आली आहे. या प्रक्रियेत चीझची पाककृती अधिक उत्तम करण्यात आली आहेच. त्याचसोबत पॅकेजिंगही नव्या स्वरुपाचे असल्याने हे उत्पादन चवीसोबतच आनंदही देते.

## मराठी भाषिकांकरिता महाराष्ट्र परिषदेची स्थापना

मुंबई, व्यवसाय आणि नोकरीनिमित्त दुबईत राहणाऱ्या दीड लाख मराठी भाषिकांकरिता नुकतीच महाराष्ट्र परिषदेची स्थापना केली गेली. संयुक्त अरब अमिरातीत राहणाऱ्या भारतीय नागरिकांनी स्थापन केलेल्या इंडियन पीपल्स फोरम या व्यापक संस्थेची अंगीकृत संस्था म्हणून ही परिषद कार्यरत राहणार आहे. भारतीय जनता पार्टीचे महाराष्ट्र प्रदेश कार्यकारी अध्यक्ष रविंद्र चव्हाण यांच्या प्रमुख उपस्थितीत दुबईत महाराष्ट्र कौन्सिलची मुहूर्तमेढ रविवार, दि ४ मे रोजी रोवली गेली. स्थापना सोहळ्याप्रसंगी बोलताना रविंद्र चव्हाण म्हणाले की महाराष्ट्र काउन्सिलच्या 'महा हेल्पलाइन' आणि 'युनायटेड महाराष्ट्र प्लॅटफॉर्म' या अत्यंत महत्त्वाच्या उपक्रमांमुळे दुबईस्थित मराठी माणसांचा आवाज अधिक बुलंद होईल आणि त्यांचे प्रश्न सोडवण्यासाठी अधिक बळ मिळेल.

## लातूरचे श्रीनिवास कुलकर्णी 'महाधन योद्धा' पुरस्काराने सन्मानित

लातूर - सोयाबीन शेतीत उल्लेखनीय कामगिरी केल्याबद्दल लातूर जिल्ह्यातील बार्हणपूर गावचे प्रगतशील शेतकरी श्रीनिवास कुलकर्णी यांना 'महाधन योद्धा पुरस्कार' देऊन गौरविण्यात आले. हा पुरस्कार लोकमत सरपंच पुरस्कार समारंभात हॉटेल अरोमा, एमआयडीसी, लातूर येथे प्रदान करण्यात आला. या प्रसंगी स्थानिक सरपंच, शेतकरी बांधव तसेच लोकमत आणि महाधन ॲग्रिटेक लिमिटेडचे प्रतिनिधी उपस्थित होते. महाधन ॲग्रिटेक लिमिटेडच्या वतीने दिला जाणारा हा पुरस्कार आधुनिक आणि परिणामकारक शेतीसाठी प्रोत्साहन देण्याच्या उद्देशाने सुरू करण्यात आला आहे.

## फेडएक्स उद्योगांना स्मार्ट शिपिंग साठी सक्षम बनवत आहे

छत्रपती संभाजीनगर : फेडरल एक्सप्रेस कॉर्पोरेशन (फेडएक्स) ही जगातील सर्वात मोठी वाहतूक कंपनी औरंगाबाद येथील लघु आणि मध्यम (एसएमई) उद्योगांना नावीन्यपूर्ण कल्पनांच्या माध्यमातून जागतिक बाजारपेठेपर्यंत पोहोचण्यासाठी सक्षम बनवत आहे. त्यासाठी फेडएक्स एसएमई कनेक्ट मालिका हा उपक्रम चालवत आहे, ज्यामध्ये उभरत्या व्यवसाय केंद्रांमध्ये अनुरूप लॉजिस्टिक्स, डिजिटल साधने आणि धोरणात्मक विचार आणले जात आहेत.

# सिल्लोड तालुक्याचा दहावी निकाल ९६.८९ टक्के, २३ शाळांचा निकाल १०० टक्के

सिल्लोड - इयत्ता दहावी परीक्षेमध्ये सिल्लोड तालुक्याचा निकाल ९६.८९ टक्के लागला असून यामध्ये मुलींनी बाजी मारली आहे. मुलींचा निकाल ९८.०५ टक्के तर मुलांचा निकाल ९५.९१ टक्के इतका आहे. २३ शाळांचा निकाल १०० टक्के लागला आहे.

इयत्ता दहावी परीक्षा संपल्यानंतर निकालाची परीक्षा सर्वांच्या लक्षात होती मंगळवार १३ मे रोजी महाराष्ट्र स्टेट बोर्डाचा वेबसाईटवरुन निकाल जाहीर झाला. इयत्ता दहावी साठी तालुक्यातून ३६७१ मुले तर ३०८२ मुली अशा एकूण ६७५३ विद्यार्थी परीक्षेस बसले होते. यामध्ये ३५२१ मुले व ३०२२ मुली उत्तीर्ण झाल्या. एकूण ६५४३ विद्यार्थी या परीक्षेत यशस्वी झाले.



१. जिल्हा परिषद उच्च माध्यमिक विद्यालय, वडोदपान,२. मुरदेश्वर हायस्कूल, लिहाखेडी,३. दयानंद माध्यमिक विद्यालय, घाटांब्री,४. गजानन विद्यालय, आसडी

५. वसंतदादा पाटील विद्यालय, हळदा, ,६. सावित्रीबाई फुले हायस्कूल, केऱ्हाळा, ,७. नॅशनल मराठी हायस्कूल, डोंगरगाव,८. संत एकनाथ माध्यमिक विद्यालय, सिल्लोड,९. जोगेश्वरी माध्यमिक विद्यालय, घाटनांद्रा, १०. ज्ञानदीप माध्यमिक विद्यालय, शिक्षक नगर, सिल्लोड,११. महाराणा प्रताप माध्यमिक विद्यालय, गाव्हली ,१२. श्री शिवछत्रपती माध्यमिक विद्यालय, टाकळी जीवरग ,१३. श्री अंबिका माता माध्यमिक विद्यालय, वडोद (चाथा),१४. सिंधू मेमोरियल माध्यमिक विद्यालय, सिल्लोड,१५. नॅशनल इंग्लिश हायस्कूल, अजिंठा, ता. सिल्लोड,१६. स्वामी विवेकानंद माध्यमिक विद्यालय, छ. संभाजीनगर,१७. ऑक्सफर्ड इंग्लिश स्कूल, सिल्लोड,१८. माणिकराव पालोदकर इंग्लिश हायस्कूल, सिल्लोड ,१९. जमालशा बाबा उर्दू हायस्कूल,२०. होली फेथ इंग्लिश स्कूल, भराडी ,२१. स्वामी विवेकानंद इंग्लिश स्कूल,२२. व्यंकटेश हायस्कूल, निल्लोड फाटा ,२३. आदर्श सेकंडरी अँड हायर सेकंडरी स्कूल, कायगाव २३ विद्यालयांचा निकाल १०० टक्के लागला आहे.

# वाळूज एमआयडीसीत दोन उपकेंद्रांची क्षमतावाढ

छत्रपती संभाजीनगर : महावितरणने वाळूज एमआयडीसीतील दोन विद्युत उपकेंद्रांची क्षमतावाढ केली आहे. त्यामुळे एमआयडीसीसह परिसरातील सुमारे दीड हजार उद्योगांना अखंडित व दर्जेदार वीजपुरवठा मिळणार आहे.

वाळूज एमआयडीसीतील महावितरणच्या ३३ केव्ही ई सेक्टर उपकेंद्रात १० एमव्हीए क्षमतेचे दोन व ५ एमव्हीएचा एक पॉवर ट्रान्सफॉर्मर होता. त्याद्वारे सुमारे ७५२ उद्योगांना वीजपुरवठा करण्यात येतो. एम सेक्टर उपकेंद्रात १० एमव्हीएचा एका व ५ एमव्हीएचे दोन पॉवर ट्रान्सफॉर्मर होते. त्याद्वारे सुमारे ६३१ उद्योगांना वीजपुरवठा करण्यात येतो. मात्र दिवसेंदिवस वाढणाऱ्या विजेच्या मागणीमुळे सुरळीत वीजपुरवठा करण्यात अडथळा निर्माण होत होता. त्यावर महावितरणने संचालक (संचालन) अरविंद भादिकर, प्रभारी व्यवस्थापकीय संचालक धनंजय औंढेकर यांच्या मार्गदर्शनाखाली नवीन सेवाजोडणी योजनेमध्ये दोन्ही उपकेंद्रात प्रत्येकी एका ५ एमव्हीएच्या पॉवर ट्रान्सफॉर्मरची क्षमतावाढ करून तो १० एमव्हीए करण्याचा निर्णय घेतला. मुख्य अभियंता पवनकुमार कछोट, अधीक्षक अभियंता मनीष ठाकरे यांनी हे काम तातडीने करण्यासाठी पुढाकार घेतला. आता ई व एम उपकेंद्रांची एकत्रित क्षमता अनुक्रमे ३० व २५ एमव्हीए झाल्याने औद्योगिक ग्राहकांना अखंडित व दर्जेदार वीजपुरवठा मिळणार आहे. याचा एमआयडीसीसह एमआयडीसीबाहेरील औद्योगिक ग्राहकांना लाभ होणार आहे. तसेच उद्योगांना त्यांच्या मागणीनुसार वीजभार वाढवून मिळेल आणि नवीन औद्योगिक ग्राहकांनाही वीजजोडणी देणे शक्य होणार आहे. याबरोबरच के सेक्टर उपकेंद्रातील अतिरिक्त १० एमव्हीए पॉवर ट्रान्सफॉर्मरचे काम येत्या पंधरवड्यात पूर्ण करण्यात येणार आहे,

रविवारी (११ मे) दोन्ही उपकेंद्रांतील ट्रान्सफॉर्मर कार्यान्वित करण्यात आले.

याप्रसंगी मुख्य अभियंता पवनकुमार कछोट, अधीक्षक अभियंता मनीष ठाकरे, महेश पवार, कार्यकारी अभियंता प्रसाद महातोले, अविनाश चांदेकर, अतिरिक्त कार्यकारी अभियंता अरुण गायकवाड, रवींद्र गायकवाड, दीपक माने, सहायक अभियंता विनोद शेवणकर, पुष्कर पुरंदरे, राहुल चव्हाण, विक्रांत खाडे, रवी मिरगणे यांच्यासह कर्मचारी उपस्थित होते.

# गंगापुरात शिवमहापुराण कथेचे आयोजन; गाथामूर्ती रामभाऊ महाराज राऊत यांच्या हस्ते ध्वजपूजन

तभा वृत्तसेवा

गंगापूर दि.१३: गंगापूर शहरातील जिल्हा परिषद शाळेच्या मैदानावर दि. १४ ते २० मे दरम्यान प्रसिध्द कथाकार समाधान महाराज शर्मा यांच्या सुश्राव्य वाणीतून शिवमहापुराण कथेचे आयोजन करण्यात आले आहे.

कथेदरम्यान दररोज सहा हजारावर भाविकांना प्रसादाचे नियोजन करण्यात आले आहे.या कार्यक्रमाचे ध्वजपूजन दि. १३ रोजी गाथामूर्ती रामभाऊ महाराज राऊत यांच्या हस्ते करण्यात आले.

यासंदर्भात कथेचे आयोजक माजी नगराध्यक्ष संजय जाधव यांनी माहिती देताना सांगितले की, जिल्हा परिषदेच्या मैदानावर १४ ते २० मे दरम्यान सायंकाळी ६.३० ते ९.३० कथा होणार असून दररोज कथा संपल्यानंतर महाप्रसाद होणार आहे. दि. २० मे रोजी कथेची सांगता होणार असून सायं. ४ ते ६ शहरातून भव्य मिरवणुक होणार आहे. या कथेसाठी आ. सतीश चव्हाण, अप्पासाहेब हिवाळे, रामेश्वर मुंदडा, संजय होळकर, राजेंद्र जंजाळ,गोपाळ राऊत, दिपक कदम, सुरेश नेमाडे, रामेश्वर नावंदर यांचे सहकार्य लाभले आहे.

याशिवाय संत एकनाथ कारखान्याचे चेअरमन सचिन घायाळ, अमोल जगताप, संदीप साबणे, सुधीर माने, पोपट परभणे, सचिन सोनवणे, योगेश आंबेकर, काकासाहेब धोंडरे, दिलिप बनकर, अविनाश पाटील, दिलिप निरफळ, आबासाहेब सिरसाठ, अविनाश सोनवणे, नवनाथ कानडे कथेसाठी मदत केली असून कथेच्या आयोजनासाठी संतोष अंबिलवादे, कृष्णा पाटील, दिनेश गायकवाड, तुकाराम सटाले, सोपान देशमुख योगेश पाटील यांच्यासह आयोजन कमिटीतील सदस्य परिश्रम घेत आहे.



**गाथामूर्ती रामभाउ महाराज यांच्या हस्ते ध्वजपूजन**

**शिवमहापुराण कथेचे ध्वजपूजन आज दि. १३ रोजी गाथामूर्ती रामभाउ महाराज राउत यांच्या हस्ते करण्यात आले यावेळी माजी नगराध्यक्ष संजय जाधव, रामेश्वर मुंदडा, अविनाश पाटील, ज्ञानेश्वर साबणे, संतोष अंबिलवादे, श्रीपाद कुलकर्णी, योगेश पाटील, सुरेश नेमाडे, रामेश्वर नावंदर, सोपान देशमुख, अमोल वरकड, अशोक खाजेकर, तुकाराम सटाले, अविनाश सोनवणे, सचिन भवार, विशाल दारूंटे यांच्यासह इतरांची उपस्थिती होती.**

# पैठणला दहावीचा निकाल ९२ टक्के

पैठण दि १३ :- राज्य उच्च माध्यमिक शिक्षण मंडळाच्या वतीने मार्च आणि एप्रिल २०२५ या महिन्यात घेण्यात आलेल्या इयत्ता दहावी निकाल राज्य माध्यमिक शिक्षण महामंडळाच्या वतीने मंगळवार दिनांक १३ मे रोजी दुपारी जाहीर करण्यात आला असून यात पैठण तालुक्याचा १० विचा निकाल ९२.१४ टक्के इतका लागला आहे.

विद्यार्थी जीवनात शिक्षणाचा महत्वचा टप्पा असलेल्या इयत्ता १० वीला यंदा पैठण तालुक्यात ८२ शाळेतील ५९४१ विद्यार्थ्यांनी परीक्षा फार्म भरले होते. यापैकी ५९२१ ईतक्या विद्यार्थ्यांनी दहावीची परीक्षा दिली होती.यात एकूण ५४५६ विद्यार्थी दहावीची परीक्षा उत्तीर्ण झाले आहेत. त्यात मेरिट मध्ये २१८६, प्रथम श्रेणीत १८३४, द्वितीय श्रेणीत ११३८ तर तृतीय श्रेणीत २९८ असे एकूण ५४५६ विद्यार्थी आणि विद्यार्थिनी दहावीचा परीक्षा उत्तीर्ण झाले आहेत.दहावीच्या परीक्षेत यंदा मेरिट गाठणाऱ्या विद्यार्थ्यांची संख्या मोठया प्रमाणावर आहे.

## भारतीय जैन संघटना महिला शाखा व जैन सोशल ग्रुप यांचे संयुक्त विद्यमाने मातृ दिन साजरा



छत्रपती संभाजीनगर - भारतीय जैन संघटना महिला शाखा व जैन सोशल ग्रुप छ. संभाजीनगर यांचे संयुक्त विद्यमाने मदर्स डे (मातृ दिन) साजरा करण्यात आला. मुक्ती सोपान न्यास वृद्धाश्रम, समर्थ नगर मधील महिला व पुरुषांना यावेळी भोजन देण्यात येऊन त्या सर्वांचा यथोचित सन्मान करण्यात आला. मातृ दिनाचे औचित्य साधून मुक्ती सोपान् न्यास वृद्धाश्रमास दोन टेबल फॅन सप्रेम भेट देण्यात आले.

या निमित्ताने सामाजिक काम करणाऱ्या महिलांचा यथोचित सन्मान करण्यात आला. भारती बागरेचा विमला रानी बाफना राखी देसरदा मनीषा भंसाली भावना सेठिया यावेळी नंदकिशोर वर्मा व वृद्धाश्रमाच्या संचालिका श्रीमती मालती करंदीकर यांनी वृद्धाश्रमातील महिलांना व पुरुषांना आनंदी जीवन कसे जगावे याबद्दल मार्गदर्शन केले. त्यावेळी भारतीय जैन संघटनाचे पदाधिकारी गौतम संचेती, प्रवीण पारक, पारस चोरडिया, पारस बागरेचा, राजेंद्र पगारिया, किशोर ललवाणी, चंद्रकांत चोरडिया, अनिल संचेती तसेच भारतीय जैन संघटना जिल्हा महिला शाखा अध्यक्ष दर्शना लुनावत, शितल पगारिया, वनिता छाजेड, सुरुची मगदिया, मित्तल जैन, वंदना कांकरिया, सीमा छाजेड़, हेमलता छाजेड, हजर होते. जैन सोशल ग्रुप चे सुनील सिसोदिया सुवर्णा सिसोदिया महावीर मेहता संगीता मेहता पृथ्वीराज शाह रश्मि शाह गौतम भंडारी संतोष पगारिया राजेश चोरडिया कपिल चोरडिया ओम चोरडिया उपस्थित होते.

## नॅशनल मराठी हायस्कूल सोयगाव विद्यालयाची इ.10वीच्या निकालाची उज्ज्वल परंपरा कायम

तभा.वृत्तसेवा

सोयगाव,दि.१३ मे



मानवी चव्हाण



अंजली राठोड



निकिता राठोड

महाराष्ट्र राज्य माध्यमिक व उच्च माध्यमिक शिक्षण मंडळाच्या वतीने घेण्यात आलेल्या इ.१० वी च्या परीक्षेत विद्यालयाचा एकूण निकाल ९७.९५%इतका लागला असून विद्यार्थ्यांनी यावर्षीही घवघवीत यश संपादन केले आहे.

यामध्ये प्रथम कु.चव्हाण मानवी प्रेमसिंग (९०.८०%),द्वितीय-कु. राठोड अंजली संजय (८७%),तृतीय-राठोड निकिता संतोष(८६.२०%)

सर्व यशस्वी विद्यार्थ्यांचे संस्थेचे अध्यक्ष माजी मंत्री आमदार अब्दुल सत्तार,सचिव अब्दुल समीर,प्रशासकीय अधिकारी रईस खान,मुख्याध्यापक अमजद पठाण,शेख बबलू,पोपटराव साखले, पंकजकुमार साखरे,भाऊसाहेब सिरसाट,भगवान पाटील,नितीन पाटील,संतोष पिसे,ज्ञानेश्वर पांडव,अक्षय पवार,गजानन गव्हाड, आदी शिक्षक वृंदानी अभिनंदन केले व पुढील वाटचालीस शुभेच्छा दिल्या.

## सोयगाव येथील कै.बाबूरावजी काळे मराठी शाळेचा शंभर टक्के निकाल

तभा.वृत्तसेवा

सोयगाव,दि.१३ मे - महाराष्ट्र राज्य माध्यमिक उच्च माध्यमिक परीक्षा मंडळाच्यावतीने ऑनलाईन जाहीर करण्यात आलेल्या इयत्ता दहावीच्या परीक्षेत कै.बाबुरावजी काळे मराठी स्कूलचे २७ पैकी २७ विद्यार्थी अतिशय चांगल्या गुणांनी उत्तीर्ण झाले.२१ विद्यार्थ्यांना ८० टक्यांपेक्षा अधिक गुण मिळाले आहेत. गेल्या दोन वर्षांपासून शाळेचा निकाल १०० टक्के असून या वर्षीदेखील १०० टक्के निकालाची परंपरा कायम राखली गेली.यावेळी ज्योती ईश्वर गव्हांडे ही ९४.२०% गुण मिळवून प्रथम,रोहन रत्नप्रदीप शिरसाट हा ९२.४०% गुण मिळवून द्वितीय आणि भाग्यश्री राजेंद्र बाविस्कर ही ९१.४०% गुण मिळवून तृतीय क्रमांकाने उत्तीर्ण झाली.शाळेच्या या यशाबद्दल शिवज्योती शिक्षण प्रसारक मंडळाच्या अध्यक्षा जोतीताई काळे,सचिव देविना काळे-भटकर,संचालक शिवदीप काळे,संचालिका सुनयना शिवदीप काळे,संस्था प्रतिनिधी प्रा.कमलेश काळे, ज्ञानेज्योती शिक्षणशास्त्र महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ.राजेश यादव,प्रा.डॉ. दादासाहेब पवार,मुख्याध्यापक निलेश पाटील, उपमुख्याध्यापक ज्ञानेश्वर एलिस,पर्यवेक्षक सागर घाटे, तसेच जिल्हा परिषद शाळा सोयगाव मुख्याध्यापक दादाराव राठोड यांनी यशस्वी विद्यार्थ्यांचे अभिनंदन केले.



ज्योती गव्हांडे



रोहन शिरसाट



भाग्यश्री बाविस्कर

# उज्जैन येथून महाकालच्या दर्शनाहून परतणाऱ्या भाविकांचा नांदोरा जवळ भिषण अपघात

## सेवानिवृत्त शिक्षकाचा पत्नी व मुलासह दुर्दैवी मृत्यू

**तभा वृतसेवा**

**माहुर, दि. १३ मे-**

उज्जैन येथे महाकालच्या दर्शनासाठी गेलेल्या लोकरवाडी येथील सेवानिवृत्त शिक्षक देवराव पवार यांच्या कुटुंबीयांच्या इर्टिका गाडीची परतीच्या प्रवासात नांदोरा पाचोरा रोडवरील खामगाव जवळ चालकाचे गाडीवरील नियंत्रण सुटल्याने एका टिप्परला जबरदस्त धडक बसून झालेल्या भिषण अपघातात एकाच कुटुंबातील सेवानिवृत्त शिक्षक,पत्नी व धाकट्या मुलाचा दुर्दैवी मृत्यू झाल्याची धक्कादायक घटना रविवार व सोमवारच्या मध्यरात्रीनंतर १ ते १:३० वाजण्याच्या सुमारास घडली असून,चालक गंभीर जखमी तर गाडीतील चौघीजणी किरकोळ जखमी झाले. आज सायंकाळी ०६ वाजताच्या सुमारास अपघातातील मृतदेह लोकरवाडी येथे आणण्यात आले आहेत.



माहूर तालुक्यातील लोकरवाडी येथील सेवानिवृत्त शिक्षक देवराव गंगाराम पवार (६०) हे पत्नी बबीताताई (५५) मुलगा शुभम ( २६ ) व निकेतन ( २३), मुलगी मोनिका (२४) व प्रियंका (२०) भावाची मुलगी भुमिका (१८) आणि नात मोनिकाची मुलगी रितांशी(०२) जावई जिवन राठोड यांच्या सह तीन चार दिवसांपूर्वी किरायाची इर्टिका गाडी घेऊन उज्जैन येथे महाकालच्या दर्शनासाठी गेले होते.दरम्यान, देवदर्शनानंतर रविवार दि.११ रोजी पवार कुटुंब परतीच्या प्रवासाला निघाले होते. देवदर्शनासाठी गेलेल्यां पैकी जावई जिवन राठोड हे मुंबईकडे तर मोठा मुलगा जो धरमपेठ नागपूर येथे एका महाविद्यालयात प्राध्यापक आहे हे नागपूरकडे निघून गेलेत.

दरम्यान, पवार यांचे इर्टिका वाहनाने माहूरच्या दिशेने येत असताना खामगाव जवळ नांदोरा - पाचोरा रोडवर चालकाचे गाडीवरील नियंत्रण सुटल्याने एका टिप्परला जबरदस्त धडक बसून भिषण अपघात झाला. अपघातात सेवानिवृत्त शिक्षक देवराव गंगाराम पवार, त्यांची पत्नी बबीताताई व लहान मुलगा शुभम हे गंभीर जखमी झाले. स्थानिकांनी जवळच्या रुग्णालयात दाखल केले असता त्यांना मृत घोषित करण्यात आले.तर चालक संतोष कदम (२५) राहणार करंजी या.माहूर हा गंभीर जखमी झाला असून, परिस्थिती नाजूक असल्याचे समजते.

गाडीतील देवराव पवार यांची विवाहित मोठी मुलगी मोनिका,तीची चिमुकली मुलगी रितांशी,प्रियंका व पवार यांचे लहान बंधू रामराम पवार यांची मुलगी भुमिका हे जखमी झालेत.अत्यंत मितभाषी आणि सौज्वळ स्वभावाचे व्यक्ती असलेले सेवानिवृत्त शिक्षक देवराव पवार यांच्यासह कुटुंबातील तीघांचा या दुर्दैवी अपघातात मृत्यू झाल्याने परिसरात शोककळा पसरली असून,माझे भाचे सेवानिवृत्त शिक्षक देवराव पवार यांच्या कुटुंबावर कोसळलेल्या भिषण आपत्तीमुळे आम्ही सर्व आप्तेष्ट निशब्द झाले असल्याचे मामा मनोज राठोड,मामा किसनराव राठोड यांनी अतिशय दुःखी अंतः करणाने सांगत आज मंगळवारी १३ रोजी सायंकाळी ०६ च्या सुमारास अपघातातील सर्व मृतदेह लोकरवाडी येथे आणण्यात आले असल्याची माहिती अपघातातील मृत सेवानिवृत्त शिक्षक देवराव पवार यांचे दोन्ही मामांनी दिली आहे.

DEAR GOVERNMENT LOTTERY | PUNJAB STATE LOTTERIES




डियर लॉटरी द्वारा झाले मालामाल

जिंकले 1.50 करोड रुपये

पंजाब स्टेट लॉटरीचा पहिला पुरस्कार महाराष्ट्रातील नालासोपारा, मुंबई येथे लागला.



भाग्यवान तिकट विक्रेता बक्षीस रक्कम
रु. 10 लाख
हरि श्री लॉटरी, नालासोपारा, मुंबई, महाराष्ट्र

भाग्यवान स्टॉकिस्ट बक्षीस रक्कम
रु. 5 लाख
विशेष डिस्ट्रीब्यूटर्स, गोरेगांव, मुंबई, महाराष्ट्र



पंजाब स्टेट लॉटरी - पंजाब स्टेट डियर 200 मासिक लॉटरीचा पहिला पुरस्कार 1.50 कोटी रुपये तिकीट क्रमांक: 928478 (10 मे 2025, रात्री 8 वाजता, ड्रॉ क्रमांक 20th) हे भाग्यवान तिकीट हरि श्री लॉटरी, नालासोपारा, मुंबई, महाराष्ट्र येथून विकले गेले. तिकीट विक्रेत्यासाठी 10 लाख रुपये प्रोत्साहन रक्कम मिळाली. स्टॉकिस्ट: विशेष डिस्ट्रीब्यूटर्स, गोरेगांव, मुंबई, महाराष्ट्र यांचे मेसर्स एम अँण्ड सी प्रॉपर्टी डेव्हलपमेंट प्रा. लि. चे श्री. आनंद मवानी जी आणि श्री. राजेश मदान जी यांनी पुष्पगुच्छ देऊन अभिनंदन केले व पुढील प्रगतीसाठी हार्दिक शुभेच्छा दिल्या.

dearlotteries | Dear Lotteries